**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १८३/२००८**

**१) श्री रामराव दत्तुजी उंबरकर**
**रा.बळवंत कॅालनी अकोला, शुभम मंगल कार्यालया मागे,**
**अकोला पो.गांधीनगर, ता.जि. अकोला.** **तक्रारदार**

**विरुध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक,**
**अमरावती विभाग, अमरावती.** **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक १.७.२००८ )**

**निर्णय**

तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ७.५.२००८ रोजी अपील क्रमांक ५९५/२००७, ५९६/२००७ मध्ये त्यांनी केलेल्या तक्रारीची चौकशी करावी व तसा अहवाल आयोगाकडे ३ महिन्यांच्या आंत सादर करावा असा निर्णय दिलेला होता. वास्तविक अपील क्रमांक ५९६/२००७ च्या सुनावणीच्या वेळेस अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्जच दिलेला नव्हता व त्यामुळे त्यांचे अपील हे खारीज करण्यात आले होते. परंतु, ज्या तक्रारीच्या संदर्भामध्ये माहिती मागितली होती त्या तक्रारीची सुनावणी घेवून निर्णय द्यावा असा आदेश देण्यात आला होता. त्या आदेशाप्रमाणे शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालयात दिनांक १०.१२.२००७, ७.१.२००८ व १५.२.२००८ रोजी सुनावणी घेवून अहवाल सादर करण्यास कळविण्यात आले होते. त्यानंतर शिक्षण उपसंचालक या कार्यालयाचे पत्र क्रमांक/माध्यमिक/ब/१८०७२/०८ दिनांक १९.३.०८ अन्वये सविस्तर अहवाल राज्य माहिती आयोगाकडे सादर केला. संबंधीताने या कार्यालयाकडे दिनांक २५.३.२००८ रोजी माहितीचे अधिकारात अर्ज दाखल केला व त्यावर अपील दिनांक २१.५.२००८ रोजी दाखल केले. सदर अपीलाचे अनुषंगाने दिनांक १६.६.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीस अपीलकर्ते व शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.अकोला हे उपस्थित होते. त्यावेळी शिक्षणाधिकारी यांना सखोल चौकशी करण्याचे व कार्यवाही करुन संबंधीतास प्रत देणे संदर्भात स्थळीच सूचना दिल्या तसेच सदर चौकशी श्री उंबरकर यांचे

उपस्थितीत करावी असेही निर्देश दिले व लेखी स्वरुपात या कार्यालयाचे पत्र क्रमांक/माध्य/ब/२६२७३/०८ दिनांक २३.६.२००८ अन्वये कळविले आहे. तसेच सदर सुनावणीचे वेळी शाळा सुरु झाल्यापासून एक महिन्याचे आंत शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद, अकोला यांनी स्वतः अपीलकर्ता यांचे समक्ष चौकशी करावी व अहवालाची प्रत श्री उंबरकर यांना देण्यात यावी असे निर्देश दिले. तरी सदर चौकशी करीता मुदतवाढ देण्यात यावी अशी आयोगाकडे विनंती केलेली आहे. त्यावर गैरतक्रारदार यांनी एक महिन्याचे आंत शाळेच्या संदर्भात तक्रारदार यांचे उपस्थितीत सुनावणी घेण्यात येईल असे सांगितले असल्यामुळे सदरची तक्रार ही खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) सदरच्या तक्रारीची चौकशी शिक्षण उप संचालक यांनी आयोगाकडे मान्य केल्याप्रमाणे एक महिन्याचे आंत तक्रारदार यांचे उपस्थितीत करण्यात येवून त्याप्रमाणे त्यांना अहवाल उपलब्ध करुन देण्यात यावा.

२) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

**दिनांक :- १.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १८६/२००८**

**१) श्री प्रा.किशोर बापुराव देशपांडे**
**रा.मायबाई वार्ड, आर्वी, जिल्हा आर्वी.** **तक्रारदार**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता**
**महाराष्ट्र सिंचन विकास महामंडळ, निम्न वर्धा प्रकल्प पुनर्वसन**
**उपविभाग क्रं.२, आर्वी, जिल्हा वर्धा.** **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक १.७.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारदार यांनी दिनांक २९.२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार यांनी दिनांक १२.१२.२००७ रोजी उपअभियंता श्री गायकवाड, म.सिं.वि.महामंडळ निम्न वर्धा धरण आर्वी, जिल्हा वर्धा कार्यालय क्रमांक २ यांचेकडे माहिती मागण्यासाठी अर्ज केला होता. सदरच्या अर्जामध्ये माहिती ही आपणास योग्य वाटेल त्याप्रमाणे उपलब्ध करुन द्यावी असे नमूद केलेले दिसून येते. त्यावर उपविभागीय अभियंता यांनी आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

"(१) श्री किशोर बापूराव देशपांडे, रा.मायबाई वार्ड, आर्वी जि. वर्धा यांनी त्यांचे पत्र क्रं. दिनांक १२.१२.०७ माहितीचा अधिकार २००५ अन्वये माहिती मागितलेली होती. त्यांनी मागितलेली माहिती या कार्यालयाचे पत्र क्रं.५२७/चिशा/म.रा.म.अ.०५/०७ दि. १३.१२.०७ अन्वये त्यांना देण्यासाठी कार्यालयात सिलबंद लिफाप्यामध्ये ठेवली आहे. श्री देशपांडे हे आर्वी येथेच राहत असल्यामुळे त्यांना पोस्टाद्वारे माहिती पाठविली नाही. त्यांनी त्यांचे अर्जात पोस्टाने माहिती पाठवा याचा उल्लेख नाही. " योग्य वाटेल त्याप्रमाणे " असे लिहीले आहे.

(२) श्री किशोर देशपांडे यांनी त्यांचे पत्र क्रं.  दिनांक ३०.१.२००८ अन्वये दि. १२.१२.२००७ च्या पत्रातील मागितलेली माहिती ३ दिवसाचे आंत न दिल्यास मा. आयुक्त माहितीचा अधिकार यांचेकडे तक्रार करण्यात येईल असे कळविले. श्री किशोर देशपांडे दि. ३०.१.२००८ रोजी कार्यालयात आले असता त्यांनी मागितलेली माहिती १२.१२.२००७ ची त्यांना देण्यात आली त्यांनी ती घेण्यास नकार दिला. तथापि त्यांना आवश्यक असलेले माहितीचे सिलबंद पाकीट (१२/१२/०७ ची माहिती) या कार्यालयातील श्री जंगम शिपाई यांनी दि. ३१.१.२००८ ला (या कार्यालयाचे पत्र क्रं. ७८ दि. ३१.१.२००८) रोजी त्यांचे शिवसेना कार्यालयात "गण्याबापू" आर्वी येथे दिले असता त्यांनी माहितीचे पाकीट घेण्यास नकार दिला. त्याबाबतचे नोंद टपाल वहीमध्ये श्री जंगम शिपाई यांनी घेतली आहे. त्याची झेरॉक्स प्रत आपणाकडे सादर करण्यांत येत आहे. (३) श्री किशोर बापूराव देशपांडे यांनी दिनांक १२.१२.२००७ च्या पत्रान्वये मागितलेली माहिती या कार्यालयाचे पत्र क्रं. ५२७ दि. १३.१२.२००७ अन्वये सिलबंद पाकीटमध्ये आहे. श्री किशोर बा. देशपांडे हे आर्वी येथेच राहत असल्यामुळे त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांनी घेवून जावी. माहितीचा अधिकार २००५ अन्वये मागितलेली माहिती न देण्याचा किंवा टाळाटाळ करण्याचा प्रश्नच उदभवत नाही. " त्यांनी हस्तबटवडयाच्या जावक नोंदवहीची छायांकित प्रत दाखल केली आहे. जावक नोंदवहीमध्ये लघुपाटबंधारे स्थानिक स्तर आर्वी याखाली दिनांक २४.१.२००८, २५.१.२००८, २०.१.२००८,३१.१.२००८, ७.२.२००८, १२.२.२००८ अशा प्रकारे हस्तबटवडयातील टपाल निगर्मित केल्याची नोंद दिसून येते. त्यात दिनांक ३१.१.२००८ पत्र क्रमांक ७८ प्रा.किशोर देशपांडे, शिवसेना जिल्हा वर्धा उपप्रमुख, आर्वी, मायाबाई वार्ड, आर्वी असा पत्ता दिलेला असून दिनांक ३१.१.२००८ रोजी श्री देशपांडे यांचेकडे पत्र घेवून गेलो असता पत्र घेण्यास नकार दिला असा शिपाई यांचा शेरा दिनांक ३१.१.२००८ चा आहे. इतर पत्रव्यवहाराच्या संदर्भात सुध्दा इतर शेरे दिसून येतात. व त्यावरुन तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची माहिती ही पत्र क्रमांक ५२७/चीशा/मरामअ/०५/०७ दिनांक १३.१२.२००७ अन्वये त्यांना देण्यासाठी कार्यालयात सिलबंद लिफापा ठेवलेला आहे. तसेच श्री देशपांडे हे आर्वी येथेच राहात असल्यामुळे त्यांना पोस्टाद्वारे माहिती पाठविली नाही. योग्य

वाटेल त्याप्रमाणे असे लिहीले आहे. दिनांक ३०.१.२००८ रोजी कार्यालयात आले असता त्यांनी मागितलेली माहिती दिनांक १२.१२.२००७ ची त्यांना देण्यात आली ती त्यांनी घेण्यास नकार दिला व त्यामुळे त्यांना पुन्हा त्यांच्या शिवसेना कार्यालयात माहिती देण्याकरीता श्री जंगम शिपाई यांना पाठविण्यात आले होते. याबाबतचा त्यांचा खुलासा हा योग्य वाटतो. तसेच उत्तरवादी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता सदरची माहितीमुळे विद्यमान माहिती अधिकारी अडचणीत वगैरे येत्‌ील असे दिसत नाही व त्यामुळे त्यांनी माहिती देण्यांस टाळाटाळ केली असा निष्कर्ष काढता येत नाही. व त्यामुळे तक्रारदार यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचे प्रयत्न हे विहित मुदतीत झालेले होते हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. उपविभागीय अभियंता यांनी आयोगाकडे सदरचे सिलबंद पॉकीट सादर केलेले आहे. व हस्तबटवाडयाच्या संदर्भामध्ये जी छायांकित प्रत दाखल केलेली आहे त्यावरुन अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीप्रमाणे आहे असे दिसून येते. त्यामुळे तक्रारदार यांनी सदरची माहिती हवी असल्यास आता उपलब्ध करुन घ्यावी.

## आदेश

१) तक्रारदार यांना जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला होता परंतु माहिती घेण्यास नकार दिलेला असल्यामुळे सदरची तक्रार ही खारीज करण्यात येत आहे.

२) तक्रारदार यांनी त्यांच्या अर्जाप्रमाणे माहिती हवी असल्यास त्यांनी जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता यांचेकडून आज माहिती उपलब्ध करुन घ्यावी व तशी पोच द्यावी.

३) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :- १.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**तक्रार क्रमांक १८९/२००७**
**अपील क्रमांक २३८/२००८**

**१) श्री शरद मारोतराव मानकर**
**सचिव, लोक विकास ग्रामीण बहुउद्येशिय स्वयंसेवी संस्था,**
**बेलोरा, ता.जि. यवतमाळ. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा वैद्यकिय अधिकारी**
**प्राथमिक आरोगय केंद्र, बेलोरा, ता.जि. अकोला. उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २.७.२००८ )**

**नि र्ण य**

तक्रारदार अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ५.११.२००७ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १८ (१) प्रमाणे तक्रार दाखल केलेली दिसून येते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार व उत्तरवादी हजर आहे. तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सुध्दा दाखल केलेले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाचा क्रमांक २३८/२००८ असा आहे. सदरच्या तक्रारीची व व्दितीय अपीलाची सुनावणी एकत्रितरित्या आज घेण्यात आली. व तसे अपीलकर्ता यांनी मान्य केले आहे.

तक्रारदार अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१०.२००७ रोजी शासकिय सार्वजनिक माहिती अधिकारी तथा वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, बेलोरा, पंचायत समिती, यवतमाळ यांचेकडे " सध्या २००७ मध्ये कार्यरत डॉक्टर सहित एकुण कर्मचारी वर्ग. (२) सध्या २००७ मध्ये कार्यरत एकुण कर्मचारी डॉक्टर यांचे निवासी पत्ते व ठिकाण. (३) आरोग्य केंद्राच्या कार्यालयीन वेळा उघडण्याची वेळ व बंद करण्याची वेळ. (४) कार्यालयीन वेळेत कार्यारत असणा-या वा राहणा-या डॉक्टर सहीत एकुण कर्मचारी वर्गाची नांवे." अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरचा अर्ज तक्रारदार अपीलकर्ता यांनी रजिस्टर पोस्टाने वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, बेलोरा, तालुका जिल्हा यवतमाळ, पीन कोड-४४५१०५ असा पत्ता देवून पाठविला होता परंतु सदरचे रजिस्टर पत्र घेण्यास इंकार सबब सेंडर परत असा दिनांक

६.१०.२००६ रोजीचा पोस्टमनचा शेरा दिसून येतो. त्यानंतर तक्रारदार अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१०.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय झालेला नसल्यामुळे त्यांनी दिनांक ५.११.२००७ रोजी व दिनांक ८.१२.२००७ रोजी अनुक्रमे तक्रार व अपील आयोगाकडे सादर केलेले दिसून येते.

प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक ५.१.२००८ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतु अर्जदारास सुनावणीचे पत्र प्राप्त न झाल्याने सुनावणीस उपस्थित राहाणे शक्य झाले नाही. डॉ. कटियार, तत्कालीन वैद्यकिय अधिकारी उपस्थित झाले व त्यांनी जोडपत्र अ नुसार अर्ज प्राप्त न झाल्याचे लेखी निवेदन जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाकडे सादर केले.अर्जदारास पुन्हा संधी देण्याकरीता दिनांक २०.२.२००८ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. अर्जदार उपस्थित झाले. त्यावेळेस जन माहिती अधिकारी तथा वैद्यकिय अधिकारी उपस्थित नव्हते. सदर सुनावणी दरम्यान अर्ज श्री मानकर यांनी वैद्यकिय अधिकारी यांचे कार्यालयाकडून टपाल घेण्याबाबत नकार दिल्याबाबत पुरावा सादर केला होता. वैद्यकिय अधिकारी यांना त्यांच्या सुनावणीस अनुपस्थित राहाण्याबाबत तसेच माहिती देण्यासंबंधात टाळाटाळ करण्याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडून कारणे दाखवा नोटीस देखील बजावण्यात आली. व माहितीच्या अधिकाराअंतर्गत दिनांक ३.१०.२००७ रोजी अर्ज सोबत पाठवून अर्जदारास दिनांक ३.३.२००८ पावेतो माहिती पुरविण्यास आदेश देण्यात आले. सदर कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण देवून वैद्यकिय अधिकारी डॉ. कटियार यांनी जिल्हा आरोग्य कार्यालयास सादर करुन माहितीच्या अधिकारातील अर्ज प्राप्त न झाल्याची बाब समोर केल्याचे दिसून येते. डॉ. कटियार यांची प्राथमिक आरोग्य केंद्र, बेलोरा येथील कारकिर्द पहिलेपासूनच वादग्रस्त राहीलेली आहे. तसेच त्यामध्ये या प्रकरणाचा देखील समावेश असल्याने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दिनांक २.४.२००८ रोजी प्राथमिक आरोग्य, केंद्र बेलोरा येथे स्वत: भेट देवून डॉ. कटियार यांचे कामकाजाबाबत आढावा घेतला होता. तसेच दिनांक ३.४.२००८ रोजी चौकशी समितीची स्थापना करुन चौकशी देखील केलेली होती. सबब चौकशी

अंती डॉ. कटियार यांचे कामकाजामध्ये प्रचंड प्रमाणात अनियमितता असल्याने त्यांना तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, बेलोरा येथील लिपिक श्री गजभिये यांना प्रशासनाने दिनांक ३०.४.२००८ रोजी निलंबित देखील केले आहे. असा खुलासा डॉ. व्ही.व्ही.लोखंडे, जन माहिती अधिकारी तथा वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, बेलोरा यांना सादर केलेला आहे. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच लिपिक श्री गजभिये यांचे विरुध्द निलंबानाचे आदेश दिलेले असल्यामुळे त्यांची विभागीय चौकशी मध्ये तक्रारदार अपीलकर्ता यांचे रजिस्टर पत्र घेण्यास नकार देल्याचे संदर्भामध्ये सुध्दा आरोप लावणे आवश्यक आहे. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविलेली आहे. त्यामुळे तक्रारदार अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. जन माहिती अधिकारी किंवा त्यांचे कार्यालयातील इतर कर्मचारी यांचे विरुध्द जबाबदारी निश्चित केल्याशिवाय तक्रार किंवा अपीलाच्या संदर्भामध्ये शास्ती लादणे विधिवत होणार नाही. मात्र, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी त्याबाबत त्यांचे विरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे विभागीय चौकशी करणे आवश्यक राहील व त्याकरीता तक्रारदार अपीलकर्ता यांची तक्रार व अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) तक्रारदार अपीलकर्ता यांची तक्रार व अपील हे मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक ३.१०.२००७ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) तत्कालीन माहिती अधिकारी तसेच वरिष्ठ लिपिक श्री गजभिये यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० (२) प्रमाणे विभागीय चौकशीची शिफारस करण्यात येत असून अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज घेण्यास नाकारल्याच्या संदर्भामध्ये चौकशी करण्यात यावी व त्याप्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

३) निर्णयाची एक प्रत जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

४) निर्णयाची एक प्रत तक्रारदार अपीलकर्ता व उत्तरवादी यांना पाठविण्यात यावी.

**दिनांक :- २.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७६७/२००८**

**१) श्री राकेश खुशाल भौरजार,**
**डॉ.आंबेडकर वार्ड, मु.पो.सिहोरा,**
**ता.तुमसर, जिल्हा भंडारा. अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी**
**पंचायत समिती, तुमसर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी तथा**
**विस्तार अधिकारी, पंचायत समिती, तुमसर, जिल्हा भंडारा. उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ३.७.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहे.

२) अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी(विस्तार अधिकारी) यांना संबोधून कार्यालय, पंचायत समिती, तूमसर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**<u>आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल</u>** :- " ग्रा.पं.सिहोरा अनु.जाती/जमातीच्या विकासाकरीता सामान्य फंडातून २० टक्के रक्कम खर्च करण्याबाबत तक्रार

(एक) माहितीचा विषय : अ) समाजकल्याण संचालनालय पुणे-१ च्या पत्र क्रं.सकसं/ मावस/ दवसु/निवेदन/कार्यवाही/०६-०७/अ.१२/४०२ दि. २९.११.२००६ ब) मा. जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा पत्र क्रं.डे-१/पीए/तक्रार/मौ.सिहोरा/तुमसर १०७ दि. १९.१.२००७ (दोन) माहिती संबंधीत कालावधी २००६-२००७. (तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन : (१) सादर केलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे केलेल्या चौकशी अहवालाची साक्षांकित प्रत. (२) तक्रारकर्त्यांचे बयाण पत्र साक्षांकित

प्रत. (३) संबंधीत निष्काळजीपणामुळे सचिवावर कोणती कार्यवाही करण्यात आली त्या परिपत्रकाचे झेरॉक्स प्रत. (४) तक्रार प्राप्त झाल्यापासून संबंधीत सचिवासी केलेल्या पत्रव्यवहाराची झेरॉक्स प्रत. (५) सचिवावर संबंधीत तक्रारीवर दंडात्मक कोणती कार्यवाही करण्यात आली." सदरची माहिती वैयक्तिक घेणार. तसेच अर्जदार दारिद्रय रेषेखाली आहे असेही नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुमसर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २६.३.२००७ रोजी देण्यात आलेला असून अपीलकता्र यांनी मागितलेली माहिती ही विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी असा निर्णय दिला आहे. अपीलकर्ता यांना त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.२.२००७ च्या अर्जामध्ये विनंती केल्याप्रमाणे त्यांनी केलेल्या तक्रारीची चौकशीचा अहवाल मागितलेला दिसून येतो. परंतु, त्यांनी केलेल्या तक्रारीची चौकशी ही माहितीच्या अधिकाराचा अर्ज प्राप्त झाल्यावरच करावयास सुरु केलेली दिसून येते. व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाला व ती माहिती दिनांक २७.४.२००७ रोजी उपलब्ध करुन देण्यात आली असे अपीलकर्ता यांनी सांगितले. परंतु त्या त्यांनी मागितलेल्या माहितीशी उपलब्ध करुन दिलेल्या महितीचा संबंध नाही, असे त्यांनी सांगितले. वास्तविक, तक्रार केल्यानंतर त्याबाबतची चौकशी करावयास पाहिजे होती. परंतु, ती न करता ग्राम पंचायत सचिव यांना पत्र पाठवून माहिती विचारण्यात आलेली आहे. व जी माहिती ग्राम पंचायत सचिव यांनी दिलेली आहे ती अपीलकर्ता यांनी दिली. याचा अर्थ तक्रारीची चौकशी झ ाालेली नाही व त्याबाबतचा निर्णय सुध्दा झालेला नाही. वास्तविक त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना कळवावयास पाहिजे होते. परंतु, ३० दिवसांच्या आंत कोणत्याही प्रकारचे उत्तर त्यांना दिलेले नाही हे स्पष्ट आहे. माहिती अधिकारी यांनी विस्तार अधिकारी (पंचायत) यांना जे पत्र दिलेले आहे, यावरुन माहिती अधिकारी यांना सुध्दा विचारलेल्या माहितीचे आकलन झालेले दिसून येत नाही. कोणत्याही अधिकाऱ्याकडे तक्रार आल्यानंतर त्या तक्रारीची चौकशी त्या अधिका-याने करावयाची आहे. व मुळात ही बाबच या प्रकरणात दिसून येत नाही.

व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे पण अर्ज दाखल केलेला दिसून येतो तसेच जिल्हाधिकारी यांचेकडे पण अर्ज दाखल केलेला दिसून येतो. व त्यांच्याच आदेशाप्रमाणे सचिव, ग्राम पंचायत यांस पत्रातून माहिती विचारलेली दिसून यते. प्रथम अपीलीय अधिका-याकडेच गट विकास अधिकारी म्हणून तक्रार केलेली होती व त्याच माहिती अधिका-यास माहिती द्या म्हणून आदेश करतात यावरुन कोणत्या प्रकारे माहितीच्या अधिकारातील अर्ज किंवा अपीलाची हाताळणी होते हे दिसून येते. व त्यामुळे माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी हे दोषा आढळून येतात. परंतु, आज माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी हे हजर नसल्यामुळे त्यांचे शास्तीविषयक म्हणणे ऐकून घेता येत नाही. व त्याकरीता त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशीची शिफारस करणे हे संयुक्तिक राहील. तसेच अपीलकर्ता यांच्या तक्रारीची चौकशी करुन त्याप्रमाणे कार्यवाही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केल्यास अपीलकर्ता यांचा उद्येश सफल होईल, असे दिसून येते. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ३.२.२००७ च्या अर्जामधील मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये संपुर्ण माहिती त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत छायांकित प्रतीचे स्वरुपात विना मुल्या उपलब्ध करुन देण्यात यावी.
२) जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांनी करावयाची आहे.
३) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांना स्वतंत्रपणे पोस्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.
४) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :- ३.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७७३/२००८**

**१) श्री भाऊराव महादेव कावळे,
प्लॉट नं.४६, स्मृती ले आऊट (वसंत विहारचे बाजुला)
दत्तवाडी, पो.वाडी, ता.जि. नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, नागपूर .**

**३) जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, नागपूर. उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ४.७.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२)अपीलकर्ता यांनी दिनांक १७.७.२००६ रोजी माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**माहितीचा विषय** :- " उच्च श्रेणी मु.अ.रिक्त पदाचे त्या पदाच्या संभाव्य वेतनाच्या १० टक्के अतिरिक्त कार्यभार वेतन अदा करण्याबाबत. कालावधी- १) १.०९.९५ ते ०८.०३.९६ पर्यंत ६ महिने ०८ दिवसा. २) १.०४.९६ ते ३१.०१.२००० पर्यंत ३ वर्ष १० महिने असे एकुण ४ वर्ष ४ महिने ०८ दिवस रिक्त पदाचा कार्यभार सांभाळला आहे. मी नियत वयोमानानुसार ३१.१.२००० ला सेवानिवृत्त झालो त्या अगोदर पासून सेवेत प्रत्येक्ष संबंधीतांशी भेट घेऊन लेखी निवेदन देऊन तसेच मा.मु.का.अ., जि.प. नागपूर यांचे आव्हानुसार दि. २५.३.२००६ निवेदन सादर करुन वरील विषयाचे अनुषंगाने अन्याय निवारनार्थ विनंती केली आहे. माझ्या अर्जावर आजपर्यंत झालेल्या दैनिक प्रगतीचा अहवाल मला पाठविण्यात यावा. त्यात माझा अर्ज कोणत्या

अधिका-याजवळ केव्हा पोहचला त्यांच्याजवळ तो किती दिवस पडून राहीला व या कालावधीत संबंधीत अधिका-याने त्यावर काय कार्यवाही केली यांची माहिती मला कळविण्यात यावी.

अर्ज सादर केल्यानंतर नियमानुसार मला केव्हा अतिरिक्त पदाचे वेतन द्यावयास पाहिजे होते. १ अर्ज सादर करुन ४ महिन्यापेक्षा जास्त कालावधी उलटत आहे. तरी मला अतिरिक्त पदाचे वेतन मिळाले नाही. ज्या अधिका-यांनी माझ्या अर्जावर कार्यवाही करणे आवश्यक होते. ज्यांनी ती केली नाही अशा अधिका-यांची नांवे व त्यांच्या पदाबाबतची माहिती मला कळविण्यात यावी.

स्वतःचे काम न करता उलट माझ्यासारख्या सेवानिवृत्त कर्मचा-याला त्रास देणा-या अधिका-यांविरुध्द केव्हा व कोणती कार्यवाही केली जाईल.

अतिरिक्त पदावर त्या पदाच्या संभाव्य वेतनाच्या १० टक्के किंवा दर महिण्याला ५०० रुपये कमीत कमी प्रमाणे उपरोक्त कालावधीचे अतिरिक्त वेतन व्याजासह मला केव्हा मिळेल.

मला न्याय मिळावा हा माझा प्रामाणिक हेतु असून मी मागविलेली माहिती मला साध्या लिफाप्यात पाठविण्यात यावी, ही विनंती. "

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.२००६ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये दिनांक ८.११.२००६ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी अपीलकर्ता यांना दिनांक २१.८.२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच दिनांक २४.८.२००६ रोजी सदर बाबीविषयी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, हिंगणा यांना विचारणा केल्याचे पत्र पाठविले होते व त्या पत्राची प्रत सुध्दा पाठविण्यात आली होती. तसेच सदर माहिती ही गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, हिंगणा स्तरावरील असल्यामुळे गट शिक्षणाधिकारी सुध्दा माहिती अधिकारी आहे. त्यामुळे माहितीच्या अधिकारा अंतर्गत माहिती आपण गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, हिंगणा येथून प्राप्त करावी असे कळवून सदरच्या पत्राची प्रतिलीपी ही गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, हिंगणा यांना दिलेली दिसून येते. परंतु,

अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

सदरच्या अपील अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २१.८.२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली आहे असे जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी यांचे म्हणणे असले तरी सदरचे पत्र अपीलकर्ता यांना दिनांक १६.११.२००६ ला पोस्टाने मिळाले असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच श्री कावळे यांनी विषयांकित अपील मध्ये या कार्यालयाचे पत्र क्रमांक जीपना/प्राथमिक/शिक्षण/पेंशन/९२४८/०, दिनांक ८.११.२००६ चे पत्र मिळाल्याचे मान्य केले आहे. परंतु आपल्या कार्यालयाकडे केलेल्या अपीलामध्ये अपील करण्याचा आधार दोन मधील माहिती अर्ज क्रमांक ९, दिनांक २४.१.२००७ ची माहिती अजून पुरविलेली नाही असे नमूद केले आहे. श्री कावळे यांनी सदर अर्ज गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, हिंगणा यांना सादर केल्याचे दिसून येते. परंतु सदर अर्जावर माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत नमूद केल्याप्रमाणे कोर्ट फी स्टॅाम्प लावलेला नाही व अर्ज विहित नमुन्यात नाही. त्यामुळे सदर अर्जाला माहितीच्या अधिकार अधिनियम अंतर्गत अर्ज म्हणून गणला जाणार नाही. तसेच श्री कावळे यांनी १० टक्के अतिरिक्त वेतन मिळण्याबाबत मा. उपलोकआयुक्त कार्यालयाकडे सुध्दा तक्रार दाखल केली आहे. तक्रारीचे अनुषंगाने त्यांनी सेवा निवृत्ती नंतर अतिरिक्त वेतनाची मागणी केल्यानुसार शासन निर्णयाप्रमाणे या स्तरावर एक वर्षाचे अतिरिक्त वेतन मंजूर करण्याचे अधिकार आहे. त्यानुसार श्री कावळे यांना १ मे १९९५ ते २९.०२.१९९६ या सहा महिन्याचे अतिरिक्त वेदन गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, हिंगणा यांचे धनादेश क्रं.०७०३३३, दिनांक ७.१२.२००७ अन्वये रुपये ३००४ /- अदा करण्यात आलेले आहे. तसेच त्या पुढील सहा महिन्याचे अतिरिक्त कार्यभार वेतन मंजूर करण्याची कार्यवाही गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती हिंगणा स्तरावर सुरु आहे. माहितीचा अधिकार अंतर्गत त्यांनी सादर केलेल्या अर्जानुसार अपीलानुसार श्री कावळे यांना वेळोवेळी माहिती पुरविण्यात आलेली आहे. यामध्ये कुठलीही दिरंगाई झालेली नही. असा खुलासा सादर केलेला आहे.

अपीलकर्ता यांच्या द्वितीय अपील मेमोमधील माहितीचे वर्णन याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, नागपूर जिल्हा परिषद चे माताहात पंचायत समिती हिंगणा

अंतर्गत उ.प्रा.शाळा डिंगडोह देवी, पं.स.हिंगणा, जि.प.नागपूर येथे १) १.९.१९९५ ते दि. ८.३.१९९६ पर्यंत (६ महिने ८ दिवस) २) १.४.१९९६ ते ३१.१.२००० पर्यंत (३ वर्ष १० महिणे) असे एकुण ४ वर्षे ४ महिने ८ दिवस उच्च श्रेणीचे जागेवर प्र.मुख्याध्यापक पदाचा कार्यभार सांभाळला. शासकिय नियमाप्रमाणे त्याबाबत अतिरिक्त वेतन मिळावे म्हणून अनेक वेळा प्रत्यक्ष भेटून व निवेदनाद्वारे मा. गट शिक्षणाधिकारी, पं.स.हिंगणा, मा.शिक्षणाधिकारी (प्राथ.) मा. मुख्य कार्यपालन अधिकारी, जि.प.नागपूर यांचेकडे रितसर विनंती केली. तरीपण दिनांक ३१.१.२००० ला सेवानिवृत्त होवूनही मला न्याय तर मिळालाच नाही पण अपीलीय पत्र अ,ब,क,ड,इ प्रमाणे मला माहिती देण्यात आली नाही, असे माहितीचे विवरण दिलेले आहे. यावरुन अपीलकर्ता यांना त्यांचे अतिरिक्त वेतन मिळावे म्हणून त्यांनी माहितीच्या अधिकारात माहिती मागितलेली दिसून येते. मा. लोकआयुक्त यांचेकडे सुध्दा त्यांनी अर्ज केलेला आहे असेही वर नमूद करण्यात आले आहे. यावरुन त्यांनी त्यांच्या वेतनाच्या संदर्भामध्ये कोणत्या प्रकारची कार्यवाही सुरु आहे ही माहिती हवी आहे व अंतिमतः अतिरिक्त वेतन मिळावे हीच त्यांची प्रामुख्याने मागणी दिसून येत आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणातील माहिती ही ज्या साहित्याच्या स्वरुपात उदा. अभिलेखे, दस्तऐवज, टिपण्या, कागदपत्रे उपलब्ध असतील त्याच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा माहितीचा अधिकार आहे. व त्याप्रमाणे त्यांच्या अर्जाच्या संदर्भामध्ये काय कार्यवाही होत आहे त्याबध्दलची माहिती त्यांना दिनांक २१.८.२००६ च्या पत्राप्रमाणे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यांना ते पत्र विलंबाने मिळाले आहे असे त्यांचे म्हणणे आहे. अर्थात, दिनांक २१.८.२००६ चे पत्र हे दिनांक १६.११.२००६ ला मिळणे अर्थातच, कदाचित सदरचे पत्र हे प्रथम अपील दाखल केल्यानंतरच निर्गमित केलेले असावे. व त्यामुळे तत्कालीन माहिती अधिकारी हे निश्चितच दोषी आढळून येतात व त्याबध्दल त्यांची चौकशी करुन शिस्तभंगाची कार्यवाही करणे हे संयुक्तिक होईल. तसेच अपीलकर्ता यांना त्यांच्या ६ महिन्याचे अतिरिक्त वेतन मिळाले आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. पुन्हा पुढील ६ महिन्याचे अतिरिक्त वेतन चेक तयार आहे तेही त्यांनी सांगितले व उर्वरित अतिरिक्त वेतन संदर्भामध्ये त्यांना किंवा गट शिक्षणाधिकारी यांना अधिकार नसल्यामुळे व शासनास अधिकार असल्यामुळे शासनाकडे सदरचे प्रस्ताव पाठविले आहे असे त्यांचे म्हणणे

आहे. परंतु अपीलकर्ता यांना त्याबाबतची माहिती ही उपलब्ध करुन दिलेली नाही व त्याबाबतची दखल सुध्दा प्रथम अपीलात घेणे आवश्यक होते व ती घेतली गेली नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.८.२००६ चे पत्र हे विलंबाने प्रथम अपील दाखल झाल्यानंतर निर्गमित करण्यात आलेले आढळून येत असल्यामुळे व अपीलकर्ता यांना १६.११.२००६ ला पोस्टाने मिळालेले असल्याने संबंधीत अधिकारी किंवा कर्मचारी यांची विभागीय चौकशी करुन शिस्तभंगाची कार्यवाही करावी. सदरची चौकशी ही मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी करावी

२) अपीलकर्ता यांना त्यांच्या अतिरिक्त वेतनाचे संदर्भामध्ये संपुर्ण माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने देण्यात यावी.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :- ४.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १४९६/२००८**

**१) श्री राजकुमार धर्मराज लांजेवार**
**द्वारा शंकरराव मोटघरे, दसरा रोड,**
**काशीबाई मंदीराचे पाठीमागे (महाल), नागपूर-३२.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे)**
**नागपूर शहर, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे)**
**नागपूर शहर, नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ४.७.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहे.

२) अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी म्हणून अप्पर पोलीस आयुक्त कार्यालय(गुन्हे) यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**<u>माहितीचा विषय</u>** :- "आपले कार्यालयीन पत्र क्रमांक जाक्र/अपोआ/गुन्हे/लो.दी/३१४/०६, दिनांक २०.९.२००६ ला मा. जिल्हाधिकारी, नागपूर हयांचे टोकन क्रमांक ४७५३ परिच्छेद १ अन्वये चौकशी अहवालामध्ये आपण नमूद केले आहे की, धर्मराज लांजेवार हयांनी सौ. पुर्नाबाई रुपचंद भालाधरे हिचेशी दुसरा विवाह केला होता तर त्यांचा दुसरा विवाह सिध्द करणारे दस्ताऐवजांच्या मुळ सत्यप्रती पुरविण्यात याव्यात. (दोन) परी. २ मध्ये पी.एम.भालाधरे हयांचा पोलीस स्टेशनला गुन्हेगार प्रवृत्तीचे कोणतेही गून्हे नाही. भांडण नाही असे कोणी सांगत नाही. तरी पण त्यांचे विरुध्द सुमार ६३/०६ व १०७, ११६(३) प्रमाणे कशी व कोणती कार्यवाही

करण्यांत आली याबाबतचे मुळ दस्तऐवज पुरविण्यात यावेत. (तीन) राजकुमार धर्मराज लांजेवार यांचा पी.एम. भालाधरे यांचेशी घराचे प्रापर्टीचा वाद आहे. तो वाद श्री धर्मराज लांजेवार यांचे प्रापर्टीचा कि सौ. पुर्णाबाई रुपचंद भालाधरे हिच्या प्रापर्टीचा वाद आहे याच्या मुळ दस्ताऐवजांच्या सत्यप्रती पुरविण्यात याव्यात. दिनांक २०.९.२००६ चा पत्र क्रमांक जा.क्रं./अपोआ/गुन्हे/लो.दि./३१४/०६ स्तंभ ३(एक) व दोन प्रमाणे." सदरची माहिती टपालाने घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २८.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. व प्रथम अपीलात सुध्दा निर्णय झालेला नसल्यामुळे द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले आहे. परंतु, जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता यांचे दोनही अर्ज हे त्यांच्या कार्यालयामध्ये अप्राप्त आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, त्यांनी प्रत्यक्ष अर्ज देण्यासाठी प्रयत्न केला होता परंतु घेतला नाही म्हणून स्पीड पोस्टाने दोनही अर्ज दोनही अधिका-यांकडे पाठविले होते. परंतु, त्याकरीता संपुर्ण चौकशी करण्याकरीता माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. २.५.२००८ रोजी मुदत मागितली होती. त्याप्रमाणे पुन्हा आज सुनावणीच्या वेळेस त्यांनी खालीलप्रमाणे आयोगाकडे खुलासा दाखल केला.

" उपरोक्त विषयांकित संदर्भान्वये दि. १९.०६.०८ रोजी आपले कार्यालयात झालेल्या सुनावणीमध्ये अर्जदार यांनी गुन्हे शाखा येथे पाठविलेल्या माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मिळणेबाबत दिलेल्या अर्जातील माहिती विषयी आपण अर्जदार यांना आवश्यक असलेली माहिती देण्याबाबत आदेश केला होता.

अर्जदाराचे म्हणण्यानुसार दि. २०.०१.०७ रोजी गुन्हे शाखा येथे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज केला होता तो गुन्हे शाखा येथे स्विकार न केल्याने अर्जदार यांनी स्पिड पोस्टाने संबंधित अर्ज गुन्हे शाखा येथे पाठविला.

परंतु अर्जदाराचे म्हणण्यानुसार पाठविलेला अर्ज इकडील कार्यालयीन अभिलेखावर प्राप्त झाला नाही. तसेच अर्जदार यांनी सदर माहिती अर्जाविषयीचा पाठविलेला प्रथम अपील अर्ज सुध्दा इकडील कार्यालयीन अभिलेखावर प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

अर्जदार यांनी मागितलेली माहिती ही लोकशाही दिनी दिलेल्या अर्जाचे अहवालासंबंधी आहे. लोकशाही दिनी आलेला अर्जदार यांचा अर्ज चौकशीकामी पो.स्टे. पाचपावली येथे पाठविल्यामुळे तेथील चौकशी अधिकारी पो.नि.पो.स्टे.पाचपावली यांनी चौकशी केली व त्यांनी दिलेल्या अहवालावरुन लोकशाही दिनाचा तक्रार अर्जाचा अहवाल तयार करण्यात आला असून अर्जदार यांनी केलेल्या प्रत्येक अर्जाच्या चौकशीचा अहवाल सारखाच असून प्रत्येक अहवालामध्ये अर्जदाराचे पिता धर्मराज लांजेवार यांनी पहिली पत्नी सोडून गेल्यानंतर घरकाम करणारी पुर्नाबाई हीच्याश्याी दुसरा विवाह केला असे तोंडी समजले आहे. परंतु त्याबाबतचा पुरावा उपलब्ध नाही.

धर्मराज लांजेवार यांचे मृत्यू नंतर पुर्नाबाईची देखभाल करण्याकरीता पुर्नाबाईच्या पहील्या पतीच्या मुलाचा मुलगा पृथ्वीराज भालाधरे हा पुर्नाबाईसोबत धर्मराज लांजेवार यांचे घरी राहत होता. पुर्नाबाईचे मृत्यूनंतर पृथ्वीराज भालाधरे हा धर्मराज लांजेवार यांचे घरी राहू लागला.

त्यामुळे अर्जदार राजकुमार धर्मराज लांजेवार व पृथ्वीराज भालाधरे यांचेमध्ये धर्मराज लांजेवार यांचे प्रापर्टीवरुन वाद चालु आहे.

सदर प्रकरणामध्ये सहा. पोलीस आयुक्त पाचपावली विभाग यांचे कडून अर्जदार राजकुमार ध. लांजेवार यांनी मागितलेल्या माहिती पैकी मुद्या क्रं. २ ची माहिती उपलब्ध झाली आहे. मुद्या क्रं. १ ची माहिती शासकिय मॅरेज ब्युरोशी संबंधित असल्याने उपलब्ध होऊ शकली नाही. मुद्या क्रं. ३ ची माहिती भूमापन अधिकारी यांचे कार्यालयाशी संबंधित असल्याने माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. "

परंतु, जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी ज्या संदर्भामध्ये तक्रार केलेली आहे ती तक्रार त्यांनी लोकशाही दिनामध्ये केलेली होती. व सदरचा अर्ज हा पाचपावली पोलीस स्टेशनकडे चौकशी करीता पाठविण्यात आला होता. त्याबाबत त्यांना पूर्वीच कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यांनी शासनाकडे सुध्दा तक्रार केली होती व शासनाकडे सुध्दा तक्रारीच्या संदर्भामध्ये अहवाल पाठविण्यात आला होता. त्याचप्रमाणे संपुर्ण तक्रारीची चौकशीचा अहवाल

सुध्दा त्यांना उपलब्ध करुन दिलेला आहे. असे असताना सुध्दा त्यांनी माहिती कोणती मागितली याबध्दल त्यांच्या अर्जातील माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांना तक्रारीचा चौकशी अहवाल जो दिलेला आहे, त्यातील लग्न झाल्याच्या निष्कर्षाची मूळ प्रमाणपत्राची छायांकित प्रत अशी मागणी केली आहे. कोणत्याही विवाहाच्या संदर्भामध्ये प्रमाणपत्र हे विवाह नोंदणी अधिकारी यांचेकडे उपलब्ध असते. तसेच प्रापर्टीच्या वादाच्या संदर्भामध्ये मुळ दस्तऐवजाच्या सत्यप्रती मागितलेल्या आहेत. तरी प्रापर्टीच्या वादाच्या संदर्भामध्ये पोलीस चौकशीमध्ये कोणत्याही प्रकारचे मुळ दस्तऐवज हे उपलब्ध नसतात तर चौकशी मध्ये जे वेगवेगळया साक्षीदारांचे बयाण घेतले जातात त्या बयाणा वरुन चौकशी अहवाल तयार करण्यात आलेला असतो. मुळात अपीलकर्त्यांचा हा वाद दिवाणी स्वरुपाचा दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांना दिवाणी न्यायालयामध्ये न्याय मिळवून घेता येईल, असेही माहिती अधिकारी यांनी सांगितले. असे असले तरी माहितीचा अर्ज व प्रथम अपील हे संबंधीत कार्यालयामध्ये अप्राप्त असल्यामुळे व अपीलकर्ता यांचेकडे सुध्दा कोणत्याही प्रकारची पोच नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या कार्यालयास जबाबदार धरता येणार नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :- ४.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७६४/२००८**

**१) श्री राधेश्याम मंगलचंद अग्रवाल**
**मनोहर चौक, ता.जिल्हा गोंदिया.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार**
**तहसिल कार्यालय, गोंदिया.**

**३) जन माहिती अधिकारी तथा अन्न व पुरवठा अधिकारी**
**तहसिल कार्यालय, गोंदिया.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ५.७.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहे.

२)अपीलकर्ता यांनी दिनांक २.१२.२००६ (प्राप्त ४.१२.२००६)रोजी शासकिय माहिती अधिकारी म्हणून अन्न पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया असे म्हणून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** :- " १) महाराष्ट्र शासनाची पब्लीक अपूर्ती करीता गोंदिया जिल्हयात लेव्हीचा तांदुळ (D.P.S.) चालु वर्षामध्ये केव्हा पासून खरेदी चालु आहे. २) गोंदिया जिल्हयात किती ठिकाणवर चालु आहेत. ३) लेव्हीच्या तांदुळ घेणे बध्दल चालु वर्ष करीता शासनाचे जे काही आदेश आहेत त्याची प्रत वगैरे. सर्वाची एक प्रत देण्यात यावी. तसेच लेव्हीचा तांदूळ घेण्याची सर्व माहिती ४८ तासात पाहाणी करीता त्वरीत उपलब्ध करुन देणे बध्दल." सदरची माहिती सर्वसाधारण टपालाने घेणार असे नमूद केले आहे. परंतु सदरचा अर्ज हा तहसिल कार्यालयात दिलेला दिसून येतो. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही

म्हणून दिनांक ५.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३०.४.२००७ रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना दिनांक १६.३.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा निर्णय देवून अपील खारीज करण्यात आले. परंतु, सदरचे १६.३.२००७ चे पत्र हे दिनांक ५.२.२००७ च्या अपीलाप्रमाणे दिसून येते. मात्र, दिनांक ४.१२.२००६ च्या अर्जाच्या संदर्भामध्ये सदरचा अर्ज या कार्यालयास सादर न केल्यामुळे कार्यवाही न झाल्याचे दिसून येते असा खुलासा सादर केलेला आहे.

अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज हा वरिष्ठ अधिकारी यांचेकडे दाखल केला आहे. अपील अर्ज हा कनिष्ठ अधिका-यांकडे दाखल केला आहे व राज्य माहिती आयोगाकडील द्वितीय अपीलामध्ये शासकिय माहिती अधिकारी, म्हणून तहसिल कार्यालय, गोंदिया अन्न विभाग, गोंदिया असा तपशिल दिलेला आहे व त्यामुळे सदरच्या प्रकरणामध्ये अपीलकर्ता यांनीच अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे अर्ज दाखल केला नसल्यामुळे व त्यांना त्यांच्या अपीलाच्या संदर्भामध्ये योग्य तो निर्णय दिलेला असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे त्यांनी अर्ज वरिष्ठ अधिका-याकडे व प्रथम अपील कनिष्ठ अधिका-याकडे दाखल केलेले असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :- ५.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७१५/२००८**

**१) श्री चित्रसेन शालिकराम चांदेकर**
**रा.वरपाखड, नारा रोड, इंदोरा**
**नागपूर- ४४००१४. अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी, नागपू**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**जिल्हा दुग्ध विकास अधिकारी, सिव्हील लाईन,**
**नागपूर. उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ७.७.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२) अपीलकर्ता यांनी दिनांक १५.११.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी म्हणून जिल्हा दुग्ध विकास अधिकारी, डेअरी परिसर, नागपूर यांना मागास वर्गीय पशु व पक्षी पालन सहकारी संस्था मर्या. आमगांव (देवळी), तालुका उमरेड, जिल्हा नागपूर या संबंधातील वर्ष २००४-०५ व २००५-०६ पर्यंतचे ताळेबंद पत्रक (जमा खर्च व्यापारी व नफा तोटा पत्रक) अशी माहिती मागितलेली दिसून यते. सदरची माहिती व्यक्त्ीशः घेणार असे नमूद केले आहे.सदस्य या नात्याने संस्थचे व्यवहाराची माहिती करुन घेणे व उचित कार्यवाही करीता असेही नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १२.३.२००७ रोजी प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपील मेमो मध्ये सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) विभाग, नागपूर या कार्यालयाशी महिती संबंधीत आहे, असे नमूद केलेले दिसून येते.

सदरच्या माहितीच्या अर्जाच्या नुसार व प्रथम अपीलाच्या नुसार जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, नागपूर यांनी दिनांक २८.३.२००७ रोजी आपण मागितलेल्या माहितीच्या संबंधाने संस्थेस माहिती पुरविण्यास कळविले होते. संस्थेकडून आपण संस्थेचे सभासद नसल्याचे कळविले आहे. तसेच आपण संस्थेशी संपर्क सुध्दा साधलेला नाही. तरी संस्थेकडून माहिती उपलब्ध होताच आपण मागितलेली माहिती पुरविण्यात येईल. त्यासाठी आपणास या कार्यालयाशी प्रत्यक्ष संपर्क साधावा लागेल व नियमानुसार माहितीच्या प्रतीची झेरॉक्स फी या कार्यालयात जमा करावी लागेल, याची कृपया नोंद घ्यावी असेही कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २४.५.२००७ रोजी प्रभारी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), नागपूर यांनी अध्यक्ष/सचिव, मागास वर्गीय पशु, पक्षीपालन सहकारी संस्था मर्या. यांना अपीलकर्ता यांच्या दिनांक १५.११.२००६, १४.३.२००७ चे माहितीचे अर्ज व प्रथम अपील तसेच कार्यालयाच्या दिनांक १८.११.२००६ चे पत्र व दिनांक २८.३.२००६ या पत्रांचा संदर्भ देवून आपल्या संस्थेकडून सन २००४-२००५ व २००५-०६ पर्यंतचे वार्षिक हिशोब पत्रक (जमा खर्च व्यापारी पत्रक व नफा तोटा पत्रक) इ. माहिती मागविण्यात आली होती. परंतु, आजही संस्थेकडून माहिती उपलब्ध झाली नाही. आपण श्री चित्रसेन शालीकराम चांदेकर यांना हे पत्र मिळताच ३ दिवसांचे आंत वरील माहिती उपलब्ध करुन द्यावी व त्याची एक प्रत या कार्यालयास पाठविण्यात यावी. सदर्हु माहिती उपलब्ध करुन न दिल्यास यापुढे निर्माण होणा-या कायदेशिर बाबीस आपण स्वत: जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी असे कळवून सदरचे पत्राची प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. परंतु, तरी सुध्दा त्यांनी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज हा जिल्हा दुग्ध विकास अधिकारी यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून दाखल केल्यानंतर दिनांक १८.११.२००६ रोजी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (दुग्ध) नागपूर यांनी अध्यक्ष, मागास वर्गीय पशु पक्षी पालन सहकारी संस्था मर्या. यांना अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती पुरविण्यात यावी व सदरचा अर्ज संस्थेकडे सहपत्र म्हणून पाठविण्यात आलेला दिसून येतो व अपीलकर्ता यांना सदरच्या पत्राची प्रतिलीपी दिलेली दिसून येते. तसेच वर नमूद केल्याप्रमाणे सदरच्या पत्राच्या अनुषंगाने दिनांक १.१२.२००६ रोजी संस्थेचे

अध्यक्ष यांनी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (दुग्ध) यांचेकडे अर्जदार चित्रसेन शालीकराम चांदेकर हे या संस्थेचे सदस्य/सभासद नाही. त्यामुळे माहिती अधिकारा अंतर्गत त्यांना सदर्हु माहिती मागण्याचा अधिकार नाही. संस्थेचे सभासद नसल्याने आपल्या वरील संदर्भीय पत्रातील सूचनानुसार सदर्हु अर्जदार यांनी संस्थेचे कोणतेही अधिकारी/पदाधिकारी यांचेशी संपर्क साधला नाही, असे कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा प्रादेशिक दुग्ध शाळा विकास अधिकारी, नागपूर विभाग, नागपूर यांनी दिनांक २१.३.२००७ रोजी जिल्हा दुग्ध शाळा विकास अधिकारी यांना अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून पत्र दिलेले दिसून येते. तसेच दिनांक २८.३.२००७ रोजी पुन्हा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (दुग्ध) नागपूर यांनी संस्थेचे अध्यक्ष यांना सदरची माहिती कार्यालयात उपलब्ध करुन द्यावी असे पत्र दिलेले दिसून येते. व त्या पत्रावर सहाय्यक निबंधक यांनी सदर संस्थेच्या कार्यालयात माहिती मागविण्यात यावी अन्यथा सदर्हु अधिनियमाच्या अंतर्गत त्यांचेवर कार्यवाही करण्याबाबत आपल्या विभागाकडून पत्र देण्यात यावे, असा दिनांक ९.४.२००७ रोजी शेरा दिलेला दिसून येतो. दिनांक ५.६.२००७ रोजी पुन्हा संस्थेचे अध्यक्ष यांनी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (दुग्ध) यांना अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये दिनांक २४.५.२००७ च्या अर्जाचा संदर्भ देवून त्याबध्दलची माहिती आवश्यक आहे ते प्रयोजना अंतर्गत अर्जदारांनी लिहीलेले प्रयोजन खोटे असून शासनाची दिशाभूल करणारे आहे. कारण ते या संस्थचे सभासद नाही. आपल्या निर्देशानुसार अर्जदाराने सदर्हु माहिती प्राप्त करण्यास संस्थेच्या कोणत्याही अधिकारी/पदाधिका-यांशी अद्याप संपर्क साधला नाही. त्यामुळे त्यांना संस्थेचा व्यवहार माहित करुन घेण्याचा अधिकार नाही. कारण संस्थेचे सदरहू महत्वाचे दस्ताऐवज गैरसभासद गैरसदस्याला उपलब्ध करुन दिल्यास त्याचा दुरुपयोग होऊन संस्थेला फार मोठे नुकसान होण्याची शक्यता टाळता येत नाही असे संस्थेचे मत आहे. तसेच संस्थेची रिट पीटीशन क्रं. १०/०३ अंतर्गत अर्जदार संस्थेचे सभासद नाहीत. संस्थेचा महत्वाचा दस्तऐवज देणे किंवा नाही इत्यादी बाबीबध्दल उच्च न्यायालय नागपूर येथे न्यायप्रविष्ठ प्रलंबीत आहे. सदरहु रिट पिटीशनचा निकाल लागल्याशिवाय त्यातील कोणत्याही प्रतिवादींना संस्थेचे दस्ताऐवज मागता येत नाही असे कळविलेले दिसून येत असून सदरच्या पत्राची प्रतिलीपी अपीलकर्ता यांना

पाठविलेली दिसून येते. त्यानंतर दिनांक २२.६.२००७ रोजी सहाय्यक निबंधक यांनी विभागीय उप निबंधक यांना अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भात वर नमूद केलेल्या सर्व पत्रांचा संदर्भ देवून अर्जदाराला माहिती पुरविण्यासाठी या कार्यालयाकडून संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्याअन्वये संस्थेचे संदर्भित पत्र क्रमांक ५ अन्वये अर्जदाराला माहिती देण्यासाठी उच्च न्यायालय, नागपूर यांनी रिट पीटीशन न्यायप्रविष्ठ प्रलंबित असल्याने निकाल लागल्याशिवाय संस्थेचा दस्ताऐवज देण्यासाठी संस्थेने असमर्थता दर्शविलेली आहे असे पत्र दिलेले दिसून येते व त्या पत्राची प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिलेली आहे.

वर नमूद केलेल्या सर्व पत्र व्यवहाराच्या संदर्भातील आवक जावक नोंदवहीच्या छायांकित प्रती या दाखल झालेल्या आहेत. अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जामध्ये माहिती व्यक्त्ीशः घेणार असे नमूद केले आहे. त्याबध्दल अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी माहिती ही जिल्हा दुग्ध विकास अधिकारी यांचेकडे मागितलेली असल्यामुळे त्यांच्या कार्यालयात त्यांनी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, दुग्ध यांचेशी संपर्क साधला होता. परंतु त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. तसेच संस्थेशी संपर्क साधावयाचे पत्रातून जरी दिले असले तरी संस्थेच्या पदाधिका-यांशी त्यांनी संपर्क साधला नाही त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी ते संस्थेकडे गेलेले नाही. परंतु अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी म्हणून ज्यांचेकडे अर्ज केलेला आहे त्यांनी व त्या कार्यालयानी त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी याकरीता संस्थेस वेळोवेळी पत्र दिलेले आहे. संस्थेने जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध करुन द्यावी असेही पत्र दिलेले आहे. परंतु संस्थेने माहिती उपलब्ध करुन देण्यास वेळोवेळी नकार दिलेला आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. परंतु संस्थेने सदरची माहिती उपलब्ध करुन न दिल्यास संस्थेच्या विरुध्द कार्यवाही करण्यात यावी असेही आदेश पारीत करण्यात आलेले आहे. परंतु संस्थेच्या विरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम या अंतर्गत कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली दिसून येत नाही. त्याबध्दल जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्या कालावधीमध्ये त्यांच्याकडे सहाय्यक उप निंबधक या पदाच्या संदर्भामध्ये प्रभार दिलेला होता व प्रभारी अधिकारी यांना कोणत्याही

प्रकारची कार्यवाही करण्याचे अधिकार नसते व दुग्ध विकास अधिकारी म्हणून त्यांना सुध्दा सहकार अधिनियमानुसार कोणतेही अधिकार नाही व त्यामुळे संस्थेच्या विरुध्द कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही.

वास्तविक, मागास वर्गीय पशु पक्षी पालन सहकारी संस्था मर्या. या संस्थेस शासनाचे आर्थिक सहाय्य आहे असे अपीलकर्ता यांनी सांगितले तसेच जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक यांनी सुध्दा मान्य केले. व त्यामुळे सदरची संस्था ही एक स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी प्रमाणे प्राधिकरण आहे. व त्यामुळे सदरच्या संस्थेने जन माहिती अधिकारी नियुक्त करणे हे त्या संस्थेवर बंधनकारक आहे. परंतु, तसे जन माहिती अधिकारी त्यांनी नियुक्त केलेले नसेल तर सहकार विभागाने सदरच्या संस्थेस जन माहिती अधिकारी नियुक्त करावा याबध्दल आदेशित करणे आवश्यक आहे. व तरीही संबंधीत संस्थेने जन माहिती अधिकारी नियुक्त केला नसेल तर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे त्याप्रमाणे तक्रार करणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती सदरच्या संस्थेकडून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) सदरची माहिती संस्थेने उपलब्ध करुन न दिल्यास संस्थेच्या विरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या प्रमाणे योग्य ती कार्यवाही संस्थेविरुध्द करुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) संस्थेस शासकिय अनुदान असल्यामुळे जन माहिती अधिकारी नियुक्त करण्याचे आदेश सदरच्या संस्थेस देण्यात यावे व संस्थेन जन माहिती अधिकारी नियुक्त न केल्यास तसे आयोगास कळवावे.

४) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :- ७.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७१७/२००८**

**१) श्री गणेश चेपाजी आगाशे**
**कुंभारे कॅालोनी, क्वॉर्टर नं.३२४**
**कामठी-४४१००२, जिल्हा नागपूर.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी**
**पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा (ग्रामिण),**
**कार्यालय, नागपूर.**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ७.७.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२)अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१२.२००६ रोजी राज्य जन माहिती अधिकारी म्हणून पोलीस अधीक्षक, नागपूर (ग्रामिण) यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

**आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** :" एस.पी.ऑफिस, नागपूर यांना दिनांक २५.३.२००५ रोजी सौ. हर्षा गणेश आगासे, रा. कामठी हिला फुसलावून अपहरण केले व दलित कुटंबियांना जिवे मारण्यांची धमकी दिली. वरील संदर्भात पोस्ट रिपोर्ट एस.पी.ऑफिस नागपूर यांना रिपोर्ट देण्यात आला होता. या रिपोर्टवर कोणकोणती कार्यवाही झाली.

अ) एस.पी.साहेब यांनी कोणत्या अंमलदारास कार्यवाहीचे आदेश दिली.

ब) कोणत्या अंमलदाराने कार्यवाही करुन घटना स्थळावर कोणकोणते बयाण नोंदविले.

क) कार्यवाही करुन किती अपराधी यांना पकडून त्यांच्यावर कोणकोणता आरोप ठेवण्यात आला. कलम नं. व केस नं. याविषयी कळविणे.

ड) गुन्हा दाखल करुन कोणत्या न्यायालयात केस चालविण्यात आले आहे.

इ) फुसलावून(पळविणे) अपहरण करणे, दलित कुटूंबियांना जिवे मारण्याची धमकी देणे हा कॅाग्नीझेबल अपराध आहे किंवा नाही.

फ) तपाशी अधिकारी यांने तपास सुरु केला व संपवलेली वेळ.

प) फियार्दी, आरोपी व साक्षीदार हयांच्याकडून गुन्हा बाबतची मिळणारी माहिती.

न) आरोपीचा गुन्हा करण्याचा हेतू कोणता.

ब) गुन्हा नोंदविण्याचा दिनांक व वेळ.

भ) आरोपीचे नांव, अटकेचा दिनांक व वेळ.

म) अपराधाचे ठिकाण. "

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १९.१.२००७ रोजी " आपण माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत मा. पोलीस अधीक्षक, नागपूर (ग्रामिण) यांना केलेला अर्ज या कार्यालयात दिनांक २०.१२.२००६ रोजी प्राप्त झालेला असून आपल्या अर्जात नमूद माहितीबाबत आपणास कळविण्यात येते की, आपण मा. पोलीस अधीक्षक, नागपूर (ग्रामिण) यांना दिलेला दिनांक ३०.११.२००६ चा अर्ज त्यांच्या कार्यालयाचे पत्र क्रमांक नाजीग्रा डी-२८/अर्जशाखा/६२/एसडीपीओ/०६, नागपूर, दिनांक ६.१२.२००६ अन्वये दिनांक ८.१२.२००६ रोजी या कार्यालयात चौकशीकरीता प्राप्त झाला असता आपल्या अर्जातील प्रकरणाबाबत पोलीस निरीक्षक, कामठी यांचा अहवाल, प्रकरणाचे संबंधीत कागदपत्र व चौकशी वरुन मा. पोलीस अधीक्षक, नागपूर (ग्रामिण) यांना अर्जाचा सविस्तर चौकशी अहवाल संबंधीत कागदपत्रासह सादर करण्यात आलेला आहे. आपल्या अर्जासंबंधी मा. पोलीस अधीक्षक यांना अहवाल सादर करण्यात आलेला असून आपल्या माहितीच्या अधिकारा अंतर्गत अर्जातील नमूद कार्यवाही बाबतचे मुद्दे मा. पोलीस अधीक्षक  नागपूर (ग्रामिण) यांचे अधिकार क्षेत्रातील असून आपल्या अर्जासंबंधाने त्यांच्याकडून प्राप्त होणारे निर्देश व आदेशान्वये कार्यवाही बाबत आपणास

कळविण्यात येत " असे उपविभागीय पोलीस अधिकारी, कामठी विभाग, कामठी यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून यते. परंतु सदरच्या उत्तराने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक ३.३.२००६ रोजी पुन्हा प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून पोलीस अधीक्षक, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये पोलीस अधीक्षक यांनी "सदर अपील अर्जामध्ये दिनांक २५.३.२००५ चा अर्ज दिलेला असल्याचे नमूद केले आहे. परंतु कार्यालयाने त्यांच्या पोलीस स्टेशन कामठी येथील अभिलेख्यांची पडताळणी केली असता दिनांक २५.३.२००५ चा अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेला नाही " असे या कार्यालयास कळविण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे दिनांक १३.२.२००७ रोजी पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा (ग्रामिण) नागपूर यांनी माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ अन्वये या कार्यालयात अर्ज प्राप्त झाला असता या कार्यालयाचे पत्र दिनांक २५.८.२००६ अन्वये सविस्तर माहिती आपणास रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आलेली आहे व सदर घटनास्थळ पोलीस स्टेशन पाचपावली हद्यीत येत असल्याने सदर गुन्हयाची डायरी पोलीस स्टेशन नागपूर शहर येथे पाठविण्यात आलेली असून अधिक माहितीची आवश्यकता असल्यास पोलीस स्टेशन पाचपावली यांचेशी संपर्क साधावा. तसेच आपला दिनांक १८.१२.२००६ चा अर्ज प्राप्त झाला असता उपविभागीय पोलीस अधिकारी, कामठी विभाग, कामठी यांस दिनांक ११.१.२००७ व १७.१.२००७ अन्वये दिनांक १६.१.२००७ अन्वये आपणास परस्पर लेखी कळविण्यात आलेले आहे. दिनांक १३.१२.२००६ च्या अर्जाची पडताळणी केली असता आपणास वेळोवेळी व वेळेपुर्वीच माहिती पुरविण्यात आलेली असल्याने सदर अर्ज हा दप्तरी दाखल करण्यात येत आहे, याची नोंद घ्यावी असे कळविण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना या संपुर्ण प्रकरणात माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे हा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. सदरच्या प्रकरणातील सर्व कागदपत्रे ही राज्य माहिती आयोगाचे कार्यालयात दाखल केलेली असून खुलासा सुध्दा दाखल करण्यात आलेला आहे. अपीलकर्ता यांना वेळोवेळी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती सर्व पत्रे सुध्दा दाखल केलेली आहे. तसेच अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ५५/२००७ मध्ये या एकाच प्रकरणाच्या संदर्भामध्ये ७ एप्रिल, २००७ रोजी आयोगाने निर्णय दिलेला असून माहिती दिलेली असल्यामुळे अपील निकाली काढण्यात आलेले

आहे. तसेच पुन्हा अपील क्रमांक ५७०/२००७ हे सुध्दा एकाच प्रकरणाच्या संदर्भात आहे व त्या अपीलाच्या बध्दल सुध्दा विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते.

या संपुर्ण प्रकरणामध्ये अपीलकर्ता यांच्या तक्रारी प्रमाणे जी चौकशी करण्यात आलेली आहे त्या चौकशीच्या संदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. परंतु अपीलकर्ता हे प्रत्येक उपलब्ध झालेल्या माहिती मधून वेगवेगळया प्रश्नांच्या माध्यमातून पुन्हा पुन्हा माहिती मागत असतात असे दिसून येते. पोलीस स्टेशन कडे एफ.आय.आर. दाखल केल्यानंतर गुन्हयाची चौकशी होते व त्या चौकशीच्या नंतरच एकतर कोर्टात पाठविण्यात येते किंवा गुन्हा होत नसेल तर दप्तरी दाखल करण्यात येतात. व त्याबध्दल सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे पुन्हा पुन्हा त्याबध्दल वेगवेगळे प्रश्न उपस्थित करुन तीच ती माहिती मागणे हे कोणत्याही सार्वजनिक व्यापक हिताच्या संदर्भात येत नाही. अपीलकर्ता हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा स्वत:च्या वैयक्तिक हिताच्या करीता गैरवापर करीत आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. माहिती उपलब्ध करुन देणे याचा अर्थ सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याच्या स्वरुपात माहिती उपलब्ध असते उदा. अभिलेखे, दस्तऐवज, परिपत्रके, कागदपत्रे इ.च्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे असे अधिनियमाचे कलम २(१) (च) प्रमाणे अर्थ आहे. वेगवेगळे प्रश्न निर्माण करुन त्यांची माहिती मागणे हे अपेक्षित नाही. व कोणत्याही प्रकारे विश्लेषण करुन मागणे हे अपेक्षित नाही. दिनांक १३.१२.२००६ च्या अर्जामध्ये अपीलकर्ता यांनी जे प्रश्न विचारलेले आहेत त्या प्रश्नांचे अवलोकन केले असता अपराधाचे ठिकाण, गुन्हा नोंदविण्याचा दिनांक व वेळ, आरोपीचा गुन्हा करण्याचा हेतू कोणता वगैरे वगैरे..... हे अर्थातच एफ.आय.आर.मध्ये असतात व ती एफ.आय.आर.त्यांनीच दाखल केलेली आहे. व पुन्हा तीच माहिती मागणे म्हणजे त्या सार्वजनिक प्राधिकरणास वेठीस धरणे असा होतो. कोणत्याही प्राधिकरणास प्रश्न मनात धरुन त्याचे काल्पनिक उत्तराचीच अपेक्षा करणे हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे अपेक्षित नाही व निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास अपीलकर्ता

यांनी उपलब्ध माहितीच्या आधारे सक्षम अधिका-यांकडे किंवा मा. न्यायालयात दाद मागणे हे संयुक्तिक राहील व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना संपुर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे तसेच त्यांचे अपील क्रमांक ५५/२००७ व ५७०/२००७ ही सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे खारीज करण्यात आलेले असल्यामुळे सदरचे अपील सुध्दा खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :- ७.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७१८/२००८**

**१) श्री भोला गरिबदास बैसवारे**
**रा. बैरागीपूरा, नाईक तलाव, नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सभापती**
**नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
**नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ७.७.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.५.२००७ रोजी (प्राप्त) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहे.

२)अपीलकर्ता यांनी दिनांक १५.६.२००६ रोजी " मौजा नागपूर येथली खसरा क्रमांक ४५१ महाराजा डेव्हलपर्स तुळशीबाग नागपूर या योजनेची खालील माहिती देण्याबाबत.

१) सँक्शन प्लॉन के नकाशाची प्रत

२) सँक्शन बिल्डींग परमिट की सत्यप्रत

३) ना.सु.प्र. आणि महाराजा डेव्हलपर यांचेशी झालेला ॲग्रिमेंट

४) प्लॉट रिलिजमेन्ट कापी प्लॉट धारको के नाम सहित देण्यात यावी.

५) बंगलो बिक्री करण्या करीता ना.सु.प्र.द्वारे देण्यात आले नाहरकत प्रमाण पत्राची सत्यप्रत सर्व खरीदीदारो चे नांव व पत्ते सहित. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे."

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १५.७.२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी रुपये ६४/- जमा केल्याची प्रत कार्यालयाला उपलब्ध करुन द्यावी व दस्तऐवज घेवून जावा असे

कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याबाबत, दिशाभूल करणारे पत्र दिले, बंगलो विक्री करण्याकरीता ना.सु.प्र.द्वारे देण्यात आलेले ना हरकत प्रकाणपत्राची सत्यप्रत व भोगवटा प्रमाणपत्राची सत्यप्रत देण्याचे आदेश देण्यात यावे. अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा त्यांच्या अधिकारात असताना माहिती अधिका-या कडून माहिती मला वेळेवर उपलब्ध करुन न दिल्याबाबत कार्यवाही करुन बांधकामांच्या मंजूर नकाशा संबंधी दस्तऐवज व ना.सु.प्र.च्या अधिका-यांच्या नोट शिटची तसेच अभिन्यासाच्या मंजूर नकाशा व यातील दस्तऐवजांच्या नोटींग सह प्रति या माहिती अधिका-यांनी सांक्षांकित मला माहिती पुरवावी, अशी विनंती केलेली आहे.

अपीलकर्ता आज गैरहजर आहे. त्यामुळे त्यांना कोणत्या प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही किंवा कोणत्या प्रकारची माहिती दिशाभूल करणारी आहे याबध्दलचा खुलासा त्यांनी दाखल केला नाही. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.७.२००६ रोजी रक्कम रुपये ६४/- भरणा केलेला असून त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये खसरा क्रमांक ४५१, मौजा नागपूर येथील अभिन्यासाची धारिका तथा उपलब्ध असलेल्या इमारती बांधकाम नकाशाची धारिका पाहाणीसाठी अपीलार्थी यांना सहाय्यक संचालक, नगर रचना तथा माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी. तसेच अपीलार्थी यांनी मागितलेले दस्तऐवज उपलब्ध करुन द्यावे. वरील आदेशाच्या अनुषंगाने सहाय्यक संचालक, नगर रचना तथा माहिती अधिकारी ना.सु.प्र. यांनी अपीलार्थी यांना अभिन्यास नकाशाची संपुर्ण धारिकाची प्रत दिनांक २१.३.२००७ ला उपलब्ध करुन दिली. तसेच इमारत नकाशा संबंधाने सहा. संचालक, नगर रचना, नागपूर महानगरपालिका यांना कळविण्यात आले की, दिनांक १६.८.२००७ रोजी इमारत बांधकाम नकाशाची धारिका ना.म.न.पा.ला पाठविण्यांत आलेली आहे. तेव्हा आवश्यक माहिती अपीलार्थी यांना उपलब्ध करुन कळवावे असे सहा. संचालक, नगर रचना, नासुप्र यांनी दिनांक २८.३.२००७ च्या पत्रान्वये कळविले आहे. व या संपुर्ण घटनाक्रमावरुन असे दिसून येईल की, माहिती अधिकारी किंवा अपीलीय अधिकारी यांनी

माहिती देण्याबाबत जाणून बुजून विलंब केलेला नाही. तसेच वरील संपुर्ण घटना क्रमावरुन असे दिसून येईल की, अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती ही उपलब्ध झालेली असून माहिती उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारची टाळाटाळ केलेली नाही असे दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १५.६.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) निर्णयाची प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :- ७.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७३५/२००८**

**१) श्रीमती पारबताबाई परसराम निमकर**
**नेहरु वार्ड मोहाडी, ता. मोहाडी, जिल्हा भंडारा. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी**
**भू व जल व्यवस्थापन पथदर्शी प्रकल्प, अजनी नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता**
**पेंच पाटबंधारे व्यवस्थापन, उपविभाग कांद्री (जांब) उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १०.७.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.५.२००७ रोजी (कार्यालयात प्राप्त दिनांक २९.५.२००७) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केली आहे. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी हे उपस्थित आहेत. उप अभियंता हे उपस्थित आहेत परंतु ते माहिती अधिकारी नाही. प्रथम अपीलीय अधिकारी हे अधीक्षक अभियंता आहे. परंतु, अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले नसल्यामुळे व ते प्रकल्प अधिकारी यांचेकडे दाखल केलेले असल्यामुळे आयोगाकडून प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांना नोटीस काढण्यात आलेली नाही. अपीलकर्ता यांचे तर्फे श्री धनराज परसराम निमकर हे प्रतिनिधी म्हणून हजर आहेत.

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी, पाटबंधारे पेंच प्रकल्प व्यवस्थापन विभाग कांद्री यांचेकडे पाणी सोडण्याच्या करारनाम्याच्या (शेतक-यांच्या) प्रमाणित प्रती दिनांक १४.१०.२००६ ते दिनांक ३०.१०.२००६ दोन महिनेच्या कालावधीतील माहिती.

१) पाणी सोडण्याच्या करारनाम्याच्या प्रमाणित प्रती.

२) करारानुसार व गरजेनुसार पाणी न सोडण्यामुळे होणा-या नुकसानाची भरपाई मिळण्यासाठी असणा-या अटीची व तरतुदी याच्या प्रमाणित प्रति

३) नुकसान भरपाई कोणाकडून किती दिवसांत मिळेल त्याची अधिकृत माहिती.

माहिती व्यक्तीशः घेणार आहे तसेच टपालाद्वारे हवी आहे असे नमूद केले आहे.

सदरच्या अर्जाच्या प्रमाणे दिनांक १६.१.२००७ रोजी उपविभागीय अभियंता यांनी अपीलकर्ता यांना " मागितलेली मुद्येनिहाय बाबीच्या संबंधामध्ये निरसन केलेले आहे. तसेच पाणी सोडण्याबाबत पत्रकाची प्रमाणित प्रत व्यक्तीगत ठरवून दिलेली नसतात. दिनांक १४.१०.२००६ ते ३०.१०.२००६ हा कालावधी २ महिने होत नाही. आपल्या तक्रार अर्जातील नमून्यात शेतक-यांबध्दलचा संपुर्ण तपशिल नसल्याने माहिती देणे शक्य नाही, " असे कळविलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १२.२.२००६ रोजी प्रकल्प अधिकारी यंचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक २६.२.२००७ रोजी उपरोक्त विषयांकित प्रकरणी अर्ज प्राप्त झालेला आहे. तरी आपल्या शेतीबध्दलचा संपुर्ण तपशिल (खसरा क्रमांक आराजी इ.) बाबत त्वरीत या कार्यालयास कळवावे जेणेकरुन आपण मागितलेली माहिती पाठविणे सोईचे होईल असे प्रकल्प अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांनी शेती बध्दलचा मागितलेला संपुर्ण तपशिल पुरविलेला दिसून येत नाही. मात्र, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपीलामध्ये दिनांक ३.३.२००७ च्या अर्जावरची माहिती दिलेली नाही असे म्हटलेले आहे परंतु सदरच्या अर्जाची कोणतीही छायांकित प्रत आयोगाकडे दाखल केलेली नाही.

अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी हे प्रकल्प अधिकारी आहे व प्रथम अपीलीय अधिकारी हे अधीक्षक अभियंता आहे असे जन माहिती अधिकारी तसेच उपविभागीय अभियंता यांनी सांगितले. अपीलकर्ता यांनी अधिनियमाचे कलम ६(१) प्रमाणे माहिती मागण्यासाठी जो अर्ज केलेला आहे तो उपविभागीय अभियंता यांचेकडे केलेला आहे व प्रथम अपील हे प्रकल्प अधिकारी यांचेकडे केलेले आहे. असे असले तरी उपविभागीय अभियंता यांनी त्यांना दिनांक १६.१.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन

दिलेली आहे व त्यांच्या मुळ तक्रारीच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. तसेच उपविभागीय अभियंता यांनी आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

**खुलासा** - "उपरोक्त संदर्भिय पत्राचे विषयान्वये कळविण्यांत येते की, अपीलकर्ता अर्जदार यांचे कडून मागीतलेलया माहितीचे पत्र या कार्यालयांस दिनांक ९.१.२००७ ला प्राप्त झाले. त्या पत्रात अर्जदाराचे शेतीचा संपूर्ण तपशिल जसे- मौजा सर्व्हे नंबर आराजी इ. तपशील नसल्याने त्यांना कुठल्याबाबतची माहिती अभिप्रेत आहे याचा उलगडा होत नाही. त्यामुळे वरील अर्जाचे संदर्भात या कर्यालयाचे पत्र क्रं. ३२/म./०७ दि. १६.०१.०७ नुसार सर्वसाधारण टपालाद्वारे उत्तर पाठविण्यांत आले. त्याची प्रत सोबत जोडण्यात आली आहे.

अपील क्रं.१७३५ मधील संदर्भ क्रं. १ व ३ नुसार दि. १२.२.०७ व २३.५.०७ चे अर्ज या कार्यालयांस प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे माहिती पुरविण्यांत आलेली नाही. त्या शिवाय अपीलकर्ता यास विभागीय कार्यालयाचे पत्र क्रं. १०८२/०७ दि. २६.२.०७ नुसार माहिती मागण्यात आली होती पण ती सुध्दा त्यांनी दिली नाही.

तसेच अर्जदाराचे या कार्यालयास प्राप्त पत्रातील बाब ब (एक) नुसार पाणी सोडण्याच्या करारनाम्याच्या (शेतक-याच्या) प्रमाणित प्रती. पाणी सोडण्याचा करारनामा होत नसून धान पिकाखालील संपूर्ण क्षेत्राचा करारनामा केला जातो. त्यामुळे पाण्याच्या करारनाम्याच्या प्रती देणे शक्य नाही.

(दोन) १४.१०.०६ ते ३०.१०.०६ या कालावधीत नहरात सोडण्यांत आलेल्या पाण्याच्या रोज रजिस्टरच्या छायांकित प्रती सोबत जोडण्यात आलेल्या आहेत.

(तीन) अर्जदाराचे शेत शाखा मोहाडी अंतर्गत असून हया शाखेत दहेगांव वितरीकेवरुन सिंचन केल्या जाते. याव्यतिरिक्त शाखा हरदोली अंतर्गत लाभक्षेत्रांस म्हणजे कांद्री पुच्छशाखेस विसर्ग सोडावा लागतो. त्यामुळे दहेगांव विरीकेस १५ दिवस व कांद्री पुच्छ शाखा (वितरिका) १५ दिवस या प्रमाणे पाण्याचे पाळी नुसार पाणी देण्यांत येते.

दहेगांव वितरिकेस दिनांक २०.३.२००६ ते ३.१०.२००६ पर्यंत १५ दिवस पाणी देऊन बंद करण्यांत आला व पाळीनुसार दिनांक ३.१०.२००६ ते २३.१०.२००६ पर्यंत १५ दिवस हरदोली

शाखेत म्हणजे कांद्री पुच्छ शाखा (वितरिका) पाणी सोडण्यांत आले. याबाबत नहराचे रोज रजिस्टरच्या छायांकित प्रती सोबत जोडलेल्या आहेत.

वास्तविक पाहाता खरीप हंगामाची मुदत १ जुलै ते १४ ऑक्टोंबर पर्यंतच असते. परंतु कास्तकारांचे हित व पिकांस लागणा-या पाण्याची निकड लक्षांत घेऊन पुन्हा दिनांक २४.१०.२००६ ते ७.११.२००६ पर्यंत नहरास पाणी सोडण्यांत आलेले आहे. आणि त्यानंतर दिनांक ८.११.२००६ पासून खरीप हंगामाचे पाणी पुर्णपणे बंद झाले.

अशा परिस्थितीत व्यक्तीगत एका शेतक-याचे पिकासाठी १४.१०.२००६ ते ३०.१०.२००६ पर्यंत पाणी देणे शक्य नाही. आणि याबाबतीत तरी इतर कोणत्याही कास्तकारांची पाणी न मिळाल्याची तक्रार या कार्यालयांस दाखल झालेली नाही."

वास्तविक, अपीलकर्ता यांना विहित मुदतीत उपविभागीय अभियंता माहिती अधिकारी नसतांना सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. प्रकल्प अधिकारी हे सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी नसताना सुध्दा त्यांनी दिनांक २६.२.२००७ रोजी तपशिलातील माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून अपीलकर्ता यांना कळविले होते. अपीलकर्ता यांनी सदरची माहिती दिनांक ३.३.२००७ रोजी कळविली याबध्दलचा अर्ज आयोगास दाखल केला होता त्या अर्जाची प्रत ही त्यांनी द्वितीय अपीला सोबत जोडलेली नाही. तसेच सदरच्या दिनांक ३.३.२००७ च्या अर्जाची माहिती ही उपविभागीय अभियंता किंवा प्रकल्प अधिकारी यांचेकडे मिळाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे व त्यामुळे त्यांना पुन्हा माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. उपविभागीय अधिकारी यांच्या आयोगापुढील खुलाशामध्ये " पाणी सोडण्याचा करारनामा होत नसून धान पिकाखालील सपुर्ण क्षेत्राचा करारनामा केला जातो त्यामुळे पाठविल्याच्या करारनाम्याची प्रत देणे शक्य नाही. तसेच दिनांक २०.९.२००६ ते ३.१०.२००६ पर्यंत व ४.१०.२००६ ते २३.१०.२००६ पर्यंतच्या पाणी सोडण्यात आल्याच्या संदर्भातील रोज रजिस्टरची छायांकित प्रत त्यांनी आयोगाकडे सादर केली आहे व खुलासा करताना वास्तविक पाहाता खरिप हंगामाच्या मध्ये १ जुलै ते १४ ऑक्टोंबर पर्यंत असते. परंतु कास्तकारांचे हित व पिकांसाठी लागणा-या पाण्याची निकड लक्षात घेवून पुन्हा दिनांक २४.१०.२००६ ते ७.११.२००६ पर्यंत नहराचे पाणी सोडण्यात आलेले आहे व त्यानंतर दिनांक ८.११.२००६ पासून खरिप

हंगामासाठी पाणी बंद झाले व त्यामुळे वैयक्तिक एका शेतक-यांच्या पिकासाठी दिनांक १४.१०.२००६ ते ३.१०.२००६ पर्यंत पाणी देणे शक्य नाही व याबाबत तरी इतर कोणत्याही कास्तकारांची पाणी न मिळाल्याची तक्रार या कार्यालयात दाखल झालेली नाही." यावरुन सुध्दा अपीलकर्ता यांना जी माहिती पाहिजे होती त्याकरीता त्यांनी अधिकची माहिती दिनांक २६.२.२००६ च्या पत्राप्रमाणे उपलब्ध करुन दिलेली असती तर पुढील कार्यवाही ही उपविभागीय अभियंता यांना करता आली असती, असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करण्यात आलेली आहे असेही दिसत नाही कारण शाखा अभियंता, पेच मोहाडी यांना संपुर्ण माहिती त्यांनी मागितलेली दिसून येते व त्याप्रमाणे शाखा अभियंता, पाटबंधारे व्यवस्थापन शाखा मोहाडी यांनी नकाशा सहित उपविभागीय अभियंता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते व या वरुनच आयोगाकडे खुलासा दाखल केलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांना सुध्दा जरी पुढील सर्व माहिती उपलब्ध करुन घ्यावयाची असेल तर त्यांनी प्रकल्प अधिकारी यांचेकडे आवश्यक असलेल्या माहितीची पुर्तता करणे संयुक्तिक राहील व त्यानुसार त्यांना संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे हे योग्य राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ९.१.२००७ च्या अर्जामधील मागितलेल्या माहितीच्या प्रमाणे मुद्येनिहाय त्यांच्या दिनांक २६.२.२००७ रोजी त्यांनी मागितलेल्या माहितीच्या प्रमाणे त्यांनी संपुर्ण माहितीची पुर्ती करावी व त्याप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आंत संपुर्ण माहितीची पुर्तता करावी. तसेच अपीलकर्ता यांनी संपुर्ण माहितीची प्रतिपुर्ती केल्यानंतरच

त्यांना १० दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विना मुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-१०.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७३४/२००८**

**१) श्री रविकांत शालीकराम देशमुख**
**मु.पो.ता.मोहाडी, जिल्हा भंडारा.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, भंडारा, तकीया रोड, गोकुल भवन, भंडारा**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था तालुका मोहाडी, जिल्हा भंडारा.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १०.७.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये प्रथम अपील दाखल केली आहे. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहे.

२) अपीलकर्ता यांनी दिनांक १.३.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था मोहाडी यांचेकडे सो. रिता रविकांत देशमुख यांचे सावकारी परवाना तयार करण्याच्या विलंबाबाबत. कालावधी नोव्हेंबर, डिसेंबर, २००६ पासून माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असेही नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २९.३.२००७ रोजी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था मोहाडी यांनी सौ. रिता रविकांत देशमुख यांनी नवीन सावकारी परवाना करीता अर्ज केला आहे. सदर अर्जासोबत त्यांनी स्वतःचे बयाण व हमी पत्र दिले नाही. यासंबंधी त्यांना दिनांक २८.२.२००७ रोजी पत्र देवूनही बयाण व हमी पाठविलेले नाही. त्यामुळे सावकारी परवाना करीता विलंब झाला आहे असे कळविले. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी पुन्हा दिनांक ९.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा

दिनांक ७.५.२००७ रोजी देण्यात आलेला असून त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती वस्तुनिष्ठ नसल्याचे सकृत दर्शनी दिसून येते. व त्यामुळे प्रथम अपील मान्य करण्यात येत आहे. परंतु प्रथम अपीलीय अधिका-याला दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार नसल्यामुळे अर्जाप्रमाणे मागणी मान्य करणे संयुक्तिक होणार नाही असा निर्णय दिलेला असल्यामुळे अपीलकर्ता यांनी दंडात्मक कार्यवाही करीता राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

प्रथम अपीलाच्या निर्णयाचे अवलोकन केले असता सदर निर्णय हा स्वयंस्पष्ट आहे व त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दिलेली माहिती ही खोटी असहे ह निष्कर्ष जो प्रथम अपीलीय अधिकारी यांनी काढलेला आहे तो बरोबर असल्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम २० (१) प्रमाणे माहिती खोटी दिली ही आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी दोषी आढळून येतात व शास्तीस पात्र राहातात. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे ते अधिनियमाच्या कलम २० (१) प्रमाणे दोषी आढळून येतात व त्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये १०००/- ची शास्ती लादण्यात येत असून सदरची शास्ती त्यांच्या निवृत्ती वेतनातून दरमहा हप्ते ठरवून वसुल करण्यात यावी. सदरची कार्यवाही जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा यांनी करावी व वसुलीची रक्कम ही "**००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार(००७०-०१६-१)**" मध्ये जमा करावी.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-१०.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ७२१/२००८**

**१) श्री अनिल रामभाऊ चोपडे**
**सुर्वे ले आऊट, छोटा ताजबाग, राजे रघुजीनगर**
**नागपूर-४४००२४.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्र.कुलगुरु**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव**
**राष्टसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १०.७.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये प्रथम अपील दाखल केली आहे. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२) अपीलकर्ता यांनी दिनांक १.२.२००८ रोजी कुलसचिव तथा शासकिय माहिती अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर यांचेकडे तक्रार निवारण समितीच्या अंतिम निर्णयाची प्रत, तक्रार क्रमांक १०/९५. माहितीशी संबंधीत कालावधी मे १९८४ ते ऑक्टोंबर १९९५ या कालावधीतील -

१) मे. १९९४ ची ना.वि.ची सेवाजेष्ठता यादी.

२) उच्च शिक्षण सहसंचालक, नागपूर यांचे पत्र क्रं.उशिनाग/२/४०६/९५, दि. १५ फेब्रुवारी १९९५.

३) मा.संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्रं.ना.वि/६१२९/०२/विशि-१ दि. २७.९.२००२ मे १९९४ ची ना.वि.ची सेवाजेष्ठता यादीनुसार पदोन्नती बाबतीत झालेल्या अन्यायाबध्दल न्याय मिळण्यासाठी दि. ४.१०.१९९५ ला तक्रार निवारण समितीकडे केलेली रितसर तक्रार. अशी माहिती मागीतलेली दिसून येते व माहिती व्यक्तीशः आवश्यक आहे असे कळविलेले दिसून येते.

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २५.२.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहितीच्या छायांकित प्रतीकरीता एकुण राशी रुपये २२/- विद्यापीठ परिसर येथील विद्यापीठ लेखा विभागाचे रोख पटलावर भरुन राशी पटविल्याची रोख पावती कुलसचिव व माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास सादर केल्यास आपणांस उपरोक्त माहितीच्या छायाप्रती पुरविण्याची कार्यवाही घेण्यात येईल, असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यावर दिनांक २९.२.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी आवश्यक खर्चाचा भरणा केलेला असल्यामुळे त्यांना दिनांक ४.३.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु ती उपलब्ध करुन घेताना तक्रार निवारण समितीच्या अंतिम निर्णयाची प्रत मिळाली नाही. इतर प्रती मिळाल्या अशी पोच दिलेली दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १९.३.२००८ रोजी प्र-कुलगुरु (अपीलीय अधिकारी) यांचेकडे दिनांक २४.३.२००८ रोजी तक्रार निवारण समितीच्या अंतिम निर्णयाची प्रत मिळाली नाही या कारणास्त प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १२.४.२००८ रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम केलेला असून मागितलेली माहिती प्रत्यक्ष प्राप्त झाली असे जन माहिती अधिकारी यांनी कळविल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते व त्याप्रमाणे दिनांक १४.४.२००८ रोजी अपीलकर्ता यांना सदरचा निर्णय कळविलेला आहे. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपीलकर्ता यांच्या अर्जात मागितलेली माहिती विहित मुदतीत उपलब्ध झालेली असली तरी प्रथम अपीलामध्ये तक्रार निवारण समितीच्या अंतिम निर्णयाची मिळाली नाही असे कारण प्रथम अपील करताना दिलेले दिसून येते. त्याबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जातील आवश्यक असलेल्या माहितीच्या वर्णनामध्ये ३ मुद्यांच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली आहे. त्यामध्ये तक्रार निवारण समितीच्या अंतिम निर्णयाची प्रत ही मागितलेली दिसून येते. " दिनांक ४.१०.१९९५ ला तक्रार निवारण समितीकडे केलेली रितसर तक्रार" अशी माहिती असल्यामुळे तक्रारीची प्रत ही उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु, असे असले तरी त्यांनी माहिती उपलब्ध करुन घेताना तसा

आक्षेप घेतला होता तसेच प्रथम अपीलात सुध्दा वर नमूद केल्याप्रमाणे प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला होता व निर्णयात सुध्दा प्रथम अपील कां दाखल केले याबध्दलचे कारण हे आलेले आहे व त्यावरुन असे स्पष्ट होते की, अपीलकर्ता यांना तक्रार निवारण समितीचा अंतिम निर्णयाची प्रत सुध्दा आवश्यक होती व त्याप्रमाणे ती उपलब्ध करुन देण्यास कोणत्या प्रकारची अडचण आहे काय, असे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांना विचारले असता त्यांनी ती उपलब्ध करुन देण्यात कोणत्याही प्रकारची अडचण नाही असे सांगितले व अपीलकर्ता यांना या अपीलाची सुनावणी सुरु असताना सदरची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. व अपीलकर्ता यांनी तशी पोच दिलेली आहे. व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १.२.२००८ च्या अर्जाप्रमाणे व प्रथम अपीलातील माहिती विहित मुदतीत उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-१०.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७४२/२००८**

**१) श्री  सौ. वैययंती गुर्वे**
**१४, गुरुनानक को.ऑप-हाऊसिंग सोसायटी**
**नारा रोड, जरीपटका, नागपूर-१४.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा व्यवस्थापकिय संचालक**
**संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, ५ वा मजला**
**बॉम्बे लाईफ बिल्डींग, वीर नरीमन रोड, मुंबई -४००००१.**

**३) जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकिय संचालक**
**संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, ५ वा मजला**
**बॉम्बे लाईफ बिल्डींग, वीर नरीमन रोड, मुंबई -४००००१.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ११.७.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये प्रथम अपील दाखल केली आहे. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१०.२००६ रोजी व्यवस्थापकिय संचालक यांना माहिती अधिकारी म्हणून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती स्पीड पोस्टाने घरच्या पत्यावर घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

**माहितीचे स्वरुप** : " १) विदर्भ विकास महामंडळ, नागपूर येथील कर्मचा-यांना पुर्ननियुक्तीने संत रोहिदास चर्मोद्योग व यर्मकार विकास महामंडळात सामावून घेण्यासंबंधी मा. नानाभाऊ पटोले, समिती प्रमुख, सार्वजनिक उपक्रम समिती, महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली झ ाालेल्या दि. १.२.२००६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

२) यानुसार संत रोहिदास महामंडळातील बोर्ड ऑफ डायरेक्टर यांनी घेतलेल्या निर्णयाची प्रत.

३) दि. १.२.२००६ रोजी झालेल्या बैठकीत विदर्भ विकास महामंडळातील कर्मचारी संपूर्ण पात्रता अटीपूर्ण करीत असून त्यांना शासनाच्या कर्ज वाटप व कर्ज वसुली योजनेचा २५ वर्षाचा अनुभव असल्यामुळे अशा कर्मचा-यांना घेण्याचा निर्णय होऊनही, पात्रता प्राप्त कर्मचा-यांना घेण्यात आलेले नाही. याबाबत झालेल्या निर्णयाची प्रत.

४) विविध बंद पडलेल्या महामंडळातील मुलाखती करीता बोलावलेल्या कर्मचा-यांची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे-(लेखापल, वसुली निरीक्षक व जिल्हा व्यवस्थापक यांची वेगवेगळी यादी) अ) बंद पडलेल्या महामंडळाचे नांव ब) कर्मचा-यांचे नाव क) कर्मचा-यांचा मुळ हुद्दा (प्रभारी व अतिरिक्त भार सोडून) ड) कर्मचा-यांची मुळ वेतन श्रेणी इ) कर्मचा-यांचे हयात असलेले मूळ वेतन इ) कर्मचा-यांची पात्रता उ) कर्मचा-यांचे हयात असलेले कामाचे स्वरुप ऊ) कर्जवाटप, कर्ज वसूली किंवा या संबंधी अनुभव

५) मुलाखतीतील विचारलेल्या प्रश्नांची यादी.

६) निवड केलेल्या कर्मचा-यांची माहिती खालील प्रमाणे.

लेखापल, वसूली निरीक्षक व जिल्हा व्यवस्थापक यांची वेगवेगळी यादी. अ) बंद पडलेल्या महामंडळाचे नांव ब) कर्मचा-यांचे नांव क) कर्मचा-यांची पात्रता व अनुभव ड) कर्मचा-यांचे हयात असलेले मुळवेतन श्रेणी इ) कर्मचा-याला देण्यात आलेली पद व वेतन श्रेणी ई) कर्मचा-यांचे नियुक्तीचे स्थान व पत्ता उ) नियुक्तीचे आदेश

७) निवड समितीत असलेल्या अधिका-यांचे नांव, हुद्दा व विभाग

८) निवड समितीने निवड केलेल्या संपुर्ण कार्यवाहीचा, कर्मचा-यांच्या नांवासहित संपूर्ण अहवाल.

९) दिनांक २४.४.२००६ रोजी झालेल्या निवड समितीच्या बैठकीचा अहवाल."

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ७.११.२००६ रोजी अपीलकर्ता यांच्या अर्जातील ९ मुद्यांप्रमाणे मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे उपलब्ध माहिती मुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १२.३.२००७ रोजी अपीली अधिकारी

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले होते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १८.४.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा व्यवस्थापकिय संचालक यांनी दिलेला दिसून येतो. त्यामध्ये पुन्हा दिनांक

१३.४.२००७ चे पत्राचा संदर्भ दिलेला दिसून येतो. सदरच्या उत्तराने अपीलकर्ता यांचे समाधान झालेले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. द्वितीय अपीलाची कारणे मात्र खालीलप्रमाणे दिलेली आहेत.

द्वितीय अपीलाची कारणे : " अ) माहिती मागणी अर्ज दि. ३०.१०.२००६ मधील अनुक्रमांक ४ प्रमाणे विविध बंद पडलेल्या महामंडळातील मुलाखतीकरीता बोलाविलेल्या एकुण १७९ उमेदवारांची सविस्तर माहिती. ब) आपल्या कार्यालयातील भरती करतांना उमेदवार कमीत कमी पदवीधर व संबंधीत कामाचा अनुभव असलेला असावा. अशी महामंडळाची शासनाच्या वित्त व सामाजिक न्यायविभागाची धरणा असतांना संबंधित कामाचा अनुभव नसलेल्या व फक्त एस.एस.सी.पास असलेल्या उमेदवारांची निवड केलेली आहे. म्हणून शैक्षणिक पात्रतेची व अनुभवाची अट शिथिल केल्याचे महामंडळाचे अथवा नियुक्ती समितीचे अथवा शासनाच्या वित्त किंवा सामाजिक किंवा प्रशासन विभागाचे अथवा सक्षम अधिकारी यांनी या संबंधी घेतलेल्या निर्णयाची प्रत. क) एकदा मुलाखतील अपात्र झालेल्या उमेदवारांना पुन्हा त्याच निवड समिती समोर मुलाखतीसाठी बोलाविण्याचा प्रश्नच उदभवत नाही अशा निर्णयाची प्रत. ड) एकदा मुलाखतीला बोलाविलेल्या व हजर न झालेल्या उमेदवारांना अपात्र न ठरविता पुन्हा मुलाखतीला बोलाविण्याच्या निर्णयाची प्रत. इ) माहिती विनामुल्य मिळावी."

अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३०.१०.२००६ च्या अर्जाप्रमाणे मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली असताना सुध्दा त्यांनी प्रथम अपील दाखल करण्याचे कारण काय व द्वितीय अपील सुध्दा दाखल करण्याचे कारण काय हे विचारले असता त्यांनी असे सांगितले की, एकदा मुलाखतीत अपात्र झालेल्या उमेदवारास पुन्हा त्याच निवड समितीसमोर मुलाखतीसाठी बोलाविण्याचा प्रश्नच उदभवत नाही अशा निर्णयाची प्रत. एकदा मुलाखतीला बोलाविले व हजर न झाल्यास उमेदवारांना अपात्र न ठरविता पुन्हा मुलाखतीला बोलाविण्याच्या पत्राची प्रत असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु मुळातच त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये ही माहिती त्यांनी मागितलेली नाही. महामंडळ व निवड समिती या मध्ये फरक आहे व त्यामुळे त्यांना महामंडळाचा निर्णय आहे काय असे विचारले असता महामंडळाचा निर्णय नाही असे त्यांनी उत्तर दिलेले आहे. निवड समितीने घेतलेल्या मुलाखतीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, एकुण

९५ पदांच्या भरतीची प्रक्रिया सुरु असल्यामुळे ती एकच प्रक्रिया होती व त्या प्रक्रियेमध्ये जे अपात्र ठरलेले आहे त्यांना पुन्हा त्याच प्रक्रियेत मुलाखतीस बोलाविण्याचा प्रश्न उदभवत नाही व अशा प्रकारचा निर्णय नसतो. त्यामुळे तशा प्रकारच्या निर्णयाची प्रत त्यांना उपलब्ध करुन देता येणे शक्य नाही. व तसे सुध्दा दिनांक १८.४.२००७ रोजी मुद्या क्रमांक २ च्या संदर्भामध्ये कळविलेले दिसून येते. तसेच " वास्तविक पाहाता आमच्या महामंडळाने जानेवारी, २००५ मध्ये घेतलेल्या मुलाखतीत ११४ उमेदवार मुलाखतीस आले होते. त्यामध्ये तुमचा अंतर्भाव होता. ११४ उमेदवारांपैकी केवळ ३० उमेदवार निवडीसंबंधी पात्र ठरले होते. म्हणजेच ८४ उमेदवार मुलाखतीस अपात्र ठरले. निवड समितीत शासनाचे प्रतिनिधी होते. 'आपली निवड झाली नाही ' म्हणून वारंवार तर्कविसंगत मुद्ये उपस्थित करुन, तुम्ही पुन्हा पुन्हा महामंडळाकडे माहिती विचारता असे दिसून येते. शासनाच्या निर्णयानुसार रिडिप्लॅायमेंटद्वारे निवड समितीने या महामंडळामध्ये जी भरती केली त्याबाबतची उपलब्ध माहिती तुम्हाला माहिती अधिका-यांनी दिलेली आहे. त्यामुळे या संदर्भात पुन्हा आपला अर्ज आल्यास तो दत्परीदाखल केला जाईल, याची नोंद घ्यावी, " असे सुध्दा त्यांना कळविलेले दिसून येते. सदरच्या अपीलाच्या सुनावणी मध्ये जन माहिती अधिकारी यांनी खुलासा केलेला असल्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांना मागितलेली संपुर्ण माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३०.१०.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ७.११.२००६ रोजी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे तसेच दिनांक १२.३.२००७ च्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक १८.४.२००७ रोजी सुपूर्ण निर्णय दिलेला असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-११.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७४६/२००८**

**१) श्री पं.पुनम सियाराम महाराज व्यास**
**कत्थक केंद्र, पो. बॉक्स ४७४,**
**प्राथमिक शाळा शंकरनगर-१०.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अवर सचिव**
**गृह विभाग,मुख्य सचिव का कार्यालय,**
**महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई -४०००३२.**

**३) जन माहिती अधिकारी**
**मुख्य अभियंता, विद्युत वितरण कंपणी, नागपूर शहर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १०.७.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये प्रथम अपील दाखल केली आहे. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.६.२००७ रोजी राज्य जन माहिती अधिकारी म्हणून मुख्य अभियंता, विद्युत वितरण कंपनी यांचेकडे ''२८.११.२००३ संदिग्ध विद्युत कर्मचारी जाँच घटना क्षेत्र की बिजली सप्लाई घटना समय तक बंद करना, संलग्न पत्र की तारीख अनुसार '' अशी माहिती मागीतलेली दिसून येते. माहिती ही व्यक्तीगत घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १०.८.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपील हे अवर सचिव तथा राज्य जन माहिती अधिकारी, गृह विभाग यांचेकडे केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ५.१२.२००६ व ६.१.२००७ नुसार माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरचे प्रथम अपील दिनांक १७.८.२००६ रोजी अवर सचिव, गृह विभाग यांनी " आपल्या वरील नमूद अपील अर्जातील विषय हा उद्योग व कामगार विभागाशी संबंधीत असून सदर मुळ अर्ज आवश्यक कार्यवाहीसाठी माहिती अधिकारी,

उद्योग व कामगार विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे. " दिनांक २५.८.२००६ रोजी उर्जा विभागाने सदरचा अर्ज हा व्यवस्थापकिय संचालक, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी यांचेकडें पाठविला. दिनांक ११.९.२००६ रोजी कार्यकारी अभियंता, कॅाग्रेस नगर डिव्हीजन, नागपूर यांनी अधीक्षक अभियंता यांचेकडे उत्तर पाठविलेले दिसून येते. अंतिमतः दिनांक ५.१२.२००६ रोजी व दिनांक २९.१२.२००६ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरची उपलब्ध करुन दिलेली माहिती ही दिशाभुल करणारी आहे. वास्तविक अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जामध्ये माहितीचा कोणत्याही प्रकारचा तपशिल दिलेला नाही. तसेच प्रथम अपील हे गृह विभागाकडे केले आहे. त्याचा काहीही अर्था अर्थी संबंध नाही. व त्यामुळेच अपीलकर्ता यांचे अर्जाचे संदर्भामध्ये एका कार्यालयाकडून दूस-या कार्यालयाकडे त्याचा प्रवास झालेला दिसतो.अपीलकर्ता यांचे अर्ज व अपील हे माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतूदीनुसार नाहीच. तरी सुध्दा अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्या माहितीमुळे त्यांचे समाधान होत नसल्यास त्यांना दिनांक २८.११.२००३ या दिवशी सायंकाळः ५.३० ते रात्रौ ८.३० वाजेपर्यंत विद्युत पुरवठा खंडीत स्थितीच्या संदर्भामध्ये हिंगणा सब स्टेशन मधून जो विद्युत पुरवठा खंडीत झाला त्याबध्दलचा सर्व त्या दिवशीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती तसेच त्या दिवशी सेवेत कार्यरत असलेल्या कर्मचारी/अधिकारी यांची यादी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक १५.६.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने हिंगणा उप केंद्राच्या कार्यालयातील दिनांक २८.११.२००३ रोजीच्या विद्युत पुरवठा खंडीत होण्याच्या संदर्भामध्ये असलेल्या अभिलेख्याची छायांकित प्रत हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विना मुल्या उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच अपीलकर्ता यांच्या अर्जात दिनांक २८.११.२००३ रोजी हिंगणा उप केंद्रात कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचारी यांची यादी

अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

२)	निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-११.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -

अपील क्रमांक १७३३/२००७

१) श्री राजू किशन वानखेडे
रा.श्रीराम वार्ड, बल्लारपूर, जि. चंद्रपूर — अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव
थापर को.एज्युकेशन सोसायटी बल्लारपूर पेपरमिल कॅालनी
पो. बल्लारपूर पेपरमिल ४४२९०१, जिल्हा चंद्रपूर.
३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
थापर को.एज्युकेशन सोसायटी बल्लारपूर पेपरमिल कॅालनी
पो. बल्लारपूर पेपरमिल ४४२९०१, जिल्हा चंद्रपूर. — उत्तरवादी

अपील क्रमांक १७३६/२००७

१) देवराव व्यंकटेश शोभणे
१७८, एन.आय.टी.लेआऊट, त्रिमुर्तीनगर,
रिंग रोड, नागपूर-२२ — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव (प.दु.म.)
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्य व्यवसाय विकास विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई -३२.
३) जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्य व्यवसाय विकास विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई -३२. — उत्तरवादी

अपील क्रमांक १७३७/२००७

१) देवराव व्यंकटेश शोभणे
१७८, एन.आय.टी.लेआऊट, त्रिमुर्तीनगर,
रिंग रोड, नागपूर-२२ — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त (प्रशासन)
आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास यांचे कार्यालय
खान अब्दुल गफफार मार्ग, वरळी सि फेस मुंबई-१८
३) जन माहिती अधिकारी तथा जन संपर्क अधिकारी
आयुक्त दुग्ध व्यवसाय विकास यांचे कार्यालय
खान अब्दुल गफफार मार्ग, वरळी सि फेस मुंबई -१८. — उत्तरवादी

<u>अपील क्रमांक १७४०/२००७</u>

१) सौ. सुनिता नारायण जोशी
प्लॅाट क्रं. ७०, द्वारा श्री के.के.कहाले,
पी ॲन्ड टभ्. कॅालनी प्रताप नगर, नागपूर-४४००२२ अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप सचिव
सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
३) जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई -३२. उत्तरवादी

<u>अपील क्रमांक १७५२/२००७</u>

१) श्री भिमराव गणूजी वानखेडे
प्लॅाट नं. २९, ठवरे कॅालोनी, नवीन सुभेदार ले आऊट,
नागपूर-२४. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी
शिक्षण उपसंचालक कार्यालय, नागपूर
३) जन माहिती अधिकारी
शिक्षण उपसंचालक कार्यालय, नागपूर. उत्तरवादी

<u>अपील क्रमांक १७५६/२००७</u>

१) श्री अशोक बालाराम बोपचे, सहशिक्षक
द्वारा अनिल बोपचे, विविक कॅालोनी, कब्रस्थान जवळ,
बालाघाट रोड, गोंदिया, जि. गोंदिया अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मा. सचिव,
अशोक शिक्षण संस्था, गोंदिया.
३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
संत कबीर हायस्कुल, सिवनी, पो. दासगांव,
ता.जि. गोंदिया. उत्तरवादी

<u>अपील क्रमांक १७७०/२००७</u>

१) श्री रविंद्र खुशरंग जिभकाटे
आय.पी.सी.एल कर्मचारी कॅालोनी,
क्वार्टन नं. बी-१/२० रहाडी, ता.मौदा, जिल्हा नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी
(पंचायत) जिल्हा परिषद, नागपूर.
३) जन माहिती अधिकारी तथा खंड विकास अधिकारी,

पंचायत समिती, मौदा, जिल्हा नागपूर. उत्तरवादी



अपील क्रमांक १७७१/२००७

१) हरिश्चंद्र संतोषराव आस्वले
मु.रहाडी, पो.ता. मौदा, जिल्हा नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी
(पंचायत) जिल्हा परिषद, नागपूर.
३) जन माहिती अधिकारी तथा खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, मौदा, जिल्हा नागपूर. उत्तरवादी

अपील क्रमांक १७८२/२००७

१) श्री अजयकुमार महादेवराव पंचबुध्दे
कारागीर क पेंटर, विभागीय कार्यशाळा
इमामवाडा रोड, घाट रोड, नागपूर अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक
प्रादेशिक कचेरी मध्यवर्ती बसस्थानक जवळ
गणेशपेठ, नागपूर.
३) जन माहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक,
गणेश टेकडी, रेल्वे स्टेशन जवळ, नागपूर. उत्तरवादी

अपील क्रमांक १७८५/२००७

१) श्री मोहनलाल चुन्नीलाल जाट
रा. आष्टी, तालुका भातुकली
जि. अमरावती. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक
भूमि अभिलेख कार्यालय, अमरावती.
३) जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक
भूमी अभिलेख, ता. भातकुली, जिल्हा अमरावती. उत्तरवादी

तक्रार क्रमांक १७१/२००७

१) श्री प्रमोद बळीरामजी ढगे,
रा. नवी शुक्रवारी फवारा चौक वार्ड नं. ७७
राम कुलरचे मागे, हनुमान मंदीरासमोर, नागपूर. तक्रारदार

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर आयुक्त
महानगर पालिका, नागपू
३) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक,
नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर. गैरतक्रारदार

**<u>अपील क्रमांक १८११/२००७</u>**

**१) तातोबा रतिराम तुमसरे**
**४८ सन्मार्गनगर हुडकेश्वर रोड, नागपूर** **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक दुग्धशाळा विकास अधिकारी**
**प्रादेशिक दुग्धशाळा विकास अधिकारी कार्यालय,**
**W.C.L. कार्यालयजवळ सेमिनरी हिल्स, नागपूर**

**३) जन माहिती अधिकारी तथा महाव्यवस्थापक**
**शासकिय दुध योजना, सेमिनरी हिल, नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ९.७.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

वरील सर्व अपीलांमध्ये व तक्रारी मध्ये सर्व अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झालेली आहे व त्यामुळे सदरचे अपीले व तक्रार संबंधाने पुढील कार्यवाही न करता संबंधीत अपील व तक्रार ही निकाली काढण्यात यावे, असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे सर्व अपीले व तक्रार ही निकाली काढण्यात येत आहे.

**दिनांक :-९.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७५४/२००८**

**१) श्री नामदेव महादेवराव इंगोले**
**रा. बोरगांव, C.P.W. क्वॉटर काटोल रोड,**
**गोरेवाडा टॅंक रोड, नागपूर-१३** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी**
**पंचायत समिती, सावनेर, जिल्हा नागपूर**

**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्राम पंचायत पाटणसावंगी, ता. सावनेर, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १४.७.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये प्रथम अपील दाखल केली आहे. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.८.२००६ रोजी " पाटणसावंगी वार्ड नं. ४ प्लॉट नं.२, नगर भूमापन क्रं. १०४ प्लॉट अर्ज यांचे नांवे असता गंगाधर जयसिंग देवीसिंग पवार यांचे नावाने कधी व कसा का लावला याचे संपुर्ण रेकार्ड वरील वार्ड ४ प्लॉट क्रं. २ ची पूर्ण वरील फेर फार माहिती देण्यात यावी " असे नमूद करुन माहिती मागितलेली दिसून येते. दिनांक १.३.२००५ व १७.५.२००५ चे संदर्भ पत्रानुसार त्याबाबत दिनांक कळविला. संबंधीत पत्र दिनांक ५.७.२००६ ला दिले होते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २६.९.२००६ रोजी ग्राम विकास अधिकारी तथा माहिती अधिकारी यांनी ग्राम पंचायत पाटणसावंगी येथी उपलब्ध असलेल्या रेकार्ड नुसार

१) सिव्हील कोर्ट आदेशाची प्रत १२ पाने

२) करा बध्दल पावती. पावती क्रमांक २४,०९१,५७,४०,६१,१८,१९,१८,४२,५९,८५,४०,६०८,६१९, दि.३.३.२००५ ची प्रत, ७०५, ८१८

३) कर आकारणी यादी प्रत दिनांक ८.२.१९८९ सन १९५० ते १९८८ (तीन प्रती)

४) प्रोसिडींग बुकाची झेरॉक्स प्रत, मासिक सभा दिनांक ३०.९.१९९९ च्या २ प्रती. एकुण ३५ प्रती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ७.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक १८.५.२००७ रोजी माहिती ग्राम पंचयतीनी दिनांक २६.९.२००६ रोजी आपणास सादर केलेले आहे, असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे पुन्हा उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी सिव्हील कोर्टाच्या आदेशाची प्रत, कर आकारणी बध्दलची पावती, प्रोसिडींग बुकाची झेरॉक्स प्रत वगैरे आयोगाच्या निदर्शनास आणले. न्यायालयाच्या संपूर्ण उपलब्ध करुन दिलेल्या आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी दिवानी न्यायालयामध्ये प्रतिवादीनी त्यांच्या जागेवर अतिक्रमण केलेले आहे अशा प्रकारचा दावा केलेला होता. व त्यात मनाई हुकूम मागितला आहे. परंतु दिवाणी न्यायालयाने अपीलकर्ता यांचा मनाई हुकूम अर्ज हा फेटाळून लावलेला होता. त्याविरुध्द अपीलकर्ता यांनी अपील केले होते. परंतु सदरचे अपील सुध्दा फेटाळून लावलेले दिसून येते. व त्यामुळे ग्राम पंचायत मध्ये मासिक सभेमध्ये कोर्टाच्या निकालाच्या संदर्भात निर्णय घेवून फेर फार करण्यात आलेले दिसून येते.

अतिरिक्त सरकारी वकील, नागपूर यांचे अभिप्राय हे महसुल निरीक्षक सि.टी. सर्व्हे यांनी मागितले होते. व त्याप्रमाणे अतिरिक्त सरकारी वकील यांनी, महसुल निरीक्षकानी स्वतंत्रपणे सुनावणी घेवून निर्णय द्यावा, असे मत व्यक्त केलेले आहे. व त्यामुळेच अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, अतिरिक्त सरकारी वकील किंवा महसुल निरीक्षक यांना कोर्टाचा निर्णय मान्य नसतांना फेर फार कसे केले. परंतु, महाराष्ट्र जमीन महसुल संहिता, १९६६ प्रमाणे फेर फार कार्यवाही ही स्वतंत्रपणे केली जाते व दिवाणी न्यायालयामध्ये त्या अभिप्रायाच्या आधारावर कब्जाचे संदर्भात निर्णय दिला जातो. व हया दोनही प्रक्रिया स्वतंत्र आहेत. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यांना महसुल निरीक्षकानी त्यांच्या बाजूने निर्णय दिलेला असल्यामुळे त्या निर्णयाची प्रत व अर्ज हा ग्राम पंचायत मध्ये करुन तसेच नगर भूमापन खात्याकडे करुन

त्याप्रमाणे त्यांना त्यांच्या वडीलांच्या किंवा त्यांच्या नांवावर फेर फार करुन घेता येईल. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे १९९९ मध्ये ज्या फेर फारची नोंद घेण्यात आली, त्याबध्दलची माहिती जी उपलब्ध होती ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक २९.८.२००६ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-१४.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७५५/२००७**

**१) श्री रामसागर पुंडलीक पिलेवान**
**८३, हिंदुस्थान कॅालनी, वर्धा रोड,**
**नागपूर- ४४००१५.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख**
**भंडारा, ता. जि. भंडारा.**

**३) जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक**
**भूमि अभिलेख, पवनी, जिल्हा भंडारा.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १५.७.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये प्रथम अपील दाखल केली आहे. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.२.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा उप संचालक, भूमि अभिलेख कार्यालय, नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत डाकेने घेणार असे नमूद केले आहे.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : " मौजा पवनी जिल्हा भंडारा न.भू.क्रं.२३८२ शिट क्रं.२७ अन्वये वडीलोपार्जित असलेली मालमत्ता क्षेत्र २८५.१ चौ.मि.पैकी श्री दुर्योधन पिलेवान व इतर हयांनी ४४.६२ चौ.मि. ७४.२५ चो.मि. क्षेत्र तसेच दयाराम व्यंकटी पिलेवान हयांनी ३३.० चौ.मि.क्षेत्र विकल्यामुळे पुंडलीक पिलेवार हयांच्या नांवे आखिवपत्रिके नुसार न.भू.क्रं.२३८२/२ अन्वये १७ चौ.मि.क्षेत्र मूळ क्षेत्रातून कमी करण्याबाबत २) आखिव पत्रिका न.भू.क्रं.२३८२/२ क्षेत्र १७ चौ.मि. मिळण्याबाबत ३) मोजणी मामला क्रं. ५६५/९२ विकलेले क्षेत्र १७ चौ.मि. क्षेत्र व शिल्लक क्षेत्र व त्यांचे सिमांकन हयाची नोंद घेवून व तशी दुरुस्ती करुन सुधारित मोजणी मामला क्रं.५६५/९२ ची साक्षांकित सत्यप्रत मिळण्याबाबत ४) बनावट आखिव पत्रिका ८८

चौ.क्षे.असलेली व त्यावर दुरुस्ती करुन सुधारित आखिव पत्रिका रद्द करण्याबाबत ५) मूळ दस्ताऐवजाची हेराफेरी करुन बनावट एस्ताऐवज केल्याबध्दल गैरअर्जदार व संबंधीत कर्मचारी हयांच्यावर कार्यवाही करण्याबाबत. ६) अर्जदाराच्या मालमत्तेची गैरअर्जदाराने घर फोडी करुन व अफरातफर करुन रुपये २५००० झालेली नुकसान भरपाई भूमि अभिलेख खात्याकडून मिळण्याबाबत व अर्जदाराला त्यांच्या जागेचा ताबा मिळण्याबाबत.

माहितीचा विषय : १) माननीय तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख पवनी हयांचे दिनांक १२.१२.२००५ च्या पत्रानुसार अर्जदारांनी विषयांकित प्रकरणी मा. उपसंचालक, भूमि अभिलेख नागपूर यांना दिनांक ७.४.२००६ रोजी सादर तक्रारीवर व मा.श्री ता.मा.कोंल्हेकर, अवर सचिव, महसुल व वन विभाग मंत्रालय, मुंबई -३२ यांचे पत्र क्रं.संकीर्ण १००६/प्र.क्र.२३/ल-१ दिनांक ६.११.२००६ चे अर्जदाराला कळविलेल्या पत्रानुसार मा. तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, पवनी हयांनी केलेला चौकशी अहवाल संबंधितांचे बयान गैरअर्जदाराचे बयान व जोडलेली कागदपत्रांची सत्यप्रत व सदर तक्रारीवर आपण घेतलेल्या निर्णयासहित केली असलेल्या कार्यवाहीची सत्यप्रत पुरवावी."

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३.३.२००७ रोजी कार्यालय अधीक्षक, उप संचालक भूमि अभिलेख यांनी तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांना अपीलकर्ता यांच्या दिनांक ८.२.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून अर्ज हा हस्तांतर केलेला असून अपीलकर्ता यांनी सुध्दा नियमाप्रमाणे नक्कल फी भरुन तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, पवनी कार्यालयाकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक ८.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांना तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख यांनी रितसर शासकिय फी भरुन पाहिजे असलेल्या अभिलेख्याची नक्कल घेवून जावीत असे कळविलेले दिसते. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००७ रोजी परस्पर कार्यालयामध्ये टपालामध्ये अर्ज दिला. नंतर मात्र, दिनांक २.४.२००७ रोजी कार्यालयात येवून त्यांनी माहिती प्राप्त करुन घेतलेली आहे. नंतर अपीलकर्ता यांनी पुन्हा उप संचालक, भूमि अभिलेख यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु त्या अपीलाची प्रत आयोगाकडे दाखल केली नाही. त्या प्रथम अपीलाचा उल्लेख हा दिनांक २.४.२००७ रोजीच्या अधीक्षक भूमि

अभिलेख, भंडारा यांनी माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख यांना दिलेल्या पत्रात केलेला दिसून येतो. सदरच्या पत्रामध्ये दिनांक ९.४.२००७ रोजी अपील सुनावणीसाठी तारीख दिलेली आहे, असे दिसून येते. सदरच्या पत्राची प्रतिलीपी ही अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. त्यानंतर दिनांक २३.४.२००७ रोजी पुन्हा द्वितीय अपील अधिकारी उप संचालक, भूमि अभिलेख यांचेकडे अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १५.५.२००७ रोजी कार्यालय अधीक्षक उप संचालक यांनी अपीलकर्ता यांना दिनांक २१.५.२००७ रोजी सुनावणीस उपस्थित राहावे असे पत्र दिलेले दिसून येते. उप संचालक भूमि अभिलेख यांनी दिनांक ४.६.२००७ रोजी अपीलकर्ता यांच्या दिनांक २३.३.२००७ व २.४.२००७ रोजीच्या अपीलांचा संदर्भ देवून निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयामध्ये अपीलार्थी श्री रामसागर पिलेवान यांनी त्यांच्या प्रकरणाच्या अनुषंगाने केलेला युक्तिवाद तसेच अधीक्षक भूमि अभिलेख, भंडारा कार्यालयातील संबंधीत अभिलेख व प्रकरणाची धारिका विचारात घेता अर्जदार यांनी त्यांच्या नांवाची नोंद अभिलेख्यामध्ये करुन घेणे कामी अधीक्षक, भूमि अभिलेख, भंडारा यांचेकडे रितसर अपील अर्ज दाखल करावा. अपीलार्थी यांनी अधीक्षक, भूमि अभिलेख, भंडारा यांचेकडे प्रकरणी नियमानुसार महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ अंतर्गत अपील दाखल करावे, ही बाब सुध्दा दिनांक १६.४.२००७ चे निर्णयात सुध्दा अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेली दिसून येते. तरी पण अपीलकर्ता यांनी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ नुसार अपील दाखल केलेले नाही. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी दिनांक २६.३.२००७ रोजी लोकशाही दिनामध्ये अर्ज दाखल केलेला दिसून येतो. दिनांक १८.४.२००६ रोजी सुध्दा अपीलकर्ता यांना तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख यांनी पत्राने माहिती कळविलेली दिसनू येते. थोडक्यामध्ये अपीलकर्ता यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदींच्या माध्यमातून प्रकरणातील निर्णय प्रक्रियेच्या संदर्भातील गुणवत्तेच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन पाहिजे, असे दिसून येते.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (च) प्रमाणे "माहिती" या संज्ञेचा अर्थ कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणात ज्या साहित्याच्या स्वरुपात उदा. अभिलेखे, कागदपत्रे,

दस्तऐवज, टिपण्या, परिपत्रके इ.च्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध असते त्याच्या छायांकित प्रती जसेच्या तसे प्रति उपलब्ध करु घेणे असा माहितीचा अधिकार आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे कोणत्याही प्रकरणाच्या निर्णय प्रक्रियेच्या बाबत कार्यवाहीची मागणी ही अधिनियमाच्या तरतूदींशी सुसंगत नाही. व अपीलकर्ता यांची मागणी तशाा प्रकारची दिसून येते. फेर फार नोंदीबाबत जे निर्णय त्यांना माहितीचे अधिकारातून करुन घेण्याचे दिसते वास्तविक, अपीलीकर्ता यांना त्यांच्या प्रकरणातील सव्र माहिती आतापर्यंत तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख व उप संचालक, भूमि अभिलेख यांनी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या प्रमाणे कार्यवाही ही पुर्ण झालेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ८.२.२००७ च्या अर्जाप्रमाणे तसेच दिनांक २३.४.२००७ च्या प्रथम अपीलाच्या प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-१५.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १५४४/२००७**

**१) श्री गजानन मधुकर इंगळे,**
**रोकडीया हनुमान नगर, शेगांव**
**ता.शेगांव, जिल्हा बुलढाणा. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी**
**अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती,**
**आदिवासी भवन, गिरीपेठ, नागपर.**

**३) जन माहिती अधिकारी**
**अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती,**
**आदिवासी भवन, गिरीपेठ, नागपर. उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १५.७.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये प्रथम अपील दाखल केली आहे. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमतीने गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२००६ रोजी माहिती अधिकारी, अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते, ती येणेप्रमाणे - " अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती नागपूर कडे अनुसूचित ठाकूर ठाकर जमातीचा दावा करणा-या उमेदवाराची प्रलंबित प्रकरणाची यादी (नांव, पत्ता, दाखल दिनांक) (२) समितीकडे ठाकूर, ठाकर जमातीचा जात प्रमाण पत्राकरीता अपील प्रकरणाची यादी. (३) नागपूर समिती द्वारा समितीच्या स्थापनेपासून ठाकूर, ठाकर जमातीचा दावा नाकारलेल्या प्रकरणाची यादी (नांव, पत्ता नाकारण्याचे कारण) (४) नागपूर समितीद्वारा ठाकूर, ठाकर जमातीचा दावा केलेल्या उमेदवाराला वैधता प्रमाणपत्रे दिलीत, त्यासंबंधीची यादी, नांव,

पत्ता, वैधता प्रमाणपत्र क्रं. माहिती. वैधता प्रमाणपत्र प्रलंबीत प्रकरणाची यादी तसेच अपील प्रकरणाची यादी. नाकारलेल्या प्रकरणाची यादी. नागपूर विभागातील अनुसूचित ठाकूर जमातीच्या लोकांनी १९५० पूर्वीचे महसुली पुरावे दिल्यानंतरही वैधता प्रमाण पत्र दिल्या जात नाही. कागदपत्रे योग्य असली तरी संस्कृती न जुळल्यामुळे वैधता प्रमाणपत्र नाकारल्या जाते. माना समाजाच्या प्रकरणात हे सिध्द झाले की, प्रत्येक एन्ट्री स्वतंत्र आहे. प्रत्येक एन्ट्री मध्ये कामा दिलेला आहे त्यामुळे एकमेकाशी अफिलिटी दाखविण्याची गरज नाही ही सूचना असूनही अन्याय संपता संपत नाही. त्यामुळे संघटनेला उपरोक्त ४ मुद्यांची माहिती त्वरीत पाठवावी."

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २२.१२.२००६ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) व कलम २ (झ)(एक) नुसार माहिती व अभिलेख या अर्थसंज्ञेनुसार कोणताही दस्तऐवज हस्तलिखित फाईल असा होतो. तेव्हा शासनाच्या अभिलेख्यमध्ये उपलब्ध असलेली माहिती ही कागदपत्राच्या स्वरुपात पुरविणे अपेक्षित आहे. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक ३.५.२००७ रोजी अपील विहित कालावधीत न दाखल केल्याने आपले अपील फेटाळण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये उत्तरवादी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

" उक्त अपीलकर्ता श्री गजानन मधुकर इंगळे व त्यांचे बंधु श्री राजू मधुकर इंगळे यांनी मागितलेली माहितीमध्ये साम्यता आहे. मा. राज्य माहिती आयुक्त यांनी अपील क्रं. ६४३/२००७ दिनांक २६.३.२००८ अनवये खालील आदेश पारित केले आहे.

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना उत्तरवादी यांनी त्यांचे कार्यालयातील प्रमाणपत्र तपासण्यासाठी आलेल्या अर्जाच्या नोंदणी वहीमधून(ठाकूर) जमातीच्या उमेदवारांच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता यांनी तपासणी अंती छायांकित प्रति विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. सदरची माहिती उपलब्ध करुन घेण्याचे दृष्टीने अपीलकर्ता यांनी उत्तरवादी यांचे कार्यालयात वेळ व तारीख कळवून प्रत्यक्ष हजर होऊन नोंदणी वहीच्या अभिलेख्याची १९९२ ते २००१ पर्यंत पाहणी (नियमाने पाहाणी फी भरुन) करुन त्यातील ठाकूर जमातीच्या आलेल्या अर्जाचे संदर्भातील माहितीची नोंद ही स्वतः तपासून उपलब्ध करुन घ्यावी. त्यानंतर २००१ पासून संगणकामध्ये पंजीबध्द केलेल्या प्रकरणाची तशा प्रकारे नोंदी घेवून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

३. सदरची माहिती उपलब्ध करुन देतांना अपीलकर्ता सोबत एक व कार्यालयातील एक कर्मचारी त्या ठिकाणी उपस्थित असावा.

सदर आदेशानुसार उक्त क्रं.२ अन्वये अद्यापही श्री राजू मधुकर इंगळे यांनी या कार्यालयास वेळ व तारीख कळविलेली नाही. त्यामुळे त्यांना माहितीची आवश्यकता नाही, हे स्पष्ट होते. निव्वळ माहितीचा अधिकार प्राप्त झालेला म्हणून जन माहिती अधिकारी तथा अपीलीय अधिकारी यांना वेठीस धरणे ही बाब स्पष्ट होते. तेव्हा सदर अपील हे खारीज करण्यास विनंती करण्यांत येत आहे. "

यावरुन असे दिसून येते की, श्री गजानन मधुकर इंगळे व श्री राजू मधुकर इंगळे हे दोनही भाऊ असून एकच माहिती ते वेगवेगळे अनेक अर्ज करुन मागत असतात व त्याकरीता श्री राजू मधुकर इंगळे यांचे अपील क्रमांक ६४३/२००७ मध्ये दिनांक २६.३.२००८ रोजी वर नमूद केलेला निर्णय दिलेला असून सुध्दा माहिती प्राप्त करण्याकरीता त्यांनी कार्यालयास तारीख व वेळ कळविलेली नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी खुलाशात म्हटल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांना वेठीस धरण्याकरीता ते सदरचे अर्ज सादर करीत असतात असे दिसून येते. तसे त्यांचे जात पडताळणीचा अर्ज पंलंबीत आहे असेही जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. यावरुन मागितलेली माहिती कोणत्याही व्यापक जनहिताचे उद्येशाने मागितली नसून स्वहिताकरीता मागितली ओ असे दिसून

येते. व त्यामुळे सदरचे अपील सुध्दा खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये मागितलेली माहिती ही व्यापक स्वरुपात आहे व तीच माहिती त्यांचे बंधु श्री राजू मधुकर इंगळे यांनी अपील क्रमांक ६४३/२००७ मध्ये मागितलेली होती. त्याकरीता त्यांचे अपील हे मंजूर करुन माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता तपासणी फी भरुन तपासणी करण्यासाठी तारीख व वेळ कळवावा असे कळविलेले असून सुध्दा त्यांनी तारीख व वेळ कळविलेली नाही. तसेच तपासणी फी भरलेली नाही व त्यामुळे श्री गजानन मधुकर इंगळे व श्री राजू मधुकर इंगळे यांनी मागितलेली माहिती ही एकच असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-१५.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १३५५/२००७**

**१) श्री वासुदेव पांडुरंग राठोड**
**रा. गिरीपेठ आर्वी रोड वर्धा,**
**पो. मानस मंदीर, ता.जि. वर्धा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, वर्धा.**

**३) जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार**
**शहर पोलीस स्टेशन वर्धा, ता.जि. वर्धा.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १५.७.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये प्रथम अपील दाखल केली आहे. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.६.२००७ रोजी माहित अधिकारी म्हणून ठाणेदार शहर पोलीस कार्यालय, वर्धा यांचेकडे दिनांक १६.५.२००७ ला फसवणुक झाल्याबाबत पोलीस स्टेशन कार्यालयास अर्ज सादर केला, त्याबाबत कार्यालयाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली त्याचा अधिकृत तपशिल. माहिती व्यक्तीशः हवी आहे, असे नमूद केलेले दिसून येते व त्याकरीता दुरध्वनी क्रमांक त्यांनी दिलेला आहे.

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १०.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक १९.११.२००७ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी, वर्धा उपविभाग, वर्धा यांनी अपीलकर्ता यांना पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन वर्धा शहर यांनी त्यांचे पत्र क्रमांक २१२२/२००७, दिनांक १५.११.२००७ अन्वये अहवाल सादर केला आहे. सादर केलेल्या

अहवालाची प्रत सोबत जोडून आपणास पाठविण्यात येत आहे, असे कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय झालेला नसल्यामुळे दिनांक २६.९.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांच्या अर्जामध्ये माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले असून त्यांनी संपर्क म्हणून दुरध्वनी क्रमांक दिलेला आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ते स्वतः माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी ठाणेदार यांचेकडे गेले होते परंतु त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रथम अपीलात सुध्दा उपविभागीय पोलीस अधिकारी, वर्धा यांनी पोलीस अधीक्षक वर्धा यांचेकडे पोलीस निरीक्षक, वर्धा शहर यांना ५ स्मरणपत्रे देवून सुध्दा त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही, म्हणून पत्र दिलेले दिसून येते. व त्यात त्यांनी पूर्वकल्पना देवूनही उदासिनता दाखविल्याचे दिसून येते व दिरंगाई व निष्काळजीपणा केला आहे. त्याबध्दल कार्यवाही करावी असा अहवाल सादर केलेला दिसतो. व त्यानंतर मात्र अपीलकर्ता यांना दिनांक १९.११.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली आहे. यावरुन असे दिसून येते की, ठाणेदार, शहर पोलीस कार्यालय वर्धा यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब केलेला आहे. व त्यामुळे अधिनियमाचे कलम २० प्रमाणे ते दोषी आढळून येतात. दिनांक १५.११.२००७ चा जो अहवाल सादर केला आहे त्या अहवालामध्ये दिनांक १३.७.२००७ रोजी अर्जदार यांना जावक क्रमांक १४१५ वर पोस्टाने महिती देण्यात आली परंतु सदर माहितीची पोच मला प्राप्त झाली नाही असे नमूद केलेले अपीलकर्ता यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. परंतु अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारची माहिती ही दिनांक १३.७.२००७ च्या पत्राप्रमाणे उपलब्ध झाली नाही. त्याकरीता मागील तारखेस जावक नोंदवहीच्या संदर्भामध्ये आयोगासमोर आणण्याबाबत आदेश दिले होते. परंतु "कर्मचा-याच्या ताब्यात सदर रजिस्टर आहे व तो कर्मचारी नागपूर येथे मा. उच्च न्यायालयात गेलेला असल्याने आज रोजी जावक रजिस्टर हजर करणे शक्य नाही. हे जावक रजिस्टर हजर करण्यास पुढील तारीख मिळण्यासाठी विनंती आहे असा अर्ज दिलेला होता " व त्यामुळे दिनांक १४.५.२००८ ची तारीख ही देण्यात आली. परंतु पुन्हा दिनांक १३.५.२००८ रोजी श्री आर.एन. भुले हे आजारी रजेवर असल्याने सदर प्रकरणात हजर राहू शकत नाही करीता पुढील पेशी मिळण्यासाठी विनंती आहे असे श्री बी.सी.

श्रीरामे, प्रभारी पोलीस निरीक्षक यांनी आयोगाकडे अर्ज दिल्यामुळे पुढील तारीख म्हणजे आज चौकशीस तारीख देण्यात आली होती. परंतु आजही जन माहिती अधिकरी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी हजर नाहीत. व वर नमूद केल्याप्रमाणे संबंधीत जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे ते शास्तीस पात्र आहे. परंतु, अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे शास्ती लादावयाची झाल्यास त्यांचे म्हणणे एकुण घेणे हे बंधनकारक असते व आजही सदर जन माहिती अधिकारी हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे एकुण घेता येत नाही. परंतु त्यांना नोटीस देऊन वेळोवेळी संधी दिली पण त्यांनी मुदतीच मागितल्यामुळे अपीलात निर्णय करणे आवश्यक असल्याने सदरचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात यत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ६.७.२००७ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून २ दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विना मुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) सदरची माहिती ही विहित मुदतीत उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे व दिशाभूल करणारी असल्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांच्या विरुध्द अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे रुपये १०,०००/- ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबध्दलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत आयोगाकडे करावा अन्यथा शास्ती कायम करण्यात येईल.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-१५.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ८१४/२००७**

**१) श्री दिगंबर त्र्यंबकराव मवाळ (पाटील)**
**शिक्षण कॅालनी, मेहकर-४४३३०१**
**ता. मेहकर, जिल्हा बुलढाणा. अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला.**
**बांधकाम भवन, गौरक्षण रोड, अकोला.**

**३) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला**
**बांधकाम भवन, गौरक्षण रोड, अकोला. उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १६.७.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.५.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये प्रथम अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१०.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी, अधीक्षक अभियंता कार्यालय सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला यांचेकडे, " सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला/म.रा.रस्ते विकास महामंडळ, मेहकर बायपास मार्ग रद्य करुन सोईचा व कमी खर्चाचा रस्ता घेण्याबाबत. मेहकर बायपास प्रस्तावित केल्यापासून आजपर्यंत. १) संपुर्ण कागदपत्राचे व्यक्तीशः निरीक्षण. २) सोबज जोडलेल्या व सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला रस्ते विकास महामंडळ हयांना पाठविलेल्या पत्रामधील मुद्येनिहाय सविस्तर माहिती आवश्यक आहे." माहिती पोस्टाने पाठवावी, खर्चाचा तपशिल द्यावा, त्वरीत पैसे भरुन देऊ असे नमूद केलेले दिसून येते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १६.११.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार माहिती पुरविण्याबाबत, संदर्भ- दिनांक ५.११.२००७ चे पत्र. (१) मेहकर बायपास प्रस्तावित केल्यापासून आजपर्यंत संपुर्ण कागदपत्राची व्यक्तीशः निरीक्षण. मेहकर बायपास मार्गाचे सर्व्हेक्षण व नकाशा कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, अकोला यांनी केलेले आहे. त्यामुळे कागदपत्रे व मंजूर आखणी नकाशाबाबत कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, अकोला यांचेशी संपर्क साधावा ही विनंती. २) मेहकर बायपास मार्ग रद्द करुन सेईचा व कमी खर्चाचा रस्ता होण्याबाबत, याबाबत अहवाल या कार्यालयाचे पत्र क्रमांक २८९२/तांशा, दिनांक २७.१२.२००५ नुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलढाणा यांना सादर केला आहे. त्या पत्राची प्रत सुध्दा दिली आहे. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १३.२.२००८ रोजी प्रथम अपील Office of Supdt Engineer, B & C Circle, Construction Bhavan, Gorakshan Road, Akola यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अपीलाचा निर्णय दिनांक २२.२.२००८ रोजी देण्यात आला असून " कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलढाणा यांचेकडून अपीलकर्ता यांच्या अर्जामध्ये नमूद केलेल्या मुद्यांची माहिती संदर्भ क्रमांक ६ च्या पत्रानुसार या कार्यालयास प्राप्त झाली आहे. सदर माहिती अपीलकर्ता यांना पुरविण्यात आली असे उपविभागीय अभियंता यांनी चर्चेमध्ये माहिती दिली. तसेच अपीलकर्ता श्री दिगंबर त्र्यंबकराव मवाळ (पाटील) यांनी सुध्दा माहिती प्राप्त झाल्याबाबत कबुल केले. तदनंतर अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, अकोला यांचे विभागाशी संबंधीत अल्याने चर्चेमध्ये त्यांना बोलाविण्यात आले व त्यांच्या विभागात उपलब्ध असलेली आवश्यक माहिती श्री दिगंबर मवाळ यांना दाखविण्यात यावी व मागणी केल्यास नियमांच्या अधिन राहून पुरविण्यात यावी, इ. बाबी बाबत अपीलकर्ता यानीं निरीक्षक केले आहे. याप्रमाणे उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मेहकर यांना सुध्दा निरीक्षण देण्यात आले. याबाबत कार्यवाही करण्याबाबत कार्यकारी अभियंता, उपविभागीय अभियंता यांनी कबुल कले व अपीलकर्ता श्री मवाळ यांनी सुध्दा सहमती दर्शविली. त्यामुळे चर्चे अंती

अपीलकर्ता यांच्या विषयांकित प्रकरणी समाधान झाले असून त्यांची कोणतीही तक्रार राहीली नाही, असे मत श्री दिगंबर त्र्यंबकराव मवाळ यांनी चर्चेमध्ये व्यक्त केले आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची कार्यवाही पुर्ण झाली यास्तव सदर अपील निकाली निघाले असल्याबाबत सर्वानुमते चर्चेअंती ठरले. त्यामुळे अपीलकर्ता श्री दिगंबर त्र्यंबकराव मवाळ, शिक्षक कॅालनी मेहकर, जिल्हा बुलढाणा यांचे संदर्भिय अपील अर्ज निकाली काढण्यात येत असून दप्तरी दाखल करण्यात येत आहे " असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी ही तातडीने घ्यावी असा अर्ज अपीलकर्ता यांनी दिनांक १५.५.२००८ रोजी आयोगाकडे दिलेला होता. त्यामध्ये " Because there is an urgent need of the bye pass road to Mehakar town, whose requested information is pending etc. Due to delay in bye pass road the commam man of the town is finding inconvenient day to day working activities. Hence, kindly issue the notice immediately in order to early hearing." व त्यामुळे सदरच्या अपीलाची सुनावणी ही क्रम सोडून घेण्यात आली आहे. परंतु, संपुर्ण अपीलाची सुनावणीमध्ये अपीलकर्ता  व उत्तरवादी यांचे म्हणणे एकुण घेतल्यावर अशी कोणतीही तातडीची आवश्यकता होती असे वाटत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी आयोगाची दिशाभूल केली असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही.

अपीलकर्ता यांच्या दिनांक १०.१०.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ५.११.२००७ रोजी जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अकोला यांनी उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मेहकर यांना अर्जदाराच्या अर्जाप्रमाणे अर्जदारास शासकिय संबंधीत माहिती अधिकारी या नात्याने माहिती पुरवावी. अर्जाची प्रतिलीपी आरेखक विभागीय कार्यालय यांना माहिती व कार्यवाहीस्तव, प्रतिलीपी श्री दिगंबर त्र्यंबकराव मवाळ यांना दिलेली दिसून येते. व त्याप्रमाणे दिनांक १६.११.२००७ चे पत्र हे उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम, मेहकर यांनी अपीलकर्ता यांना दिलेले दिसून येते.

यावरुन असे दिसते की, माहिती ही अकोला कार्यालयात उपलब्ध होती परंतु, मेहकर कार्यालयाकडे अर्ज हस्तांतर करण्यात आला व पुन्हा मेहकर कार्यालयाने अकोला कार्यालयाकडे हस्तांतर केला. अकोला कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी माहिती कोणत्या कार्यालयात उपलब्ध आहे याबध्दलची कोणत्याही प्रकारे काळजी न घेता अर्जाचे हस्तांतरण केलेले दिसून येते. प्रथम अपीलात सुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान झालेले आहे असा निष्कर्ष काढलेला आहे. परंतु, आज अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे की, त्यांचे काही समाधान झालेले नव्हते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, अकोला यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी, असे निर्देशित केलेले होते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता हे त्यांचे कार्यालयामध्ये आले होते व त्यांना संपुर्ण फाईल दाखविण्यात आली पण दोन मिनिटात ते निघून गेले, असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना नस्ती दाखविण्यात आली नाही तर फक्त नकाशा दाखविण्यात आला व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. अपीलकर्ता यांच्या अर्जातील मुद्या क्रमांक २ च्या संदर्भातील उल्लेख केलेले पत्राच्या संदर्भात सुध्दा प्रथम अपीलात कोणताही निर्णय देण्यात आलेला नाही. परंतु माहितीच्या अर्जात ज्या दोन पत्रांचा उल्लेख अपीलकर्ता यांनी केलेला आहे ती दोनही पत्रे त्यांनी अकोला कार्यालयात दाखल केलेली नसून दिनांक ६.२.२००६ चे पत्र हे Honorable Mr. S.B. Manejee, Superintending Engineer, MSRDC Ltd. Near Patwardhan High School, Sitabuldi, Nagpur असे संबोधीत केले आहे व त्या पत्राची प्रतिलीपी Honorable Chief Engineer, B & C Amravati Zonel Office, Amravati व Honorable Superintending Engineer, B & C circle office Akola यांना दिलेली दिसून येते. त्याचप्रमाणे दिनांक २८.४.२००६ चे पत्र हे Honorable Mr. Dhawadjee, Chief Engineer, B & C Amravati Zone Amravati यांचेकडे दाखल केलेले दिसून येते व त्यामुळे कार्यवाही करण्याकरीता ज्या कार्यालयास पत्र दिलेले असेल त्याच कार्यालयात माहिती मागणे अपेक्षित असते. प्रतिलीपीच्या पत्रावर कोणतीही कार्यवाही होत नाही.

व त्यामुळे संदर्भित पत्राच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी ज्या कार्यालयात पत्र दिलेले होते त्याच कार्यालयात त्यांनी त्या पत्रावर काय कार्यवाही झाली याबध्दलची माहिती मागणे आवश्यक होते.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५ प्रमाणे प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या ज्या स्तरावर जी जी माहिती उपलब्ध आहे, त्या त्या स्तरावर जन माहिती अधिकरी यांची नियुक्ती करावी अशी तरतूद आहे व ती निव्वळ ३० दिवसांत उपलब्ध व्हावी या दृष्टीने केलेली आहे. माहितीचा अर्ज एका सार्वजनिक प्राधिकरणात केल्यावर ती माहिती ही दूस-या सार्वजनिक प्राधिकरणात उपलब्ध असेल तर त्याबाबतची माहिती ही ३० दिवसांत उपलब्ध होईलच असे नाही व म्हणून अधिनियमात ती तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यामुद्याबाबत माहिती उपलब्ध करुन दिली नाही हे विचारात घेता येत नाही.

असे असले तरी अपीलकर्ता यांच्या अर्जातील मुद्या क्रमांक १ च्या संदर्भामध्ये मात्र जन माहिती अधिकारी अधीक्षक कार्यालय, अकोला यांनी निष्काळजीपणा दाखविलेला आहे, असाच निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळे अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे ते दोषी आढळून येतात. परंतु, अधिनियमाचे कलम २० (१) च्या परंतुकाप्रमाणे संबंधीत जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकूण घेणे हे बंधनकारक आहे. परंतु, आयोगापूढे आज संबंधीत जन माहिती अधिकारी हजर नाहीत. ते सेवानिवृत्त झालेले आहे, असे विद्यमान माहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयात सुध्दा अकोला येथील वर नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना नस्ती दाखविली असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु, अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी नस्ती दाखविली नाही. मात्र, याबाबत दोनही पक्षकाराकडे पुरावा उपलब्ध नसला तरी जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयाची अंमलबजावणी करावयांस पाहिजे होती. व त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता हे सुध्दा दोषी आढळून येतात. थोडक्यामध्ये अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे त्या माहितीच्या उपलब्ध करुन देण्याच्या बध्दल जाणून बुजून टाळाटाळ करण्यात आलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नसला तरी माहिती निश्चित कोणत्या कार्यालयात आहे याची खातरजमा न करता अर्ज या कार्यालयातून त्या कार्यालयाकडे पाठविण्यात आलेला आहे व त्यामुळे या संपुर्ण दोनही कार्यालयामधून जे जन माहिती अधिकारी

असतील ते दोषी आढळून येतात व ते शास्तीस पात्र आहेत. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १०.१०.२००७ च्या अर्जामधील मागणी प्रमाणे मेहकर बाय पास प्रस्तावित केल्यापासून आजपर्यंतच्या संपुर्ण कागदपत्रांचे व्यक्तीश: निरीक्षण करण्याकरीता हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत संपुर्ण कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४(२) प्रमाणे कागदपत्रांचे निरीक्षण करण्याकरीता दिलेली कार्यपध्दती अवलंबून मात्र विनामुल्य निरीक्षण करण्यासाठी कागदपत्र उपलब्ध करुन देण्यात यावे. त्याकरीता अपीलकर्ता यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांना तारीख व वेळ कळवावी. अपीलकर्ता यांनी सुध्दा कळविण्यात आलेली तारीख व वेळेवर उपस्थित राहून कार्यालयाच्या कर्मचा-यांचे उपस्थितीत नस्तीचे निरीक्षण करुन त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्यात व त्याबाबतची पोच अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना द्यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक १०.१०.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे व प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे संबंधीत जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांच्यावर प्रत्येकी रुपये ५,०००/- ( रुपये पाच हजार फक्त) ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरची शास्तीची रक्कम त्यांच्या सेवा निवृत्ती वेतनातून व वेतनातून वसुल करुन वसुलीची रक्कम ही "**००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार(००७०-०१६-१)**" मध्ये जमा करावी.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक कार्यालय, अमरावती यांचेकडे पोस्टाने स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

४) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-१६.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७७५/२००७**

**१) श्री भिमराव धोंडबाजी खंडाते**
**बी १२/१, शासकिय कर्मचारी वसाहत, रविनगर**
**नागपूर-४४०००१.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहआयुक्त तथा**
**उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,**
**आदिवासी विकास भवन, गिरीपेठ, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहआयुक्त तथा**
**उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,**
**आदिवासी विकास भवन, गिरीपेठ, नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १७.७.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये प्रथम अपील दाखल केली आहे. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

अपीलकर्ता यांनी दिनांक २.१.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, आदिवासी विकास भवन, गिरीपेठ, नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल** : " १. उपरोक्त अधिनियम अस्तीत्वात आल्यापासून महाराष्ट्रातील सर्व अनु.जमातीचया जातीचे प्रमाणपत्र पडताळणी समितीनी माहे डिसेंबर २००६ पर्यंत किती जाती दावे अवैध ठरविलेत.

२. एकुण अवैध जाती दाव्यापैकी अधिनियमाच्या (अ) कलम १०, (ब) कलम ११ ब (क) कलम १३ नुसार किती अवैध जाती दाव्याबाबत समितीने किंवा समितीने निदेशीत/प्राधिकृत केल्यानुसार कार्यवाही करण्यात आली.

३. सर्व अवैध जाती दाव्यावर कलम १०,११ व १३ नुसार पूर्णतः १०० टक्के कार्यवाही केली नसल्यास त्यांची कारणे देण्यात यावी.

४. कार्यवाही प्रलंबित असल्यास अवैध जाती दाव्यांवर अधिनियमाच्या कलम १०,११ व १३ नुसार किती कालावधीत कार्यवाही करणार, कार्यवाही करणार नसल्यास कारणे देण्यात यावी."

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १२.१.२००७ रोजी विषयांकित प्रकरणी कलम २ (च) व कलम २ (झ)(एक) अन्वये माहिती व अभिलेखे याचा अर्थ संज्ञेनुसार कोणताही दस्तऐवज, हस्तलिखित असा होतो. तेव्हा शासनाच्या अभिलेख्यामध्ये उपलब्ध असलेली माहिती कागदपत्राच्या स्वरुपात पुरविणे अपेक्षित आहे. आपण संदर्भीय अर्जानुसार विविध प्रश्नांची उत्तरे मागितलेली आहेत. सबब, सदर प्रश्नांची उत्तरे नाकारण्यात येत आहे, असे उत्तर दिलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाची प्रत आयोगाचे कार्यालयात दाखल केली नाही. दिनांक ८.२.२००७ च्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये त्यांनी दिनांक ३.५.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, यांनी निर्णय दिलेला असून जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम केलेला दिसून येतो. तसेच दिनांक ५.५.२००७ रोजी सुध्दा शासकिय अपीलीय अधिकारी यांनी त्यांना अनुसूचित जाती, जमाती प्रमाणपत्र पडताळणी करुन वैध अवैध ठरविणे, त्याचप्रमाणे अवैध ठरविलेल्या उमेदवारावर महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००२ च्या कलम १०,११ व १३ अन्वये कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार संबंधित सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती यांना आहेत. यानुसार त्या त्या समितीकडे ही माहिती उपलब्ध होऊ शकेल. सबब, आपण प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र अर्ज

करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४.५.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

सदरच्या द्वितीय अपीलाचे संदर्भामध्ये उत्तरवादी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

" वास्तविक पाहता माहितीचा अधिकार अधियिम २००५ मधील कलम २ (च) प्रमाणे माहिती या शब्दाची व्याख्या दिलेली आहे. माहिती या संज्ञेचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेख दस्तऐवज प्रसिध्दी पत्रके, परिपत्रके इ. स्वरुपात छायांकित प्रती घेणे असा आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता सदर माहिती ही प्रश्न स्वरुपात तसेच त्याबाबतची कारणे मागितलेली आहे. त्यामुळे माहिती व अभिलेख या संज्ञेनुसार सदर माहिती पुरविणे हे अपेक्षित नाही.

१. सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.२३ मधील कलम १० हा जातीच्या खोटया प्रमाणपत्राच्या आधारे प्राप्त करण्यात आलेले लाभ काढून घेणे असा आहे. समिती जात पडताळणी करते त्यानुसार अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र वैध किंवा अवैध ठरविते. त्याआधारे संबंधित कार्यालय वा शैक्षणिक संस्था यांनी तशी कार्यवाही करावयाची आहे. अशी कलमात तरतूद आहे. त्यामुळे अपीलकर्त्याने सदर कलमाचा अभ्यास न करतांना प्रश्न स्वरुपात माहिती व कारणे मागितलेली आहे. सदर बाब कलम २ (च) व २ (झ) (एक) या

२. सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. २३ मधील कलम ११ हा अपराध व शास्ती या संदर्भातील आहे. या संदर्भात न्यायालय निर्णय घेत असते. अपीलकर्त्यांने प्रश्न स्वरुपात माहिती व कारणे मागितलेली आहे. सदर बाब कलम २ (च) व २ (झ) (एक) या संज्ञेत मोडत नाही.

३. सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. २३ मधील कलम १३ जातीचे खोटे प्रमाणपत्र देणा-या शास्ती या संदर्भातील असून जात प्रमाणपत्र पडताळणी नंतर समितीने अवैध ठरविलेल्या निर्णयाची प्रत संबंधित जात प्रमाणपत्र देणारे अधिकारी (उदा. कार्यकारी दंडाधिकारी, उपजिल्हाधिकारी इ) यांना तसेच मा. जिल्हाधिकारी यांना सदर जातीचे प्रमाणपत्र रद्य करणेस्तव पाठविण्यात येते. त्यानुषंगाने संबंधित कार्यालयाने जात प्रमाणपत्र देणा-या

अधिका-यांविरुध्द कार्यवाही करावयाची आहे. त्यामुळे सदर कलमाचा अभ्यास न करता प्रश्न स्वरुपात माहिती व कारणे मागितलेली आहे. सदर बाब कलम २ (च) व २ (झ) (एक) या संज्ञेत मोडत नाही."

सदरच्या खुलाशावरुन अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेले उत्तर हे योग्य आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे दिनांक ८.२.२००७ च्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ३.५.२००७ रोजी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-१७.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७७७/२००८**

**१) श्री सौ. वैशाली कुंदन चवरे,**
**प्लॉट नं.२१५, हुडको कॉलोनी, के.नारायण विद्यालयाजवळ**
**जरिपटका नारा रोड, नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक**
**नागपूर (ग्रामिण) नागपूर**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**
**कामठी विभाग, कामठी, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १७.७.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये प्रथम अपील दाखल केली आहे. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.२.२००७ रोजी विभागीय लोकशाही दिनी दिनांक ११.९.२००६ टोकन नंबर ९०९ अंतर्गत करण्यात आलेल्या चौकशी अहवालाची संपुर्ण कागदपत्राची प्रमाणित प्रत देण्याबाबत.

२. चौकशी दरम्यान घेण्यात आलेले बयान १) सुखदेव वाघमारे २) सो. रमाकांता वाघमारे ३) अमजेरा सिंग गुरुदत्तसिंग घाटोले ४) सुरजितसिंग महेंद्रसिंग मुलतानी यांच्या बयानाची प्रत.

३. सौ.रमाकांता वाघमारे व अमजेरासिंग गुरुदत्तसिंग घाटोळे व सुरजितसिंग महेन्द्रसिंग मुलतानी यांच्यात झालेल्या शेती संबंधी विक्रीचे करारनाम्याची सत्यप्रतिलीपी देण्याबाबत.

माहितीचा कालावधी: २००६-२००७ असा दिलेला दिसून येतो व सदरची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे.

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २३.३.२००७ अन्वये अर्जदारांनी माहितीच्या अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या कागदपत्रे अर्जदाराला देण्यासाठी ठेवण्यात आली व अर्जदाराचे पतीचे मोबाईल फोनवर तसेच लेखी पत्रान्वये अर्जदारांना माहिती घेवून जाण्यास वेळोवेळी कळविण्यात आले असता अर्जदार स्वमर्जीने २९.३.२००७ रोजी पतीसह या कार्यालयात येवून व्यक्तीशः माहितीचे पत्र आणि माहितीचे प्रमाणित कागदपत्रे घेवून गेलेल्या आहेत. त्यामध्ये लोकशाही दिली प्राप्त टोकन नं. ९०९ चे अर्ज चौकशी संबंधाने वरिष्ठांना सहपत्रामध्ये सादर केलेल्या संपूर्ण कागदपत्रांची प्रमाणित प्रत माहितीच्या तपशिलाप्रमाणे व विषयाप्रमाणे माहिती देण्यात आलेली होती असे दिसून येते. परंतु सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ३०.३.२००७ रोज प्रथम अपील दाखल कले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक २७.४.२००७ रोजी निर्णय कळविण्यात आलेला असून जन माहिति अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात आलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२००७ रोजी जी माहिती व कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली आहे त्याबध्दल त्यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये अपूर्ण व चुकीची माहिती दिली असे म्हटले आहे. तसेच माहितीच्या तपशिलानुसार व विनंती प्रमाणे माझे समाधान होईल अशी योग्य माहिती द्यावी असे म्हटले आहे. परंतु, त्याबाबत माहिती कशा प्रकारे चुकीची आहे व समाधान कसे होईल याबाबतचा कोणताही खुलासा आयोगाकडे अपीलकर्ता यांनी केला नाही. प्रथम अपीलात सुध्दा त्याबाबतचा खुलासा नमूद केलेला दिसून येत नाही. व आज अपीलकर्ता यांचे दोन अपीले सुनावणीसाठी होती. अपील क्रमांक १७७४/०७ सकाळी १०.३० वाजता सुनावणीसाठी त्या स्वतः हजर होते परंतु दुपारी २.०० वाजताच्या दूस-या अपीलाच्या सुनावणीसाठी त्या हजर नाही व आयोगाकडे गैरहजर राहण्याचा खुलासा दिलेला नाही. जन माहिति अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांच्याकडे जी कागदपत्रे उपलब्ध आहेत त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती त्यांना विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. व त्यामुळे

सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २७.२.२००७ च्या अर्जात मागितलेल्या माहितीप्रमाणे विहित मुदतीत माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिलेल्या असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-१७.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७८४/२००७**

**१) श्री नवल रजनीकांत त्रिवेदी**
**हॅाटेल रजनीकांतच्या मागे, सेंट्रल एव्हेन्यू,**
**बजेरिया, नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त**
**(मुख्यालय) पोलीस आयुकत कार्यालय,**
**नागपूर शहर, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर शहर, नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १८.७.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.६.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये प्रथम अपील दाखल केली आहे. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी क्रमांक १ व २ तर्फे श्री वामन खरात, सहाय्यक पोलीस आयुक्त हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.३.२००७ रोजी माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर यांचेकडे **खालीलप्रमाणे माहिती मागितलेली** दिसून येते.

" That the licence branch of your office is issuing the licenses to the residential hotels/lodges/hotels, etc, under the Rules of Entertainment. That for obtaining such licence the licencee had to comply the rule no. २ (I to v) etc, for obtaining such licences. After vefifying the rule no. २ the licences are supposed to be issued.

ii) The period to which the information relates.

१९७० to till date. (Detail of all existing licences)

iii) Description of the information required.

The applicant wants the following information.

१. List of licences issued with, name of building/lodge/hotels/guest house/etc, name of owner, licence number, date of issue of licence, last renewal valid till, renewal position as on date, totala numbers of rooms.

२. With reference to above list, how much licences had submitted the sanction map of building. State licence number wise.

३. Whether the number of rooms in sanction map tallies with numbers of rooms licenced.

४. With reference to above list, how much licencee have submitted the fire protections clearance certificate. State licence number wise.

५. With reference to above list how much building have parking space as per norms. State licence number wise, number of rooms and parking space available with them.

६. With reference to above list how much licencee have submitted the coopancy certificate. State licence number wise.

७. The inspection of all files as per above list (१ to ६) after supply of information. "

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ५.४.२००७ रोजी आपण मागणी केलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८ (घ) मधील तरतूदीनुसार देता येत नाही, असे माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने अपीलकर्ता यांचे समधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १२.४.२००७ रोजी प्रथम अपील उपआयुक्त यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक १४.५.२००७ रोजी परवाना शाखा यांचेकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले. आपण या कार्यालयास केलेला दिनांक १२.४.२००७ रोजीचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे

कलम १९ (६) अन्वये अपील अर्ज दाखल केल्याचे तारखेपासून एकुण ४५ दिवसांचे आंत निकाली काढण्यात येईल, असे कळविण्यात आल्याचे दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक २३.५.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम (२) अन्वये संबंधीतांची माहिती देण्यासाठी काही आक्षेप आहे काय याबाबत काही परवानाधारकाचे अभिवेदन मागविण्यात आले. त्यांनी आवेदकास त्यांची माहिती देण्यात येऊ नये असे आवेदन सादर केले आहे. माहितीचा अधिकर अधिनियम, २००५ च्या कलम ८ (ड) मधील तरतूदी प्रमाणे त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हाणी पोहचण्याच्याी संपुर्ण शक्यता असल्याने मागण्यात आलेली माहिती देता येत नाही, असे कळविलेले दिसून येते. तसेच माहितीच्या अधिकारान्वये माहिती ही सार्वजनिक व्यापक हिताशी संबंधीत असली पाहिजे किंवा अर्जदाराच्या वैयक्तिक हिताशी संबंधीत असली पाहिजे. आपण मागितलेली माहिती ही कोणत्याही सार्वजनिक हिताशी संबंधीत दिसून येत नाही. माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारली ही कृती योग्य आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील फेटाळण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने व्यथित होऊन अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील मेमोमध्ये अपीलाची कारणे खालीलप्रमाणे दिलेली आहे.

**GROUNDS OF APPEAL**

A. That the information asked dows not comes under the purview of section ८ (d) as the same is not any confidential in nature or any secret. Hence the refusal by the information officer is illegal.

B. That it is pertinent to mention here that the Act u/s ४ (b) (iii) (iv), (v), (vi), (vii), provides the appellant to have the right to access and information as asked vide application dated ०८.०३.२००७ (annexure I).

C. That the information asked is to know, the procedure followed in the as laid down under Rule of Entertainment, while

issuing/granting/renewing the licence of coming under Entertainment and its process, including supervision, final decision, and accountability.

D. That, whether the norms as laid down in the rules of entertainment for granting licences are been followed, by the licence branch, staff and its officers.

That whether the policy made by the government for issuing the licence of entertainment for the city of Nagpur are implemented.

That as per the information and evidences available with the appellant the answer to above question is No.

E. That the applicant is sufferer of the said illegal issuance of the licences of Entertainment to hotel Rejdhani, adjacent to appellants residence, and various court cases, and representation to authorities are given and required to be followed up by the appellant. All this is due to the illegal act of Licensing authority.

F. That the applicant had collected the data since last two years and had found that most of the licence had been granted to the buildings for Entertainment., by Licensing authority, in violation of rule २ (v) in the entire city of Nagpur.

i. That the illegal building / constructions licenced are not been sanctioned by the competent authority till date.

ii. That the illegal building / construction licenced are not having the occupancy certificate till date.

iii. That the illegal building / construction licenced are not having proper ventilation till date.

iv. That the illegal building/construction licenced are not been cleared by the Fire Department by way of Compliance Certificate till date.

v. That the illegal building/construction licenced are not having parking space as required, and in maximum cases there is no parking space to park one bicycle, till date.

vi. That in some cases the competent authority had communicated to the police commissioner not to issued licence to illegal building/construction, that also licence had been issued.

vii. In one of the case the plot had been allotted for Industrual Purpose and the illegally being utilized for Bar & Restaurant and the same is licence by police commissioner office.

viii. That the applicant had collected detail from the office of the Fire Brigade. No Compliance Certificate are been issued by their department to more than ९० % building, which are been licence by police commissioner office. Thus they are playing with the life of the public at large.

ix. That the record at the licence branch are missing, to the knowledge of the applicant the record are been purposefully missed to suppressed the fact of issuing licence illegally. The applicant is having the evidence of the same.

G. That as regard to referring the above anomalies I to ix and other datas available with the applicant the it is crystal clear that the licences issued by the office of police commissioner office for entertainment are being issued in violation of Rule २ (I to v), of Entertainment, which are duly sanctioned by the government. That such violation in issuing licence

is resulting life safety of public at large, parking problem, increase in illegal construction, illegal occupying the building etc.

H. That the applicant had not asked any third party information, that on going through the application dated ०८.०३.२००७ it clearly reveals that the applicant want the details to verify the procedure followed by the licence branch and laches in issuing the licence of Entertainment.

I. That the applicant is having the full knowledge that the licences are been issued in violation of the provisions of the procedure laid down. The licence branch is not having the relevant document which were required to be verified prior to issuing licence, and this illegal activities are been going on since long and is continuing till date. The same is required to be enquired and the guilty persons are to be punished as per law, who are playing with the life of public at large and creating various problems for public at large.

J. The information asked vide application dated ०८.०३.२००७ is denied illegally, under irrelevant sections, to hide the illegal act done in issuing licences of Entertainment and the appellant authority also errored while deciding the appeal.

K. That the appellate authority was required to supply the reply of the submission made by the licensing authority. That after supplying the same the opportunity of hearing should have been granted, but directly sending the order by post is not fair and transparent way of deciding the appeal. Hence necessary directions in this regard are to be circulated to all the appellate authorities to be followed while deciding the appeals.

L. That the information asked cannot be kept confidential by the third party or even by the information officer, or any body whatsoever, as the same is requirement of the rules of Entertainment licenses.

M. That the application dated ०८.०३.२००७ of the appellant had been denied malafidly and with ultimate ulterior motive to suppress the facts of illegally issued licences of entertainment.

N. That the cost as per provision of the act shall be imposed for the delay, till the supply of the complete information and inspection.

O. That it is pertinent to mention here at this point of juncture that if the finformation is denied in such a manner than the purpose of this act, will end, as all the information asked are of third party, and nothing is secret to be known whether the rules are been followed by the competent authorities while discharging their officer duties.

P. That the information asked would disclose the transparency and accountability of the officers, staff, issuing the licence of entertainment and also all the illegal act of issuing licences.

In the fcts and circumstances the appellant prays as under,

PRAYER; It is humbly prayed,

i. to issue direction for supplying the information and inspection as per application dated ०८.०३.२००७ of the appellant.

ii. to impose penalty for denying the information malafidly and not supplying the information as per law.

iii. to pass necessary orders for disciplinary action against the responsible person.

iv. to pass necessary order as deems proper and just in the present matter.

तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे. " उपरोक्त संदर्भाकिंत विषयान्वये सादर आहे की, अपीलकर्ता श्री नवल रजनीकांत त्रिवेदी यांनी दिनांक ०४.३.२००७ रोजी माहिती मिळण्यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती अधिकारी, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन), नागपूर यांचेकडे अर्ज सादर केला होता. (सहपत्र पान क्रं. १ व २)

सदर अर्जात नागपूर शहरातील सन १९७० पासून हॅाटेल्स, लॅाज, मनोरंजनगृहे, गेस्ट हाऊस यांबेबाबत त्यांचे मालकाचे नांवे, परवाना दिल्याची तारीख नुतनीकरणाची मुदत त्याचेकडे एकुण किती रुम्स आहेत याबाबत मुद्या क्रं. १ ते ६ नुसार माहितीची मागणी केली होती.

अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती परवाना शाखेशी संबंधित असल्याने माहिती सादर करण्यासाठी प्रमुख लिपिक परवाना खाखा यांना क्रं. पोआना/मा.अ./४४/०७ दि. ०९.०३.२००७ रोजी पत्र देण्यात आले (सहपत्र पान क्रं.३)

नागपूर शहरातील एकुण १५१ परवानाधारक आहेत. अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे नियम ११ (२) अन्वये उदाहरण दाखल १० परवाना धारकांना नोटीस देवून त्याचे अभिवेदन घेण्यात आले आहे. १० परवानाधारकापैकी ८ परवाना धारकांनी अभिवेदन १० दिवसाचे आंत सादर केले आहे. परवाना धारकांनी त्याची माहिती पुरविण्यात येवू नये असा आक्षेप नोंदविला आहे (सहपत्र पान क्रं. ४ ते २३)

परवाना शाखेतर्फे वरिष्ठांची मान्यता घेवून त्यांचे पत्र क्रं.पोआना/पलि-४/मामअ/४४/५९/०७, दि. ०५.०४.२००७ अन्वये हया अधिनियमाचे कलम ८ (घ) मधील तरतुदीप्रमाणे त्रयस्थ पक्ष्याच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहचण्याची पूर्ण शक्यता असल्यामुळे मागणी करण्यात आलेली माहिती पुरविता येत नाही असे कळविले आहे. (सहपत्र पान क्रं. २४)

माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्रं.पोआना/माअ/४४/०७ दि. ५.४.२००७ रोजी माहितीचे पत्राद्वारे कलम ८ (घ) मधील तरतुदीनुसार देता येणार नाही असे कळविले आहे. (सहपत्र पान क्रं. २५)

अर्जदार श्री नवल त्रिवेदी यांनी दि. ९.४.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी, पोलीसउप आयुक्त (मुख्यालय) यांचेकडे हया अधिनियमाचे कलम १९(१) प्रमाणे अपील अर्ज सादर केला आहे. (सहपत्र पान क्रं. २६ ते २८)

दि. ९.४.२००७ रोजी सादर केलेल्या अर्जात माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती पुरविली नाही असे नमूद केलेले आहे.

अर्जदार यांनी मागणी केलेल्या दि. ०८.०८.२००७ च्या अर्जात माहिती व्यक्तीशः पाहिजे असल्याचे नमूद केलेले आहे.

अर्जदाराने दि. ०८.०३.२००७ रोजी अर्ज सादर केलेला आहेच माहिती अधिकारी यांनी माहितीचे पत्र दि. ५.४.२००७ रोजी पाठविलेले आहे.

प्रथम अपीलीय अधिकारी, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), नागपूर यांनी प्रथम अपीलावर पत्र क्रं.पोआना/माअ/अपील/त्रिवेदी/०३/०७ दि. १२.०४.२००७ प्रमाणे निर्णय घेवून अर्जदारास कळविण्यात आले. प्रथम अपीलीय अधिकारी, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) यांनी खालील प्रमाणे निर्णय दिला आहे.

अपीलार्थी श्री नवल रजनिकांत त्रिवेदी यांनी त्यांना शासकिय माहिती अधिकारी, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन) यांचेकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) प्रमाणे दि. ९.४.२००७ रोजी अपील अर्ज केला आहे. अपीलार्थीने अपील अर्जात १) कलम ३ नुसार मागणी केलेली माहिती मुदतीत न दिल्याने माहिती मिळणेबाबत २) शिस्तभंगाची कार्यवाही व दंडात्मक कारवाई करणेबाबत विनंती केलेली आहे. वरील सर्व मुद्दे विचारात घेवून श्री नवल त्रिवेदी यांचे संबंधित नस्तीचे अवलोकन करता खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१) माहिती मागणारा अर्ज दि. ८.३.२००७ रोजी प्राप्त झाला.

२) अपीलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाची असल्याने परवाना शाखेकडून त्रयस्थ पक्षाकडून अभिवेदन मागविण्यात आले आहे.

३) त्रयस्थ पक्षाकडून माहिती देण्यात येवू नये याबाबत आक्षेप घेवून परवाना शाखेकडे अभिवेदन सादर केले आहे.

४) माहिती अधिकारी, सहाय्यक पोलीस आयुक्त, (प्रशासन) यांनी त्यांचे पत्र क्रं.पोआना/मा.अ./४४/०७, दि.०५.०४.२००७ आहे.

५) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७ व कलम ११ या दोन्ही कलमांचा एकत्रितपणे विचार करता हे स्पष्ट होत आहे की, मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाची संबंधित असल्याने अर्ज मिळाल्यानंतर ४० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

६) अपीलार्थीने अर्जावर शासकिय माहिती अधिकारी यांनी दि. ५.४.२००७ रोजी म्हणजेच २८ व्या दिवशी माहिती नाकरण्यात आल्याबाबत कळविले आहे. माहिती अधिकारी यांनी मुदतीच्या आंत माहितीचे पत्र पाठविले असल्याने अपील अर्ज निकाली काढण्यात आला आहे. (सहपत्र पान क्रं. २९ ते ३०)

श्री नवल त्रिवेदी यांनी पुन्हा १९ (१) नुसार माहिती अधिकारी यांचे दि. ५.४.२००७ चे आदेशाविरुध्द दि. १२.४.२००७ रोजी पुन्हा प्रथम अपील अर्ज सादर केला आहे. (सहपत्र पान क्रं. ३१ ते ३४)

अपीलकर्ता यांनी सादर केलेल्या अर्जावर परवाना शाखेचे प्रमुख लिपिक यांचेकडे पत्र क्रं.पोउपआ/मुख्या/माहितीचा अधिकार/अपील/०७ दि. १३.४.२००७ नुसार पाठविण्यात आला व त्यावर मुद्येनिहाय स्पष्टीकरण मागविण्यात आले. (सहपत्र पान क्रं.३५)

अपीलकर्ता श्री नवल रजनिकांत त्रिवेदी यांनी दि. १४.५.२००७ रोजी कार्यालयात हजर येवून त्यांनी दि. १२.४.२००७ रोजी सादर केलेल्या अपील अर्जावर ३० दिवसांचा कालावधी होवूनही निर्णय दिला नाही. याबाबत पत्र सादर केले.

अपीलकर्ता श्री नवल त्रिवेदी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (६) नुसार ४५ दिवसांचे कालावधीपर्यंत अपील निकाली काढण्यात येईल असे समक्ष सांगून पत्र

क्रं.पोआना/मा.अधि/अपील/४/०७ दि. १४.५.२००७ नुसार ४५ दिवसांचे आंत अपील निकाली काढण्यात येईल असे लेखी पत्राद्वारे कळविण्यात आले. (सहपत्र पान क्रं. ३६).

अपीलकर्ता यांनी दि. १७.४.२००७ रोजी मा. पोलीस आयुक्त, नागपूर यांचे नांवे पत्र सादर करुन त्रयस्थ पक्षांना कलम ११ (२) नुसार दिलेल्या नोटीसमध्ये त्यांचे नांव असल्याने त्रयस्थ पक्षाकडून धोका होण्याची शक्यता असल्याबाबत अर्ज सादर केला (सहपत्र पान क्रं.३७ व ३८)

वरील तक्रारीचे अनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्रं. पोआना/१५-अ/पलि-४/मा.अ./५९/०७, दि. २१.४.२००७ नुसार अर्जदार यांना कळविण्यात आले की, या कार्यालयाने दि. १७.३.२००७ अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ११ (२) नुसार जी सूचना निर्गमि केलेली आहे ती मा. पोलीस आयुक्त यांनी दिलेली नसून माहिती अधिकारी यांच्यातर्फे देण्यात आलेली आहे. आपणास याबाबत असेही कळविण्यात येत, की, या कार्यालयाने दि. १७.३.२००७ च्या पत्रामध्ये पारदर्शकता असावी म्हणून आपल्या नावाचा उल्लेख केलेला आहे. आपण उक्त माहिती जर पूर्वग्रह दुषित हेतूने मागणी केलेली नसल्याचा व माहिती मागण्याचा आपला हेतू स्वच्छ असलयास आपले नाव पत्रात नमूद केल्याप्रमाणे आपणास भिती वाटण्याचे काहीही कारण नाही. आपणास नेमकी कोणी धमकी दिली आहे याबाबतची माहिती संबंधित पोलीस स्टेशनला दयावी असे लेखी पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. (सहपत्र पान क्रं.३९)

पोलीस आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्रं.नं.CPN/१५-Z/LC/ROI/२००७, दि. १६.५.२००७ नुसार अपीलकर्ता यांचे दि. १२.४.२००७ चे अपील अर्जाचे अनुषंगाने कळविले आहे की, अपीलकर्ता यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ११(२) अन्वये संबंधिताची माहिती देण्यात काही आक्षेप आहेत काय याबाबत त्यावर त्यांनी आवेदकास माहिती देण्यात येवू नये असे अभिवेदन सादर केलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८(३) तरतुदीप्रमाणे त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहचण्याची पुर्ण शक्यता असल्याने मागणी करण्यात आलेली माहिती देता येत नाही असे परवाना शाखेकडून कळविले आहे. (सहपत्र पान क्रं. ४०)

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचे अपील अर्जावर निर्णय देवून निर्णयाची प्रत पत्र क्रं.पोआना/मा.अ./अपील/४/०७, दि. २३.५.२००७ नुसार अपीलकर्ता यांना रजिस्टर्ड पोस्टाने पाठविलेले आहे.

अपीलावर निर्णय देतांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी १) सर्व बाबींचे अवलोकन करुन तसेच सर्व मुद्दे विचारात घेवून खालील प्रमाणे निर्णय दिलेला आहे.

१) अपीलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाची असल्याने त्रयस्थ पक्षाकडून अभिवेदन मागविण्यात आलेले आहे.

२) त्रयस्थ पक्षाकडून माहिती देण्यात येवू नये याबाबत आक्षेप नोंदवून अभिवेदन सादर केलेले आहे.

३) मागणी केलेल्या माहितीमुळे त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहचण्याची पूर्ण शक्यता असल्याची आमची खात्री झालेली आहे.

४) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७, ११ व कलम ८ या कलमानुसार एकत्रित विचार करता हे स्पष्ट होत आहे की, मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहचविण्यासाठी मागितलेली आहे.

अपीलकर्ता यांनी त्यांचे अर्जात शासकिय माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याबाबत व मागणी केलेली माहिती पुरविण्याबाबत विनंती केली आहे.

माहितीच्या अधिनियमान्वये माहिती ही सार्वजनिक व्यापक हिताशी संबंधित असली पाहिजे किंवा अर्जदाराच्या वैयक्तिक हिताशी संबंधित असली पाहिजे आपण मागितलेली माहिती ही कोणत्याही सार्वजनिक हिताशी संबंधीत दिसून येत नाही. माहिती अधिकारी, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन) यांनी कलम ८ (ड) प्रमाणे माहिती नाकारली ही कृती येग्य आहे, असा निर्णय देवून अपीलकर्ता यांचे अपील फेटाळण्यात आले आहे.

यासोबत कागदपत्राची तारखेवार यादी माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून मुदतीत माहिती देण्याबाबत अर्जदाराशी केलेल्या पत्र व्यवहाराच्या प्रती माहितीच्या अर्जाची छायांकित प्रत, प्रथम अपील अर्जाची छायांकित प्रत, त्यावर दिलेल्या निर्णयाची प्रत अनुक्रमणिकेनुसार यासोबत सादर आहे."

तसेच अधिनियमाचे कलम ११(२) प्रमाणे त्रयस्थ पक्षाला विचारलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये त्यांच्या पत्रांच्या छायांकित प्रती दाखल केलेल्या आहेत.

अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करताना असे सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती ही होटल व लाजेस इ.ची आहे. व होटल व लाजेस यांना परवाना देताना तो मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३३ प्रमाणे कार्यवाही केली जाते व त्यामुळे सदरच्या कार्यवाहीचे पालन झाले आहे किंवा नाही हे जाणून घेणे आवश्यक आहे. हॅाटेल ही खाजगी मालमत्ता नाही तर ती सार्वजनिक जागा आहे व त्या व्यवसायास वेगवेगळया प्रकारची परवानगी लागते व त्या परवानगीची प्रतीपुर्ती करणे व त्याची माहिती जाणून घेणे हे सार्वजनिक व्यापक हिताच्या दृष्टीने येते. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, हॉटेल हे त्रयस्थ पक्षाचे असल्यामुळे व अपीलकर्ता यांचा कोणताही प्रत्यक्ष त्या हॅाटेलशी संबंध येत नसल्यामुळे सार्वजनिक व्यापक हिताचा संबंध येत नाही व त्यामुळे सदरची माहिती ही त्रयस्थ पक्षाची माहिती होते. तसेच स्पर्धात्मक स्थानाला धोका पोहचेल या कारणाकरीता सदरची माहिती ही अधिनियमाचे कलम ८ (१)(ड) प्रमाणे नाकारलेली आहे.

वरीलप्रमाणे दोनही पक्षकारांचा खुलासा व युक्तीवाद ऐकल्यावर असे दिसून येते की, हॅाटेल ही सार्वजनिक जागा आहे. व हॅाटेल व्यवसायाला वेगवेगळया प्रकारची परवानगी ही आवश्यक असते. व अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे त्या परवानगीतील अटी व शर्तीची पुर्तता करणे हे सुध्दा हॅाटेल व्यवसायिकांवर बंधनकारक आहे. हॅाटेल मध्ये लोक येत-जात असतात व राहात असतात. त्यामुळे ती सार्वजनिक जागा आहे. तसेच हॅाटेलच्या व्यवसायाने सुध्दा आजूबाजूंच्या रहिवाशांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याबाबतची सुध्दा परवानगी देताना काळजी घेणे आवश्यक असते व त्यामुळे हॅाटेलला लागणा-या परवानगीच्या संदर्भामध्ये मागितलेली माहिती ही खाजगी माहिती होऊ शकत नाही. तसेच कोणत्याही हॅाटेलच्या संदर्भामध्ये लागणा-या वैधानिक परवानगीच्या संदर्भामध्ये प्रती पुर्ती झाली आहे किंवा नाही याबाबतची माहिती उपलब्ध करुन देणे यामुळे स्पर्धात्मक स्थानास धक्का बसेल हे म्हणणे योग्य नसून हॅाटेल व्यवस्थापनाने वैधानिक अटी/शर्तींची पुर्तता केली नसेल तर ग्राहकांना निकृष्ट सेवा व परिसरातील रहिवाशांना त्रास होऊ शकतो व तो अधिनियमांच्या तरतूदींप्रमाणे गुन्हा होतो.

त्यामुळे कोणत्याही हॅाटेलचे स्पर्धात्मक स्थान हे धोक्यात येऊ शकत नाही उलट प्रत्येक परवान्याच्या अटी व शर्ती एखाद्या हॅाटेलने प्रती पुर्ती केलेल्या असेल तर ती ग्राहकांचे दृष्टीने सर्वात सुरक्षित असे हॅाटेल असले पाहिजे व परवान्याप्रमाणे जर प्रती पुर्ती केली नसेल तर अर्थातच अधिनियमाच्या तरतूदी प्रमाणे ती दंडनिय असली पाहिजे. व त्यामुळे सदरची मागितलेली माहिती ही सार्वजनिक
व्यापक हिताच्या कक्षेत/संदर्भात येते व ती उपलब्ध करुन देण्यास अधिनियमाच्या तरतूदींप्रमाणे खाजगी म्हणून प्रकट करण्यास अपवाद सुध्दा कलम ८ प्रमाणे करता येणार नाही.

अधिनियमाचे कलम ११ (१) प्रमाणे " राज्य जन माहिती अधिका-यास, त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असलेली किंवा त्यांच्याकडून पुरविण्यात आलेली व त्या त्रयस्थ पक्षाकडून गोपनिय समजली जाणारी कोणतीही माहिती किंवा अभिलेख किंवा त्याचा भाग पुरवावयाचा असेल " तर अशी तरतूद आहे. त्यामुळे हे जरी हॅाटेल त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असले तरी ती गोपनिय समजली जाणारी नाही तर अधिनियमाच्या तरतूदीचे पालन करणारी आहे. व त्यामुळे ती त्रयस्थ पक्षाची माहिती नाही व त्याही कारणाने ती प्रकट करण्यास त्रयस्थ पक्षाच्या संमतीची आवश्यकता नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे. मात्र जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदभावनेने महिती नाकारली असल्यामुळे त्यांचे विरुध्द शास्ती लादण्याचा विचार करता येत नाही. मात्र अपीलकर्ता यांच्या दिनांक ८.३.२००७ च्या अर्जामधील मुद्या क्रमांक ३ यात माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित असल्यामुळे सदरचा मुद्या क्रमांक ३ च्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारे जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित नाही. तसेच मुद्या क्रमांक ७ च्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना निरीक्षण करावयाचे असल्यास नस्तींचे निरीक्षण करण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. मात्र त्या निरीक्षणाच्या संदर्भामध्ये महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ चे नियम ४ मधील पोट
नियम १ मधील (B) प्रमाणे कार्यवाही ही करणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे

अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक ८.३.२००७ च्या अर्जाप्रमाणे मुद्या क्रमांक ३ वगळून त्यांना माहिती ही छायांकित प्रतीच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापसून २० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-१८.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७८६/२००७**
**अपील क्रमांक १७८७/२००७**

**१) श्री रमेश केशवराव भूरे**
**द्वारा बी.जी. खोब्रागडे, प्रगती कॅालनी, नागभिड**
**ता. नागभिड, जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चिमूर**
**ता. चिमूर, जिल्हा चंद्रपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**शासकिय कन्या पोस्ट बेसिक आश्रम शाळा चिंधीचक,**
**पो. किटाळी (बोरे) ता. नागभिड, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १८.७.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या दोनही अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

**अपील क्रमांक १७८६/२००७ :** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २.३.२००७ रोजी माहिती अधिकारी, शासकिय कनया पोस्ट बेसिक आश्रम शाळा, चिंधीचक, पोस्ट किटाळी (बोर),तहसिल नागभिड, जिल्हा चंद्रपूर यांचेकडे सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मिळालेले अनुदाना बाबत. आर्थिक वर्ष सन २००४-०५ व २००५-०६. आवश्यक असलेल्या माहितीचे विवरण सोबत जोडलेले आहे. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. सोबत सहपत्राप्रमाणे एकुण ७ मुद्यांवर खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

१) सदर कालावधीत सर्व शिक्षा अभियानांतर्गत आपल्या शाळेला किती अनुदान प्राप्त झाले

२) शासनाचे निकषाप्रमाणे सदर अनुदान कोणत्या बाबीवर खर्च करता येते

३) सदर अनुदान आपल्या शाळेने कोणत्या बाबीवर खर्च केले

४) प्रत्येक आर्थिक वर्षाचे शेवटी किती अनुदान शिल्लक राहीले

५) अनुदान शिल्लक राहाण्याची कारणे काय

६) ज्या बाबीवर अनुदान खर्च करण्यात आले, त्याचे प्रमाणकाची(व्हाऊचर) झेरॉक्स प्रत देण्यात यावी.

७) प्रमाणक ज्या पृष्ठावर रोख वहित नोंदविण्यात आले आहेत, त्या पृष्ठांची झेरॉक्स प्रत देण्यात यावी.

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २.४.२००७ रोजी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चिमूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलामध्ये सुध्दा सतत माहिती अधिकारी गैरहजर असल्यामुळे अर्ज स्विकारला गेला नाही व परत केला यास्तव, असे अपीलाचे कारण दिलेले दिसून येते. व त्यानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपीलकर्ता यांचा दिनांक २.३.२००७ रोजीचा अर्ज त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी रजिस्टर पोस्टाने श्री झाडे, मुख्याध्यापक असे संबोधून पाठविला होता. सदरच्या अर्जाची पोच पावतीसह त्यावर शाळेत हजर मिळाले नाही करीता परत असा शेरा दिलेला दिसून येतो. त्याकरीता पोस्टमन यांचा शेरा गैरहजर, खोब्रागडे १०/३०७ ते २०/३/२००७ पर्यंत. त्यानंतर प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, अपीलकर्ता यांचा प्रथम अपील अर्ज त्यांना मिळाला होता त्यावर अपीलकर्ता यांची सही नव्हती. सदरच्या जोडपत्राची छायांकित प्रत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सादर केली आहे. त्यावर अपीलार्थीची स्वाक्षरी नाही. तरी सुध्दा अपीलीय अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, त्यांनी अपीलकर्ता यांना दूरध्वनीवर सदरच्या अर्जाबाबत विचारणा केली होती. परंतु, त्यानंतर त्यांचेकडून कोणत्याही प्रकारचे उत्तर आले नाही व त्याकरीता दिनांक ३.५.२००७ रोजी तशा प्रकारे कळविलेले दिसून येते. त्याकरीता जावक नोंदवहीतील छायांकित प्रत त्यांनी दाखल केली आहे. जावक नोंद वहीतील छायांकित प्रती मध्ये दिनांक ३.५.२००७ या तारखेस १५६१ ते

१५६६ अशा पत्रव्यवहाराच्या नोंदी दिसून येते. प्रकल्प अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

" उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करण्यात येते की, वरील प्रकरणाशी संबंधित खुलासा खालील प्रमाणे सादर करण्यांत येत आहे.

१. श्री रमेश केशवराव भूरे, मु. प्रगती कॅालनी, नागभीड ता. नागभिड यांचा अपील अर्ज या कार्यालयास दिनांक ३.४.२००७ रोजी सादर झालेला होता. मात्र, सदर अपील अर्ज अपूर्ण तथा त्यावर स्वाक्षरी नसल्याने सदर अपील दाखल करुन घेतले नाही व तसे श्री रमेश केशव भूरे यांना या कार्यालया तर्फे दिनांक ३.५.२००७ अन्वये कळविण्यांत आले होते. त्यानंतर श्री रमेश केशव भूरे यांचेकडून याबाबत स्वाक्षरीसह फेर अर्ज सादर न झाल्याने याबाबत पुएील कार्यवाही करता आली नाही.

२. श्री अर्जदार रमेश केशव भुरे यांनी राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र नागपूर यांचेकडे द्वितीय अपील सादर केल्यानंतर दिनांक १३.६.२००८ रोजी या प्रकरणाबाबत प्रत्यक्ष अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र. यांनी दूरध्वनीवरुन संपर्क साधला व त्यांना दिनांक १६.६.२००८ रोजी यासंबंधाने वस्तुस्थिती स्पष्टकरणेसाठी तसेच सुनावणी देणेसाठी कार्यालयास हजर राहाणेबाबत विनंती करण्यात आली होती. तसे त्यांना परत पत्र देण्यांत आले होते. मात्र, दिनांक १६.६.२००८ रोजी अर्जदार या कार्यालयास हजर झाले नाही. प्रत्यक्ष अर्जदाराकडून त्यांच्या स्वाक्षरीसह अर्ज दाखल झाल्यास त्यांना तात्काळ माहिती देणेबाबत कार्यवाही करण्यांत येईल. कृपया खुलासा मान्य करावा, ही विनंती. "

त्याचप्रमाणे मुख्याध्यापक तथा माहिती अधिकारी यांनी सुध्दा आयोगाकडे खुलासा दाखल केला आहे. तत्कालीन मुख्याध्यापक यांनी विद्यमान मुख्याध्यापक यांना दिनांक २४.६.२००८ च्या पत्राची छायांकित प्रत दाखल केलेली दिसून येते. त्यामध्ये डाक न स्विकारण्याची माहिती त्यांनी कळविलेली दिसून येते. आयोगापूढे सुध्दा आज ते हजर आहे व त्यांनी मार्च, २००७ शाळेत परीक्षा दिनांक १२.३.२००७ ते २८.३.२००७ या कालावधीत असल्याने परीक्षा केंद्र मेंढाळी, ता. नागभिड, जिल्हा चंद्रपूर येथील वस्तीगृहातील विद्यार्थ्यांच्या निवासाची

व शैक्षणिक व्यवस्थेकरीता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहाणे आवश्यक असल्याने सदर कालावधीत मुख्यालयास अनुपस्थिती खालीलप्रमाणे.

दिनांक १०.३.२००६ शनिवार अर्धा दिवस शाळा

दिनांक ११.३.२००६ रविवार, शासकिय सुटी

दिनांक १२.३.२००७ ते २१.३.२००७ परीक्षा केंद्र मेंढाळी येथे शासकिय कामाने उपस्थित.

तसेच सदर पंजिबध्द डाक व्यक्तीगत माझ्या नांवाने असल्याने कार्यालयीन शिपाई व इतर कर्मचा-यांनी स्विकारले नाही व मी शासकिय कार्यालयीन कामाने मुख्यालयी नसल्याने सदर डाक स्विकारण्यात आली नाही, असा खुलासा केला आहे.

अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम च्या तरतूदी प्रमाणे जो अर्ज मुख्याध्यापक श्री झाडे यांचेकडे रजिस्टर पोस्टाने पाठविला तो माहिती अधिकारी म्हणून पाठविलेला दिसून येत नाही. माहिती अधिकारी म्हणून पाठविला असता तर शाळेतील प्रशासनाला तो स्विकारावा लागता असता व त्यामुळे तत्कालीन मुख्याध्यापक यांनी केलेला खुलासा योग्य वाटतो. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा स्वाक्षरी नसलेले अपील असल्यामुळे त्याबाबत कार्यवाही न करणे बध्दल प्रथम अपीलीय अधिकारी यांना जबाबदार धरता येणार नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे. सार्वजनिक प्राधिकरणास अधिनियमाच्या तरतूदी लागू आहेत तशाच तया अर्जदारांस सुध्दा लागू आहेत व कायद्याचा आधार घेतल्यावर अर्जदार यांनी सुध्दा सर्व तरतूदीचे पालन करणे आवश्यक आहे.

**अपील क्रमांक १७८७/२००७** : मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२००७ रोजी माहिती अधिकारी, शासकिय पोस्ट बेसिक कन्या आश्रम शाळा चिंधीचक, तालुका नागभिड यांचेकडे माहितीचा कालावधी आर्थिक वर्ष २००४-०५, २००५-०६ व २००६ ते फेब्रुवारी, २००७. (१) सदर कालावधीत श्री डी.एम.झाडे यांनी किती रकमेचे प्रवास भत्ता देयक सादर केले व किती मंजूर करण्यात आले. (२) सदर कालावधीतील संपुर्ण बिलाच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत

माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चिमूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्या अपीलावर तारीख नाही. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात निर्णय न झाल्यामुळे दिनांक १०.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२००७ चा अर्ज हा रजिस्टर पोस्टाने पाठविलेला होता असे सांगितले. त्याकरीता रजिस्टर पोचपावतीची छायांकित प्रत त्यांनी दाखल केली आहे. त्यावर शाळेत मिळत नाही करीता परत अशा प्रकारचा दिनांक २.४.२००७ चा शेरा दिसून येतो. सदरचे रजिस्टर पत्र श्री डी.एम.झाडे, मुख्याध्यापक यांना संबोधून दिलेले दिसून येते. पोस्टमनने सुध्दा गैरहजर. खोब्रागडे, दिनांक २४.३.२००७ अशी सही करुन दिनांक २९.३.२००७ प्रमाणे शेरे दिलेले आहे.

प्रथम अपीलाच्या संदर्भात खुलासा दाखल करताना तत्कालीन मुख्याध्यापक यांनी असे सांगितले की, १० वी च्या परीक्षेच्या संदर्भामध्ये केंद्राच्या ठिकाणी विद्यार्थ्यांची व्यवस्था करण्याकरीता गेलो असल्यामुळे शाळेत हजर नव्हतो व सदरचे रजिस्टर पत्र हे त्यांच्या स्वतःच्या नांवाने असल्याने शाळेत कोणीही स्विकारलेले दिसून येत नाही. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

" उपरोक्त विषयान्वये खालील प्रमाणे खुलासा सादर करण्यांत येते की,

१. श्री रमेश केशव भुरे यांनी या कार्यालयाकडे दिनांक ०.४.२००७ रोजी माहिती मिळविण्यासाठी अपील अर्ज सादर केला होता. व माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याबाबत नमूद केले होते. त्यानुषंगाने अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चिमूर यांनी माहिती अधिकारी तथा माध्यमिक शासकिय आदिवासी आश्रमशाळा चिंधिचक यांना दिनांक १०.५.२००७ अन्वये तात्काळ माहिती सादर करणेबाबत सूचना देण्यात आल्या होत्या.

२. अर्जदाराने माहिती अधिका-यांकडे अर्ज सादर न करताच परस्पर या कार्यालयास अपील दाखल केले असल्याचे दिसून येते. अर्जदाराने सादर केलेल्या पोच पावत्यावर माहिती अधिकारी

कार्यालयात मिळाले नसल्याने अपील दाखल करीत आहे असे नमूद केले आहे. मात्र, मुख्याध्यापक यांचे कार्यालय कार्यालयीन वेळेत सुरु होते.

मध्यंतरी अर्जदाराने महालेखाकार कार्यालय, नागपूर यांचेकडे हिच माहिती मिळणेबाबत दिनांक १०.५.२००७ रोजी माहिती अधिकार अंतर्गत अर्ज दाखल केला होता. महालेखाकार, कार्यालय नागपूर यांनी सदर अर्ज माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे आवश्यक माहिती देणे तथा आवश्यक कार्यवाहीसाठी त्यांचेकडे वर्ग केला. त्या अर्जावर कार्यवाही करुन माहिती अधिका-यांनी त्यांचे पत्र दिनांक ३०.५.२००७ यांनी अर्जदारास आवश्यक असलेली शासकिय फी भरणेबाबत निर्देश दिले होते. मात्र, सदर अर्जदाराने माहितीसाठी आवश्यक फी न भरल्याने त्यांना अद्याप माहिती देता आली नाही.

याबाबत अर्जदाराशी अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी यांनी दिनांक १३.६.२००८ रोजी प्रत्यक्ष दुरध्वनीवरुन बोलून दिनांक १६.६.२००८ रोजी अर्जदारास सुनावणीसाठी उपस्थित राहाणेबाबत विनंती केली होती. मात्र, अर्जदार हे सदर दिनांकास या कार्यालयास उपस्थित झाले नाही. त्यामुळे त्यांना सुनावणी देता आली नाही.

वरील प्रकरणी अर्जदारांनी आवश्यक ती फी भरल्यास त्यांना तात्काळ माहिती उपलबध करुन देता येईल. कृपया माहितीस्तव सविनय सादर. "

सदरच्या खुलाशावरुन असे दिसून येते की, माहिती अधिकारी तथा माध्यमिक शासकिय आश्रमशाळा चिंधीचक यांना दिनांक १०.५.२००७ अन्वये तात्काळ माहिती सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्याबाबत सदरच्या पत्राची झेरॉक्स प्रत जोडलेली दिसून येते. अर्जदाराने माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज सादर न करता परस्पर अपील दाखल केल्याचे दिसून येते. परंतु, मध्यंतरी अर्जदाराने महालेखाकार यांचेकडे दिनांक १०.५.२००७ रोजी अर्ज दाखल केला होता. महालेखाकार यांनी मुख्याध्यापक यांचेकडे अर्ज वर्ग केला. त्या अर्जावर कार्यवाही करुन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दिनांक ३०.५.२००७ रोजी अर्जदारास आवश्यक असलेली शासकिय फी भरण्याबाबत निर्देश दिले होते. त्या पत्राची छायांकित प्रत ही माहिती अधिकारी यांनी दाखल केली आहे. त्यामध्ये एकुण देयकाची पेजेस १४३ असून सदर देयकाची झेरॉक्स प्रत पाहिजे असल्यास १ रुपया प्रती प्रमाणे १४३ रुपये कार्यालयात जमा

करावे किंवा मुख्य लेखाशिर्ष २२२५१२३२/२५०००२८०२ इतर सामाजिक सेवा या लेखाशिर्षाखाली रक्कम चालानद्वारे जमा करुन चलनाची मुळ प्रत कार्यालयात जमा केल्यास दस्तऐवजाची झेरॉक्स प्रत आपणास उपलब्ध करुन देता येईल, असे कळविलेले दिसून येते. सोबत दिनांक ११.५.२००७ चे महालेखाकार यांनी मुख्याध्यापक यांना पाठविलेल्या पत्राची प्रत दाखल केली आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांना यु.पी.सी. ने पाठविलेल्या स्थळ प्रतीची छायांकित प्रत दाखल केली आहे. जावक नोंदवहीमध्ये १७२ ते १७९ या क्रमांका मध्ये १७५ क्रमांकावर अपीलकर्ता यांना पत्र पाठविल्याची नोंद दिसून येते. परंतु सदरचे पत्र अपीलकर्ता यांना मिळाले नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. तसे असेल तर अपीलकर्ता यांना पुन्हा माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता अपीलकर्ता यांनी खर्च रुपये १४३/- भरण्याबाबतचे पत्र त्यांना पुन्हा देवून त्यांनी रुपये १४३/- चा खर्चाचा भरणा केल्यास माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज पाठवितांना तो माहिती अधिकारी म्हणून पाठविणे आवश्यक असते. माहिती अधिका-यांनी तो अर्ज स्विकारला नाही तर त्यास जबाबदार धरले जाते. तसेच स्वाक्षरी नसल्यास कोणत्याही अर्जाची दखल घेणे आवश्यक नसते व त्यामुळे त्यांचे अपील क्रमांक १७८६/२००७ मध्ये माहितीचा अर्ज व प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही हे त्यांना कळून येईल. तसेच त्यांनी अपील क्रमांक १७८७/२००७ मध्ये सुध्दा रजिस्टर पोस्टाने वैयक्तिकरित्या संबोधून माहितीचा अर्ज पाठविलेला असल्यामुळे तो स्विकारला गेला नसल्यास जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरता येणार नाही. वरीलप्रमाणे दोनही अर्जाच्या संदर्भामध्ये मात्र जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहे या कारणास्तव ते परत आलेले आहेत.

## <u>आदेश</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १७८६ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २.३.२००७ रोजीच्या अर्जाप्रमाणे मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत पोस्टाने पाठविण्यात याव्यात. अपीलकर्ता यांना

सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने हवी असल्यास रजिस्टर पोस्टेज रुपये २५/- चा भरणा जन माहिती अधिकारी यांचेकडे करावा.

२) अपील क्रमांक १७८७/२००७ हे अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना दिनांक ३०.५.२००७ चे पत्रात कळविल्याप्रमाणे छायांकित प्रतीचे रुपये १४३/- चा खर्च तसेच रजिस्टर पोस्टाचा खर्च जन माहिती अधिकारी यांचेकडे भरणा करावा व माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-१८.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १३८३/२००७**

**१) श्री  ओमप्रकाश यशवंत सुरवाडे**
**मु.पो. बखाडी, ता. बाळापूर, जि. अकोला** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कुलसचिव**
**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती-४४४६०२.**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य**
**कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बाळापूर**
**ता. बाळापूर, जिल्हा अकोला.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १८.७.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी गैरहजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.६.२००६ रोजी प्राचार्य, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बाळापूर यांचेकडे शासकिय माहिती अधिकारी म्हणून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** : " १. U.G.C. कडून प्राप्त व खर्च केलैल्या अनुदानाच्या विषयनिहाय तपशिल.

२. संस्थेचा बॅकलॉग न भरण्याची कारणे

३. सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवापुस्तकांच्या सत्यप्रती.

४. सर्व प्राध्यापकांच्या तक्रारी व दिलेल्या उत्तरांच्या सांक्षांकित सत्यप्रती.

५. जागेचया नमूना (८) व (५८ अहवालाच्या सत्यप्रती.

६.  विद्यार्थ्यांची विषयावार संख्या.

७. भारत सरकार शिष्यवृत्ती वाटपांच्या विद्यार्थीनिहाय तपशिल."

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ८.८.२००६ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचेकडे प्रथम अपील केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक २४.९.२००६ रोजी महाविद्यालयाचे माहिती अधिका-याकडे अर्ज करावा लागेल असे कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी कळविलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२००८ रोजी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आह

" मी खुलासा करतो तो येणेप्रमाणे-

१. प्राचार्याकडे माहिती मिळण्यासाठी मी. U.P.C. पोस्टाने दिनांक १०.७.२००६ रोजी अर्ज केला.

२. त्यावर दि. ८.८.२००६ ला प्राचार्याने केवळ एका मुद्यांची माहिती मिळविण्यासाठी रुपये १५००/- ची पत्राने मागणी केली.

३. त्याआधी म्हणजे दि. ७.८.२००६ ला मी कुलगुरु, अमरावती विद्यापीठ अमरावतीकडे अपील दाखल केले.

४. अमरावती विद्यापीठाने दि. १४.९.२००६ ला ते अजीलीय अधिकारी नसल्याचे पत्र मला पाठविले.

५. मी महाविद्यालयात अपीलीय अधिकारी कोण याची चौकशी केली पण मला माहिती मिळाली नाही.

६. म्हणून मी दि. ४.१२.२००६ रोजी आपणाकडे अपील दाखल केले.

७. जर कार्यालयाच्या दर्शनी भागात माहिती अधिकारी, अपीलीय अधिकारी यांचे फलक असते, तर आपणाकडे येण्याचा त्रास वाचला असता. "

उत्तरवादी यांचे तर्फे सुध्दा श्री निरज श्रीनिवास खांदेवाले यांनी वकील पत्र दाखल करुन दिनांक २१.४.२००८ रोजी खुलासा दाखल केला आहे. तो खालीलप्रमाणे आहे.

" १. That the appellant has preferred this appeal and challenged that the respondent No. २ has not furnished the required information. It is stated that appellant has submitted that he is poor person and is below poverty line. That the respondent No.२ has received the documents to demonstrate that the appellant is not a BPL person and he has misled the authorities and has stated false.

२. The respondent No.२ seeks permission to file the reply relevant documents to support the claim. Secondly it is stated that the respondent No. २ college is not receiving any grants from the UGC therefore the information about accounts of grants received from the UGC does not arise. Regarding the other information the appellant not being a person below poverty line is required to pay the cnecessary stamps and pay for the incidental expenses. The appellant having failed to do so the RTI Act does not hold the respondent No.२ responsible for any violation of the Act.

३. That the respondent No.२ has not violated any of the provisions of law. On the contrary the appellant has misguided the authorities by making false statements. The appeal therefore deserves to be dismissed ".

त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्राचे संदर्भामध्ये विचारणा केली असता अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, त्यांचे प्रमाणपत्र खरे आहे. त्यावर उत्तरवादी क्रमांक २ यांनी पुन्हा शपथपत्र आयोगाकडे दाखल केले. शपथपत्राचा परिच्छेद ३ मध्ये " That the respondent No.२ has received the documents to demonstrate that the appellant is not a BPL person and he has misled the authorities and has stated falsely. The claim of the appellant that he is a Below poverty

Line (BPL) person is false and fabricated. The appellant's father is an Ex Serviceman and he receives pension from the government. The father and appellant constitute a joint family. The BPL certificate filed by the appellant is for the year १९९७-९८. There is no mention that as on today the appellant is still a BPL person. "

त्या तारखेस अपीलकर्ता हे गैरहजर आहे व त्यामुळे उत्तरवादी नंबर २ यांनी अपीलकर्ता यांना जे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्रधारक आहे व त्यांच्या प्रमाणपत्र हे वैध आहे याबध्दल त्यांनी शपथपत्र दाखल करावे अशी आयोगाकडे विनंती केली. व त्याप्रमाणे दिनांक २५.४.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी आयोगाचे आदेशाप्रमाणे आयोगाचे उपसचिव यांनी दिनांक १८.७.२००८ रोजी दुपारी २.०० वाजता उत्तरवादी यांचे वकीलांनी दाखल केलेला अर्ज व शपथपत्राची प्रत सोबत जोडून त्याप्रमाणे दारिद्रय रेषेखालील असल्याबाबत शपथपत्र सुनावणीचे तारखेला किंवा तत्पूर्वी दाखल करावे असे पत्र पाठविले आहे. परंतु, सुनावणी दुपारी २.०० ठेवण्यात आली असून सुध्दा अपीलकर्ता हे ५.०० वाजेपर्यंत आयोगाचे कार्यालयात हजर झाले नाही. व यांनी शपथपत्र सुध्दा दाखल केले नाही. व त्यामुळ सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांनी उत्तरवादी यांच्या दिनांक २४.४.२००८ च्या अर्जाप्रमाणे व शपथपत्राप्रमाणे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्राच्या वैधता संदर्भामध्ये शपथपत्र दाखल करावे अशी विनंती केलेली असून सुध्दा व तसे आयोगाने आदेश दिलेले असून सुध्दा शपथपत्र दाखल केलेले नसल्यामुळे व सुनावणीसही हजर झालेले नसल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-१८.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७९१/२००७**

**१) श्री ए.जे. गेडाम,**
**१३ ए, वंजारीनगर, पो.ऑफिस अजनी**
**नागपूर-४४०००३.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**पोलीस उपायुक्त झोन क्रं.१, सिव्हील लाईन, नागपूर**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,**
**पोलीस स्टेशन, अजनी, नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १९.७.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी म्हणून पोलीस स्टेशन अजनी यांचेकउे खालीलप्रमाणे माहिती मागण्यासाठी अर्ज केलेला दिसून येतो.

'' Particulars of Information required : १) Action taken on various complaints made by me. २) Xrox of complaint made on २६.१०.२००६ by Shri Shrirang Bija Dhanvijay of TYg १२th Ajni Rly. Coloney, Nagpur addressed to P.S. Ajni, Nagpur. Dissolution of enagement of my son Harishchandra & Ku. Mamta D/o Shrirang Dhanvijay hirra to theft, defamation, cheating & dowry demand made on me dated २६.१०.०६ to ३०.१०.०६ '' सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २२.३.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे त्यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक ३१.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १८.४.२००७ रोजी देण्यात आला असून सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. अपील मेमोमध्ये अपीलकर्ता यांनी त्यांच्या F.I.R. तक्रारीवर कारवाई कां झाली नाही याबध्दलची माहिती मिळावी अशी विनंती केलेली आहे. सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

" सादर आहे की, विषयात नमूद द्वितीय अपील मध्ये दि. १९.६.२००८ रोजी होणा-या सुनावणीची नोटीस या कार्यालयात दि. १६.६.२००८ रोजी प्राप्त झाली. उपरोक्त अपीलाच्या संदर्भात तथ्य माहिती व खुलासा खालील प्रमाणे सादर आहे.

अपीलकर्ता अर्जदार अरुण जगन्नाथ गेडाम यांने दि. २४.१.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे माहिती मिळणे बाबत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये सपोआ अजनी विभाग, कार्यालयात अर्ज सादर केलेला होता. सदर अर्जात त्यांनी पोलीस स्टेशन अजनी येथे वेळोवेळी दिलेल्या तक्रार अर्जावर काय कारवाई करण्यात आली. तसेच गैरअर्जदार श्रीरंग बिजा धनविजय यांनी दि. २६.१०.२००६ रोजी त्याचे विरुध्द दिलेल्या अर्जाच्या प्रतीची मागणी केलेली होती. तसेच मागणी अर्जातील कॅालम नं. ३ मधील (iii) Description of the information required या रकान्यात (१) Report on our complaints numbering five (२) Copy of the complaint असे नमूद केले होते.

सदरहु अर्जातील माहिती पो.स्टे. अजनी शी संबंधीत असल्याने वपोनि अजनी यांना सदर माहिती त्वरीत सादर करणे बाबत जा.क्रं.११५/०७, दि. २७.१.०७ रोजी पत्र देण्यात आले.

सदरहु अर्जा संबंधाने वपोनी अजनी यांनी अर्जदारांनी मागितलेली माहिती सादर करणेबाबत स्मरणपत्र क्रं.१, जा.क्रं.२११/०७, दि. १६.२.०७ रोजी देण्यात आले. तसेच पुन्हा स्मरणपत्र क्रं.२ जा.क्रं.२९५/०७, दि. २६.२.०७ रोजी देण्यात आले.

दि. २६.२.०७ रोजी वपोनि अजनी यांनी माहिती सादर केली परंतु अर्जात नमूद प्रमाणे माहिती सादर न केल्याने अर्जातील माहिती त्वरीत सादर करणेबाबत स्मरणपत्र क्रं.३ जा.क्रं. ३६९/०७, दि. ६.३.२००७ रोजी देण्यात आले. दिनांक १७.३.२००७ रोजी वपोनि यांनी अर्जदारांनी मागितलेली माहिती सादर केल्याने अर्जदार यांना माहिती घेवून जाणेबाबत वपोनि अजनी मार्फत जा.क्रं.४३०/०७, दि.१७.३.०७ प्रमाणे पत्र देण्यात आले.

दि. २२.३.०७ रोजी अर्जदारा तर्फे त्याचा मुलगा प्रसन्नजीत गेडाम हा हजर आल्याने त्यास वपोनि अजनी यांचे प्राप्त माहिती पुरविण्यात आली. परंतु त्यांनी दि. २६.१०.०६ रोजी श्रीरंग धनविजय यांनी दिलेल्या तक्रार अर्जाची प्रत मिळाली नसल्याचे निर्दशनास आणून दिल्याने त्याबाबत पुन्हा वपोनि अजनी यांना जा.क्रं.४५५/०७, दि. २२.३.२००७ अन्वये पत्र देण्यात आले. त्यावर दि. २३.३.२००७ रोजी वपोनि अजनी यांनी कळविले की, अर्जदार यांनी मागितलेले श्रीरंग बिजा धनविजय यांनी पो.स्टे.अजनी येथे अर्ज दिलेला नव्हाता तर ॲडव्होकेट श्री गि-हे यांचे मार्फत हर्षवर्धन गेडाम यांना पाठविलेली नोटीसची एक प्रत पो.स्टे.ला दिलेली होती. व नोटीसची प्रत सोबत पाठविली. ती नोटीसची प्रत व वपोनि अजनी यांनी पाठविलेले लेखी उत्तर अर्जदारा मार्फत त्यांचा मुलगा ॲडव्हेकेट प्रसन्नजित गेडाम हजर आल्याने त्यांना दि. २३.३.२००७ रोजी देण्यात आले.

अर्जदार यांनी दिलेल्या अर्जा संबंधाने पोउपनि व्ही.एस.सोनटक्के पो.स्टे. अजनील यांनी अहवाल सादर केलेला आहे. त्यात नमूद केले आहे की, अरुण जगन्नाथ गेडाम व श्रीरंग बिजा धनविजय यांनी एकमेकां विरुध्द पो.स्टे.ला तक्रारी दाखल केलेल्या होत्या. त्या अर्जाची चौकशी केली असता श्री अरुण जगन्नाथ गेडाम यांचा मुलगा हर्षवर्धन याचे लग्न श्रीरंग बिजा धनविजय यांची मुलगी ममता हिचे सोबत जोडून सक्षगंध झालेले होते. परंतु काही कारणास्तव सदरचे लग्न तुटले. साक्षगंधा मध्ये झालेल्या खर्चा वरुन एकमेकांना दिलेल्या भेट वस्तु परत करण्याच्या वादा वरुन एकमेंकाविरुध्द अर्ज केलेले होते. त्यावरुन दोघांनाही पो.स्टे.ला बोलविण्यात आले असता त्यांची आपसात चर्चा होऊन दि. १०.१.२००७ रोजी एकमेकांना दिलेल्या भेट वस्तु परत करुन दोघांनाही भेटवस्तू परत मिळाल्याबाबत व सामानाबाबत काही तक्रार राहीली नाही. तसेच त्यांचा वाद मिटलेला आहे असे आपले बयानात नमूद करुन दोघांनीही सहीनिशी बयाण

दिलेले आहे. त्यामुळे वाद मिटल्याबाबत पो.स्टे.चे स्टेशन डायरी मध्ये नोंद क्रं.३२/०७ दि. १०.१.०७ चे १७.१० वाजता घेण्यात येवून त्या नोंदीची प्रत व दोघांचे बयाण सोबत पाठविले. तसेच उपरोक्त अर्ज फाईल होणेबाबत अहवाल पाठविण्याची तजविज ठेवली असल्याचे नमूद केले आहे.

पोउपनि व्ही.ए. सोनटक्के यांनी श्री अरुण जगन्नाथ गेडाम यांचे दि. १०.१.०७ रोजी घेतलेल्या जबाबावर त्याची स्वतःची तसेच त्यांचा मुलगा प्रसन्नजित गेडाम याची स्वाक्षरी असून त्यात भेटवस्तू परत मिळालेल्या असून गैरअर्जदार धनविजय यांचे विरुध्द कोणतीही तक्रार उरलेली नाही असे स्पष्ट नमूद आहे. त्यामुळे वाद मिटल्याबाबत पो.स्टे.अजनीचे स्टेशन डायरी नोंद क्रं.३२/०७ दि. १०.१.०७ चे १७.१० घेण्यात आले. तसेच गैरअर्जदारास अर्जदार यांनी दिलेल्या तक्रारीवर कलम १४९ जा.फौ.प्रमाणे नोटीस सुध्दा देण्यात आलेली होती. उपरोक्त प्रमाणे सर्व कागदपत्राच्या प्रती अपीलकर्त्यास देण्यात आलेल्या आहेत.

एकंदरीत उपरोक्त प्रकरण हे साक्षगंध तुटून साक्षगंधाचा खर्च व एकमेकांना दिलेल्या भेटवस्तू परत करण्याची मागणी या वादातून उदभवलेले असून ते स्पष्टपणे दिवाणी स्वरुपाची बाब आहे. तरीपण पोलीसांनी चौकशी सुरु केली होती व गैरअर्जदारास कलम १४९ जा.फौ.अन्वये नोटीस सुध्दा बजाविली होती. दरम्यान दोघांचा वाद मिटल्याने अर्ज दप्तरी दाखल करण्यात आले होते. यावरही अर्जदाराने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहितीची मागणी केल्याने त्यास माहिती पुरविण्यात आलेली आहे. सबब अपीलकर्त्याची अपील निकाली काढण्यास विनंती आहे".

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२००७ रोजी माहितीचा अर्ज हा अजनी पोलीस स्टेशन येथे दिला होता. व तो माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक २४.१.२००७ रोजी उपलब्ध झाला. सदरच्या अर्जामध्ये व्यक्तीशः माहिती घेणार असे नमूद केले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः माहिती घेण्याकरीता जन माहिती अधिकारी यांचेकडे जावयास पाहिजे होते. जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही तर त्याविरुध्द जन माहिती अधिकारी यांचेकडे आक्षेप घेणारे पत्र दिले असले पाहिजे. तशाप्रकारे पत्र दिलेले दिसून येत नाही. त्याचप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक २२.३.२००६ रोजी विलंबाने माहिती उपलब्ध

करुन देण्याचे कारण जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, सदरची माहिती ही अजनी पोलीस स्टेशन मध्ये असल्यामुळे ती उपलब्ध करुन घेण्यास विलंब झाला व त्यामुळे दिनांक २२.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांना माहितीच्या करीता शुल्क रुपये २०/- भरण्यास कळविले व त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्यामध्ये त्यांच्या तक्रारीवर कोणत्या प्रकारची कार्यवाही कां करण्यात आली नाही हे त्यांना अपेक्षित होते. परंतु, ती कार्यवाही झाल्याची माहिती दिली नाही. मात्र, त्यांच्या तक्रारीच्या प्रती हया परत केल्या आहेत. अपीलकर्ता यांचे अर्जात दोन परिच्छेद आहेत. १) दाखल केलेल्या तक्रारीवरील अहवाल २) तक्रारीची प्रत. त्यामुळे तक्रारीच्या प्रती हया त्यांना परत करण्यात आलेल्या दिसून येतात. माहितीचा अधिकार अधिनियमांचे तरतूदी प्रमाणे अभिलेखे व कागदपत्रे यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिल्या जातात व साध्या तक्रारीवर कार्यवाही केली असल्यास व केली नसल्यास त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली जाते. तक्रारीवर कार्यवाही कां केली नाही याबाबतचे उत्तर अपेक्षित नाही व त्यांच्या एकाच प्रकरणांतील वेगवेगळया तक्रारी असल्याने व श्री धनविजय यांचे विरुध्द तक्रार राहीली नाही असे लिहून दिले असल्याप्रमार्णेच त्यांच्या इतर तक्रारीवर कारवाई केलेली दिसून येत नाही. मात्र माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतूदींप्रमाणे कारवाई कां केली नाही असे विचारता येत नसल्याने त्यांना माहिती उपलब्ध झाली आहे असाच निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झाली आहे ती त्यांच्या अर्जात मागितल्याप्रमाणे आहे व उपलब्ध झालेल्या माहितीतील निर्णय प्रक्रियेच्या गुणवत्तेच्या संदर्भात त्यांना तक्रार असल्यास त्यांनी ती स्वतंत्रपणे सक्षम अधिकारी यांचेकडे करणे संयुक्तिक राहील व तसेही त्यांच्या सर्व तक्रारीतील गुन्हयाचे स्वरुप हे अदखलपात्र गुन्हयाचेच दिसून येते. अर्जदार हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदींची पूर्ण माहिती न घेता आयोगाकडून कारवाईची किंवा कारणांची अपेक्षा करतात व त्यामुळेंच त्यांना माहिती मिळालेली असली तरी अपेक्षा भंग होतो. अर्थात त्यावर अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, माझ्या तक्रारीच्या प्रती परत कां केल्या. परंतु अर्जात नमूद केलेले असल्यामुळे त्या त्यांना परत केल्या. अर्जदाराच्या अर्जात काय अभिप्रेत आहेत हे त्यांनी अर्जात स्पष्टपणे द्यावयाचे असते. व त्यामुळे त्यांना अभिप्रेत असलेली

प्रत ही स्पष्टपणे तसे नमूद केलेले नसल्यामुळे त्यांना त्यांच्या तक्रारीची प्रत परत करण्यात आल्याचे दिसून येते. त्यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भात जी कार्यवाही केलेली आहे त्या कार्यवाहीच्या संदर्भामध्ये दिनांक २२.३.२००७ रोजीचे पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन अजनी, नागपूर यांनी सहाय्यक पोलीस आयुक्त यांचेकडे पाठविलेल्या अहवालाची प्रत त्यांच्या दिनांक २६.२.२००७ रोजी पोलीस इन्सपेक्टर, पोलीस स्टेशन अजनी यांनी सहाय्यक पोलीस आयुक्त यांचेकडे दिलेल्या अहवालाची प्रत दिलेली आहे. तसेच अपीलकर्ता यांनी दिलेल्या बयाणाच्या प्रती सुध्दा त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. परंतु, अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, बयाणांची व नोटीस वगैरेच्या प्रत त्यांना आज उपलब्ध करुन दिल्या त्या त्यांनी अर्जात मागितलेल्याच नव्हत्या असे दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीवरुन अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, त्यांच्या तक्रारीवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. व जी उपलब्ध करुन दिलेली आहे त्या माहितीमध्ये धनविजय यांची खोटी सही दिसून येते. परंतु जी कार्यवाही पोलीस यांनी केलेली आहे, व त्याबाबत जी कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली आहे त्या संदर्भामध्ये निर्णय प्रक्रियेतील गुणवत्तेबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करुन देण्यास आदेश करण्याचे अधिकार हे राज्य माहिती आयोगाच्या कक्षेच्या बाहेर आहे. जी माहिती असेल ती, ज्या स्वरुपात असेल त्या स्वरुपात ती उपलब्ध करुन देणे हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (च) मधील "माहिती" या बध्दलच्या व्याख्येत येते. माहिती या शब्दाच्या व्याख्येमध्ये ज्या साहित्याच्या स्वरुपात उदा. अभिलेखे, दस्तऐवज, कागदपत्रे, टिपणी इ.च्या स्वरुपातीत छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे असाच माहितीचा अधिकार आहे. झालेला निर्णय किंवा कार्यवाही ही योग्य आहे की अयोग्य आहे या संदर्भामध्ये उपलब्ध झालेल्या माहितीवरुन अर्जदाराने सक्षम अधिका-यांकडे तक्रार करुन त्याबध्दलचा न्याय त्यांना मिळवून घेता येईल. व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी जी कार्यवाही झालेली आहे त्याबध्दलची माहिती

उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १६.१.२००७ (२४.१.२००७)च्या अर्जाप्रमाणे जी माहिती मागितेली आहे त्या माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिलेल्या असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-१९.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७९८/२००७**
**अपील क्रमांक १७९९/२००७**
**अपील क्रमांक १८००/२००७**

**१) श्री पांडुरंग चिंतामन पराते**
**मु.पो. पालांदूर (चौ.), ता. लाखणी**
**जिल्हा भंडारा. ४४१८११** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव,**
**शारदा महिला मंडळ, मुरमाडी/तुप, ता. लाखनी**
**जिल्हा भंडारा.**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक**
**राष्ट्रमाता इंदिरा गांधी विद्यालय, मुरमाडी/तुप,**
**ता. लाखनी, जिल्हा भंडारा.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २१.७.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

**अपील क्रमांक १७९८/२००७**: मध्ये दिनांक ८.२.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांना खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

" (१) श्री एस.आर. शिवणकर यांची नियुक्ती शिक्षणाधिकारी यांचया तोंडी आदेशानुसार कोणत्या नियमानुसार हायस्कुलवरुन मिडलस्कुलवर करण्यात आली.

(२) श्री एस.आर. शिवणकर यांना ४५००-७००० वेतन श्रेणी मंजूर करण्यात आली तेव्हा शासन परिपत्रक क्रं.अमाशा/३०९५/क दिनांक १९.६.९५ नुसार २०/- रु. च्या स्टँप पेपरवर सदर

वेतनश्रेणीत काम करण्यास तयार असल्याचे हमीपत्र लिहून देण्यात आले होते. तेव्हा त्यांना कोणत्या नियमानुसार ५५००-९००० या वेतनश्रेणीची मागणी करण्यात आली.

(३) शासन परिपत्रक क्रं.अमशा/३०९५/क दिनांक १९.६.९५ व शासन परिपत्रक क्रं.अमाशा:४१ २००१/६८२१/क दिनांक २७.७.२००१ नुसार रिक्त पद भरताना विषय निहाय शिक्षकांची नियुक्ती करणे आवश्यक आहे व ज्या विषयाचा कार्यभार उपलब्ध असणे आवश्यक आहे. तेव्हा विद्यालयात विज्ञान विषयाचा कार्यभार उपलब्ध नसतांना बी.एससी (जीव.) बी.एड. पात्रता धारकाची पद भरण्याकरीता मंजूरी कोणत्या नियमानुसार मागण्यात आली."

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १४.३.२००७ रोजी माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना, आपणास पुरविण्यात आलेल्या माहितीचा तपशिल क्रमवार खालीलप्रमाणे-

"१) आपल्या मुद्या क्रं. १ ची माहिती व मा. शिक्षणाधिकारी यांचे पत्र यापुर्वीच दिले आहे.

२) आपला मुद्या क्रमांक २ ची माहिती आपणाला पुरविण्यात आले आहे.

३) आपला मुद्या क्रं. ३ चे संपूर्ण नियम व परीपत्रक आपणासच माहित आहेत तर आम्हाला माहिती विचारुन आपला वेळ कशाला खर्ची घालता.

आपणास असे कळवावे वाटते की, आपण केंद्रशासन माहितीचा अधिनियम २००५ चा गैरवापर करीत आहात या अधिकाराच्या खाली वारंवार तीच तीच माहिती विचारुन आपण आपला व कार्यालयाचा वेळ वाया घालवत आहात असे मला वाटते. यानंतर आपण असे करणार नाही, अशी अपेक्षा बाळगतो.

सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २०.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३०.४.२००७ रोजी दिलेला असून त्यामध्ये आपले मत व राज्य जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचे मत ऐकूण घेण्यात आले. मुख्याध्यापक यांनी आपणास पुरविलेली माहिती व पत्र पाहाण्यात आले. यावरुन असे निदर्शनास येते की, मुख्याध्यापकांनी शालेय दस्ताऐवजानुसार पुरविलेली माहिती  व दस्तऐवज सत्य आहे व आपले दिनांक २२.३.२००७ ला केलेले अपील फेटाळण्यात आलेले आहे " असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील मेमोमध्ये श्री शिवणकर यांच्या केलेल्या नियुक्तीच्या संदर्भामध्ये व वेतन श्रेणीच्या संदर्भामध्ये नियमाची माहिती मागितलेली आहे. अपीलकर्ता यांना दिनांक १४.३.२००७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांना विचारले असता जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना श्री शिवणकर, श्री भोयर सौ. कठाणे यांच्या संदर्भामध्ये पुर्वीच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याकरीता राज्य माहिती आयोगाकडील अपील क्रमांक ९६१२०७ चा निर्णय दिनांक २.२.२००८ रोजी दिलेला आहे. सदरच्या निर्णयाची प्रत ही आयोगाच्या कार्यालयातून घेण्यात आली व त्यामध्ये अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली दिसून येते त्यावरुन अपीलकर्ता तीच तीच माहिती वारंवार मागत आहे असे दिसून येते. सदरच्या अपीलाच्या निर्णयामध्ये अपील अंशतः मंजूर करण्यात आले असून अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असेल तर द्वितीय अपील मेमोमध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला आहे व त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये सुध्दा त्यांना संपुर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे, असेच दिसून येते. तसेच अपीलकर्ता यांना जर माहिती ही त्यांना उपलब्ध झाली असेल तर जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय येतील अशा प्रकारचे प्रश्न विचारुन वारंवार माहिती विचारतात असेही दिसून येते. कोणत्याही प्रकरणामध्ये निर्णय कां व कशा प्रकारे दिला किंवा तो वैध आहे किंवा अवैध आहे याबाबत कोणत्याही प्रकारची कारवाही करण्याचे, आदेश देण्याचे अधिकार राज्य माहिती आयोगास नाहीत. ही बाब अपीलकर्ता यांना वारंवार आयोगाने सुध्दा सांगितली आहे. दिनांक ८.२.२००७ च्या अर्जातील माहिती ही व त्यांच्या दिनांक ५.१२.२००६ च्या अर्जातील माहिती ही श्री एस.आर. शिवणकर यांच्या नियुक्तीबध्दल आहे. व जे प्रश्न त्या अर्जात उपस्थित केलेले आहेत, तशाच प्रकारचे प्रश्न या अर्जात सुध्दा उपस्थित केले आहेत. व त्यामुळे सदरची माहिती त्यांना उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**अपील क्रमांक १७९९/२००७** : मध्ये दिनांक १०.१.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन :" (१) रोस्टर (बिंदू नामावली) मध्ये शिक्षक संवर्ग विवरण पत्र यामध्ये कार्यरत कर्मचा-यांची यादी दिलेली आहे. व त्यांच्या नांवासमोर दिनांक लिहीलेली आहेत. ती दिनांक कशाची आहे ते कळविण्यात यावे. (नियुक्ती दिनांक, प्रथम मान्यता दिनांक, अखंडीत मान्यता दिनांक इत्यादि.)

(२) आपले पत्र क्रं.३७७/०७ दिनांक ५.१.०७ मधील दूसरे पान मुद्या क्रं.८ नुसार सत्र २०००-०१ पर्यंत २५ टक्के पदविधर शिक्षक या पदावर मा. शिक्षणाधिकारी यांनी कोणत्याही कर्मचा-याला मान्यता दिली नाही, असे लिहीले आहे. तेव्हा सत्र २०००-०१ पर्यंत २५ टक्के पदविधर शिक्षक हे पद रिक्त होते काय.

(३) श्री शिवणकर यांची प्रथम नियुक्ती हायस्कुलमध्ये होती. सत्र ९५-९६ व ९६-९७ मये हायस्कुल विभागात मान्यता प्रदान करण्यात आली होती. सत्र ९७-९८ व ९८-२००० मध्ये पर्यंत त्यांची नियुक्ती हायस्कुलवर होती. कोणत्या कारणामुळे श्री शिवणकर यांना हायस्कुल विभागात मान्यता देता येत नाही असे म्हटले.

खालील कागदपत्रांची प्रमाणित प्रत पुरविण्यात यावी.

(१) रोस्टर (बिंदू नामावली) रजीस्टर मधील पान क्रं. १ ते २६

(२) मा. शिक्षणाधिकारी, जि.प. भंडारा यांचे सूचनापत्र, ज्या सूचनेनुसार जुने रोस्टर बदलविण्यात आले ते पत्र.

(३) सत्र १९८७-८८ ते सत्र ९४-९५ पर्यंतचे शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे पगार बिले

(४) शाळा समितीचा ठराव दिनांक

(५) शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना मान्यता मिळविण्यासाठीचा संपुर्ण प्रस्ताव पत्र क्रं. ३७२/९६ दिनांक ६.३.९६.

(६) श्री शिवणकर यांचा मान्यतेचा प्रस्ताव (संपूर्ण) पत्र क्रं.१०२३/९९ दि. ३.१.२०००

(७) श्री शिवणकर यांचा वेतनश्रेणी वाढीचा संपूर्ण प्रस्ताव दिनांक ४.६.०४(५५००-९००० वेतन श्रेणी)

(८) शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी संच मंजूरी पत्रक सत्र ९५-९६ ते २०००-२००१ "

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १५.२.२००७ रोजी १७.१.२००७ व २९.१.२००७ च्या अर्जांचा संदर्भ देवून " १) आपण विचारलेल्या १ ते ३ मुद्यांची माहिती (पान २) खालील कागदाची प्रमाणित प्रत पुरविण्यात येत आहे.

(१) रोस्टर बिंदू नामावली मधील पा.क्रं. १ ते २३ (एकुण झेरॅाक्स पाने २३ जून्या रोस्टर रजिस्टरचे).

(२) रोस्टर रजिस्टर तयार करणे वा बदलविणे हे संस्थेचे कार्य आहे. त्याबध्दल सविस्तर संस्थेकडे विचारणा करावी.

(३) सत्र १९८७-८८ ते सत्र १९९४-९५ पर्यंतचे शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे पगार बिल (एकुण पाने ७६).

(४) शाळा समितीचा ठराव दि. २०.३.२००० या तारखेला शाळा समिती सभा झाली नाही. त्यामुळे आपणास ठराव पुरविण्यात आले नाही.

(५) शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना मान्यता मिळविण्यासाठी पाठविलेले संपूर्ण प्रस्ताव पत्र क्रं. ३७२/९६ दि. ६.३.९६ (एकुण पाने १३३).

(६) शिवणकर यांना मान्यता प्रस्ताव पत्र क्रं. १०२२/९६ दि. ३.१.१९९९ (एकुण पाने १४)

(७) श्री शिवणकर यांच्या वेतनवाढीचा प्रस्ताव दि. ४.६.२००४. सदर तारखेला श्री शिवणकर यांच्या वेतन वाढीचा प्रस्ताव पाठविण्यात आला नाही व तशी जावक रजिस्टरला नोंद नाही.

(८) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संच मंजूरी पत्रक १९९५ ते १९९६ ते २०००-२००१ (एकुण पाने ०७) " अशी माहिती पुरविलेली दिसून येते.

सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना कोणत्या मुद्यांच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध झाली नाही याबध्दल विचारले असता अर्जातील मुद्या क्रमांक २, मा. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांचे सूचना पत्र या सूचनेनुसार जूने रजिस्टर पाठविण्यात आले ते पत्र त्यांना उपलब्ध

झाले नाही त्याबध्दल त्यांनी पत्र उपलब्ध करुन द्यावे अशी मागणी केली. परंतु, त्याबध्दल जन माहिती अधिकारी यांनी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की,

शिक्षणाधिकारी यांनी तोंडी सूचना केल्या होत्या. तशा प्रकारचे लेखी पत्र नव्हते. तसेच रोस्टर रजिस्टर संवर्गनिहाय बदलविणे संस्थेचे अधिकार क्षेत्रात आहे, असे उत्तर दिलेले आहे. व याबध्दल संस्थेकडे विचारणा करण्यात यावी, असे उत्तर दिले. व त्यामुळे त्याबध्दलची माहिती सुध्दा त्यांना उपलब्ध झाली आहे, हा निष्कर्ष काढावा लागतो. सदरच्या सर्व प्रश्नांच्या मध्ये श्री शिवणकर यांच्या बध्दल माहिती विचारलेली दिसून येते व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**अपील क्रमांक १८००/२००७** : मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २४.२.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन :

" १) श्री एस.एस. कान्हेकर यांची २५ टक्के पदवीधर शिक्षक पदावरुन हायस्कुल विभागात केव्हा व कोणत्या नियमानुसार पदोन्नती करण्यात आली.

१) श्री एस.एस. कान्हेकर यांचे २५ टक्के पदविधर शिक्षक पदावरुन हायस्कुल विभागात केलेल्या पदोन्नतीचा संपूर्ण प्रस्ताव.

२) श्री एस.एस. कान्हेकर यांचे हायस्कुल विभागातील मान्यता पत्र.

३) श्री एस.आर. शिवणकर यांचे ४५००-७००० वेतन श्रेणीचे सेवासातत्य (continue Approval) मान्यता पत्र.

४) श्री पी.जे. भोयर यांचे मान्यता पत्र.

५) श्री एस.आर. शिवणकर यांचे नियुक्तीस मान्यता मिळविण्यासाठी संपूर्ण प्रस्ताव पत्र क्रं. ९५०/९९ दिनांक २०.९.९९

६) सत्र ०६-०७ मध्ये रिक्त पद भरण्यास मंजूरी मागितलेला प्रस्ताव.

७) मा. शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी पद भरण्यास दिलेले मंजूरी पत्र. क्रं. ४८२०/०६

८) सत्र ०६-०७ मध्ये केलेल्या नियुक्तीस मान्यता मिळविण्याकरीता पाठविलेला संपूर्ण प्रस्ताव.

९) नवीन नियुक्तीस मान्यता मिळाली असल्यास त्यांचे मान्यता पत्र.

१०) कर्मचा-यांचे पगार बील सत्र ९५-९६ ते ९६-९७

११) बिंदू नामावली रजिस्टर (नवीन) मधील पान क्रं. १ ते २३

१२) श्री शिवणकर यांचा वेतनश्रेणी वाढीचा प्रस्ताव (५५००-९००० वेतन श्रेणी) "

सदरच्या १२ मुद्यांमध्ये श्री एस.एस. काणेकर तसेच श्री शिवणकर, श्री भोयर यांच्या बध्दल माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनंक ३.३.२००७ रोजी -

" १) श्री एस.एस. काणेकर यांना मा. शिक्षणाधिकारी (मा.) यांचेकडून २५ टक्के पदवीधर शिक्षकांमधून मान्यता मिळाली नाही.

खालील कागदपत्रांची प्रमाणित प्रत पुरविण्यात येत आहे.

१) श्री एस.एस. कान्हेकर यांची पदोन्नती केलीच नाही. त्यामुळे कागदपत्र पुरविण्याचा प्रश्नच येत नाही.

२) श्री एस.एस. कान्हेकर यांचे हायस्कुल विभागातील मान्यता पत्र. (प्रती ३).

३) श्री एस.आर. शिवणकर यांचे ४५००-७००० वेतन श्रेणीच्या मान्यता पत्र (प्रत १).

४) श्री पी.जे. भोयर यांचे मान्यता पत्र (प्रत १)

५) श्री एस.आर. शिवणकर यांचे मान्यता प्रस्ताव ९५०/९९ दि. २०.१.९९ (प्रती १४)

६) मुद्या क्रं. ६ व ७ ची कार्यवाही संस्थेने केली आहे.

७) नवीन नियुक्तीचे मान्यता पत्र (प्रत १)

८) कर्मचा-यांचे पगार बील (प्रती ३४) (पगार बील ९५-९६, ९६-९७)

९) बिंदू नामावली पान क्रं. १ ते २३ (प्रती १२)

१०) श्री एस.आर. शिवणकर यांच्या वेतन वाढीचा प्रस्ताव (५५००-९०००) "

अशी माहिती मागितलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दिनांक १८.४.२००७ रोजी दाखल केलेले दिसून येते.

सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये " दिनांक १३.६.२००७ रोजी अपील निकाली काढण्यात येत आहे व त्याकरीता सकाळी ११.०० वाजता हजर राहावे, " असे कळविलेले

दिसून येते. " दिनांक ३०.६.२००७ रोजी आपले मत व जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचे मत एकुण घेण्यात आले. मुख्याध्यापक यांनी आपणास पाठविलेली माहिती व पत्र पाहाण्यात आले. मुख्याध्यापकांनी शालेय दस्तऐवजावरुन पुरविलेली माहिती व दस्तऐवज सत्य आहे. अपील फेटाळण्यात येत आहे, " असा निर्णय दिलेला आहे.

मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये मुद्या क्रमांक ६ मधील सत्र २००६-०७ मध्ये रिक्त पदे भरण्यास मंजूरी मागितल्याचे प्रस्ताव मिळाले नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. त्याबध्दल संस्थेने कार्यवाही केली आहे, असे उत्तर दिले असेल तर अपीलकर्ता यांना संस्थेचे सचिव यांनी प्रथम अपीलीय अधिकारी महणून सदरच्या प्रस्तावाची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

मुद्या क्रमांक २ च्या संदर्भामध्ये स्पष्टपणे उत्तर दिलेले असल्यामुळे त्याबाबत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे सदरचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

अपीलकर्ता यांच्या वरील तीनही अपीलाच्या संदर्भामध्ये अपील क्रमांक ९६१/२००७ मधील मागितलेल्या माहितीच्या वरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी तीच ती माहिती वारंवार मागितलेली आहे व त्यातही ती त्यांना वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात सुध्दा आलेली आहे. अपीलकर्ता यांची तक्रार अशी आहे की, संस्था किंवा शाळा हे नियमानुसार काम करीत नाही. परंतु राज्य माहिती आयोगाकडे कोणत्याही निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये हस्तक्षेप करण्याचे अधिकार नाही किंवा एखाद्या प्रकरणात निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात नियमबाहय कार्यवाही झाली असेल तर त्याबध्दल सुध्दा चौकशी करण्याचे अधिकार अधिनियमाप्रमाणे आयोगास नाही.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (च) प्रमाणे "माहिती" या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे. व (अ) प्रमाणे "माहितीचा अधिकार" याची व्याख्या दिलेली आहे. "माहिती" याचा अर्थ सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याच्या स्वरुपात उदा. अभिलेखे, एस्तऐवज, परिपत्रके, टिपण्या, पत्रव्यवहार या स्वरुपात जी माहिती उपलब्ध असेल त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा "माहितीचा" अधिकार आहे. व त्यामुळे अपीलकर्ता

यांची आयोगाकडून श्री शिवणकर, श्री भोयर, श्री कान्हेकर किंवा श्री कठाणे यांच्या संदर्भात झालेल्या नियुक्तींच्या बाबत कार्यवाहीची अपेक्षा आहे. परंतु, उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे सक्षम अधिका-यांकडे किंवा मा. न्यायालयाकडे तक्रार करुन न्याय मिळवून घेणे अशी ही संकल्पना आहे.

वास्तविक, अर्जदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतूदींची योग्य ती माहिती घेतल्यास ते ज्या अपेक्षेने आयोगाकडे येतात त्यातून त्यांचा अपेक्षा भंग होणार नाही. तसेच वारंवार माहिती मागून जो वेळेचा कालापव्यय करतात तोही थांबेल त्यास सर्वसाधारण जो माहितीच्या अधिकारा संदर्भामध्ये अर्ज केला म्हणजे काम होते असा जो प्रचार झालेला आहे तो सर्वार्थाने कारणीभूत आहे. व त्यामुळे आयोगाकडील अपीलांची संख्या सुध्दा वाढलेली आहे व अपीलकर्त्यांच्या सुध्दा अपेक्षा भंग होत आहेत. असा प्रचार करणारे जबाबदार आहेत.

वास्तविक, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यास तसे त्यांनी आयोगास कळवावे म्हणजे त्यांचे अपील निकाली काढण्यात येईल, असे त्यांना आव्हान दिनांक ३.६.२००८ रोजी केले होते. माहिती उपलब्ध झालेली असून सुध्दा तशा प्रकारे अपील मागे घेण्यास अपीलकर्ता तयार नसतात व आयोगाकडे सुनावणीत निर्णायक कारवाईची अपेक्षा करतात ते वर म्हटल्याप्रमाणे चुकीचे आहे. त्यात त्यांचाही वेळ वाया जातो. पैसाही खर्च होतात. व आयोगाकडे सुध्दा अपील प्रलंबीत राहातात.. ! त्यास सर्वस्वी वरीलप्रमाणे प्रचार करणारे जबाबदार आहेत.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १७९८/२००७ व १७९९/२००७ हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपील क्रमांक १८००/२००७ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २४.२.२००७ च्या अर्जामधील मुद्दा क्रमांक ६ च्या संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी तथा संस्थेचे सचिव यांनी हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२१.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८०५/२००७**

**१) श्री वसंता सितारामजी हजारे**
**मु.पो. अंबाडी, ता. कुही, जिल्हा नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था, ता. कुही, जिल्हा नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा तालुका देखरेख सहकारी संस्था मर्या.**
**ता. कुही, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २२.७.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. उत्तरवादी हजर आहे. अपीलकर्ता गैरहजर आहे. परंतु, अपीलकर्ता यांनी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कुही यांचेकडे अंबाडी सेवा सहकारी संस्थेची संपूर्ण माहिती मला मिळाली. तसेच अंबाडी सेवा सहकारी संस्थेची निवडणूक निर्वाचन अधिकारी यांनी निवडणुक कार्यक्रम दिनांक ५.५.२००७ रोजी जाहिर केल्यामुळे माझी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये कलम १९(३) बाबतीत तक्रार नाही, असे दिनांक १६.७.२००८ रोजी लेखी दिलेले असून श्री अ.वा.घाटोळे व श्री जे.एस.गोखले या साक्षीदारांच्या सहया दिसून येतात. त्याचप्रमाणे माहिती अधिकारी, तालुका देखरेख सहकारी संस्था, कुही यांनी सुध्दा अर्जदाराचे माहितीमुळे समाधान झालेले असल्यामुळे व तसे त्यांनी लेखी लिहून दिलेले असल्यामुळे सदरचे अपील नस्तीबध्द करण्यात यावे. जर भविष्यात याबाबत काही वाद
निर्माण झाल्यास मी व्यक्तीशः जबाबदार राहील, असे लेखी आयोगाकडे दिलेले असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

**दिनांक :-२२.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८०६/२००७**

**१) श्री गिरीधर पांडुरंग वानखेडे**
**समता कॅालनी, टिळक नगर, ब्रम्हपूरी**
**ता. ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.)**
**नगर पालिका प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय,**
**नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, ब्रम्हपूरी , जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २२.७.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१२.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, ब्रम्हपूरी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल** :-

" १. अर्जदार आपल्या नगर परिषद अंतर्गत मा. जिल्हाधिकारीयांनी प्रथम मंजूर केलेल्या शेंडे ले आऊट गट नं. ६४६ येथील निसासी असून त्यांनी आपल्या पुर्व परवानगीने मकान बांधकाम पूर्ण केले व ते आज त्या मकानात वास्तव्यास आहेत.

२. शेंडे ले आऊट मा. जिल्हाधिकारी यांनी प्रथम मंजूर केलेला आहे. त्यानंतर उरोडे ले आऊट गट नं. ६९१, मा.जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी नंतर मंजूर केलेला आहे.

३. पर्यायाने शेंडे ले आऊट मधील ९ मी.चे रोडला ९ मी.चे रोड व ६ मी.चे रोडला ६ मी.चे रोड जोडण्याचे महाराष्ट्र रिजनल व टाऊन प्लॅानिंग ॲक्ट १९६६ अन्वये बंधनकारक असतांनी उराडे ले आऊट मधील रोड जोडण्यात आलेले नाहीत.

४. श्री पितांबर खरकाटे यांना रोडवर बांधकामाची परवानगी देण्यात येवून पूर्ण रोड बंद करण्यात आलेला आहे. त्यामुळे जनहिताकरीता व भविष्यकाळाच्या दृष्टीने व्यत्यय आलेला आहे. त्याबध्दल दि. ६.९.२००६ ला या बध्दल मौका चौकशी तक्रार अर्ज आपल्या कार्यालयास सादर केले. तसेच दि. १४.११.२००६ ला यांची अनुषंगाने दोन्ही ले आऊटचे नकाशे गट क्रं.६४६ व ६९१ रोड जुडत नसल्याबाबत नकाशा देवून मौका चौकशी करुन उराडे ले आऊट ( गट क्रं.६९१) मधील पितांबर खरकाटे प्लॅाट क्रं.१ मूळे नगर रचनाकार चंद्रपूर यांनी मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे रोड सिमांकन करण्यात आलेले नाही, अशी तक्रार नोंदविली.

त्यानुसार आपण दि. १७.११.२००६ ला दिड ते दोन चे सुमारास मौका चौकशी करीता आपण व आपले तांत्रिक सहाय्यक श्री बेदरे व मासुरकर यांचेसह आले व मौका चौकशी करुन श्री बेदरे तांत्रीक सहाय्यक यांना मौक्यावर सत्य वस्तुस्थिती पाहून श्री पितांबर खरकाटे यांना बांधकाम बंद करण्याबध्दल त्वरीत नोटीस देण्याविषयी ताकीद दिली. यावेळी अर्जदार तसेच श्री शामराव जी. चौधरी (बोंडेगांव) व हर्षे व श्री पडोळे सर तथा हजर होते.

माहितीचा विषयांक :-

१. वरील तपशिलान्वये श्री पितांबर खरकाटे यांना त्वरीत नोटीस देण्याविषयी जी ताकीद दि. १७.११.२००६ ला दिली त्याची प्रत अर्जदाराला त्वरीत देण्यात यावी.

२. अर्जदाराने दि. १५.११.२००६ ला मा.नगर रचनाकार चंद्रपूर यांना सादर केलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे त्यांचे कार्यालयीन पत्र जा.क्रं.तक्रार ब्रम्हपूरी/ले-आऊट/रस्ता/नरच/१६१३/ दि. २७.११.२००६ अन्वये कार्यवाही केलेल्या चौकशी अहवालाची प्रत अर्जदारास त्वरीत देण्यात यावी. "

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३१.१.२००७ रोजी मुद्या क्रमांक १ च्या संदर्भामध्ये श्री पितांबर खरकाटे यांना दिनांक १७.११.२००६ ची नोटीस देण्यात आलेली नाही. त्यामुळे माहिती निरंक आहे. मुद्या क्रमांक २ प्रमाणे मा. नगर रचनाकार, चंद्रपूर यांचे पत्र

क्रमांक तक्रार/ब्रम्हपूरी/ले-आऊट/रस्ता/ नरच/१६१३, दिनांक २७.११.२००६ अन्वये चौकशी करण्यात आलेली नाही. त्यामुळे माहिती निरंक आहे असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २६.३.२००७ रोजी विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक यांचेकडे प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ७.५.२००७ रोजी देण्यात आला असून अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती प्रतिवादीनी विहीत मुदती नंतर देण्यात आल्याचे सिध्द होते. आवेदकानी मागणी केलेली माहिती प्रतिवादीनी पुरविली असून या माहिती व्यतिरिक्त माहिती पाहिजे असल्यास प्रतिवादीनी नगर परिषद, ब्रम्हपूरी यांच्या संबंधीत अभिलेख्याची तपासणी करीता अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. अपीलार्थींनी त्यांना आवश्यक असलेल्या माहिती करीता माहिती अधिकारी, नगर परिषद, ब्रम्हपूरी यांचेकडे माहितीच्या अधिकारा अंतर्गत विहित नमून्यात अर्ज सादर करावा. माहिती अधिका-यांनी अपीलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यास आदेशीत करीत आहे, अशा प्रकारचा निर्णय देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांनी त्यांच्या द्वितीय अपील मेमोमध्ये माहितीचा विषय व स्वरुप हे खालीलप्रमाणे विषद केलेले आहे.

**माहितीचा विषय व स्वरुप** : " मा. मुख्याधिकारी, नगर परिषद, ब्रम्हपूरी यांनी उपायुक्त सामान्य प्रशासन नगर पालीका प्रशासन नागपूर विभाग, नागपूर यांच्या दिनांक ७.५.२००७ च्या आदेशानुसार अपिलार्थीला वरील तीन मुद्यांची माहिती पुरविण्यात आलेली नसून अपीलार्थी व वरिष्ठ अधिका-यांची दिशाभुल करणारी वेळकाढू पणाची माहिती पत्र क्रं.२६६/२६३/२६४ अ.क्रं. दिनांक ५.५.०७ व ४.५.०७ नुसार अपीलार्थी व वरिष्ठ अधिका-यांना दिलेली आहे. मा. मुख्याधिकारी नगर परिषद, ब्रम्हपूरी यांनी वरील पत्र क्रं.२६३ व २६४ नुसार मा. नगर रचनाकार व मा. जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्या पत्रात प्रथम मान्य करतात की, भूमापन क्रं.६४६ लगरचे भुमापन क्रं.६९१ चे अभियान्यास मा. जिल्हाधिकारी, मा. नगर रचनाकार चंद्रपूर यांनी भूमापन क्रं.६४६ ला १७ जानेवारी, १९९८ ला व भूमापन क्रुं.६९१ ला १९.९.२००३ ला मंजूर करण्यात आले. भूमापन क्रं.६४६ चे अभियान्यास मधील अंतर्गत रस्त्याची जुळतील अशा प्रकारे

अभिन्यास नकाशा मा. जिल्हाधिकारी, मा. नगर रचनाकार यांचे कडून करण्यात आलेला आहे हे त्यांनी वरील पत्रात मान्य केलेले आहे.

मा. मुख्याधिकारी, नगर परिषद, ब्रम्हपूरी व त्यांचे तांत्रिक सहाय्यक श्री बेदरे यांना ऐवढे सुध्दा समजू नये की, (क प्रत अभिलेखाची प्रत) व दोन्ही भुखंडातील भु.क्रं.६९० व ६९१ भुखंडातील सिमांकन वादाबाबत असलेला वाद मा.उपविभागीय अधिकारी राजस्व यांनी दोघांच्या म्हणजे भूमापन क्रं. ६९० व ६९१ च्या अभिन्यायधारकांच्या सिमांकन वाद घडवून आणून भुमापन क्रं. ६९१ ला मा. नगर रचनाकार यांच्याकडे निवासी स्थानाकरीता शिफारस केल्याशिवाय भूमापन क्रं, ६९१ अभिन्याय धारकांच्या इंजिनिअर यांनी तालूका निरीक्षक भूमी अभिलेख ब्रम्हपूरी यांच्या कडून प्राप्त झालेल्या क प्रती वरुन भूमापन क्रं. ६९१ च्या अभिन्यास जागेवर प्लॅाटची आखनी करुन नकाशा तयार करुन तो ता. नगर रचनाकार व मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना सादर केल्यानंतरच मा. नगर रचनाकार व मा.जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी भुमापन क्रं. ६९१ आराजी ०.७४ हे.आर अभिन्यासास दि. १९.९.२००३ ला आखनी नकाशाला मंजूरी देण्यात आली. एकदा मा. नगर रचनाकार व मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी मंजूरी दिल्यानंतर भूमापन क्रं. ६९१ अभिन्यास मधील घालून दिलेल्या अटीचे पालन होते किंवा नाही याची सर्वस्वी जबाबदारी मा. मुख्याधिकारी नगर परिषद, ब्रम्हपूरी यांना महाराष्ट्र रिजनल व टाऊन प्लॅानिंग ॲक्ट १९६६ अन्वये विका प्राधिकरण या नात्याने त्यांचेकडे असते.

पान नं. २ ते ३ शेवटच्या पानावर मा. मुख्याधिकारी न.प. ब्रम्हपूरी डोळेझाकपणे उत्तर देवून अपीलार्थी व वरिष्ठ अधिका-यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत ते त्यांचे पत्रात नमूद करतात की, भूमापन क्रं. ६९० व ६९१ ची मोजनी करुन मोजनी अंती निर्णय दिलेला असल्याने अभिन्यास धारकाने अभिन्यासाची आखनी केली व त्यानुसार असल्याने भूमापन क्रं. ६९०, ६९१ व ६४६ चे अभिन्यास धारक यांनी अस्तीत्वात असलेला शासकिय रोड व त्यानंतर असलेली शासकिीय जागा ही चुकीची गृहीत धरुन त्यावर अतिक्रमण करुन भुखंड पाडले असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यांनी दिलेले लेखी विधान चुकीचे व दिशाभूल करणारे असून त्यांना प्रत्यक्ष माहिती आहे की, भूमापन क्रं. ६९१ अभिन्यास धारकाने मा. जिल्हाधिकारी यांनी मंजूर/नकाशाच्या व्यतिरिक्त जागेवर चुकीच्या प्लॅाटची आखनी करुन भूखंड विकले या

त्यांच्या चूकीच्या आखनीमुळे भु.क्रं.६४६ चे सर्व रोड बाधीत झालेले आहे. त्यामुळे अपीलार्थी व जनहिताच्या स्वातंत्र्यावर गदा आलेला आहे. याला सर्वस्वी जबाबदार मा. मुख्याधिकारी न.प. ब्रम्हपूरी व त्यांचे तांत्रि सहाय्यक श्री बेदरे यांनी मोठया प्रमाणात गैरव्यवहार करुन भुमापन क्रं. ६९१ अभिन्यस धारकांशी हात मिळवणी करुन तेथील प्लॅाट क्रं. १ रोडवर घर बांधकामाला परवानगी दिलेली आहे. तसेच प्लॅाट क्रं. ३,४,१३,१४ सुध्दा गैरव्यवहार करुन चुकीचे बांधकाम परवानगी दिलेली असल्यामुळे भु.क्रं. ६४६ चे सर्व रोड बाधीत झालेले आहेत. भु.क्रं. ६९१ हा मंजूर नकाशाप्रमाणे असून पूर्ण विष्कळीत झालेला आहे व मा. मुख्याधिकारी नगर परिषद ब्रम्हपूरी व तांत्रिक सहाय्यक यांनी गैरव्यवहार केलेला असल्यामुळे ते भु.क्रं. ६९१ च्य अभिन्यास धारकावर व प्लॅाट क्रं. १ बांधकाम परवानगी दिलेली असल्यामुळे कार्यवाही करण्यास मागेपूढे पाहात आहेत व आपल्या स्वतःच्या स्वार्थापोटी मा. मुख्याधिकारी नपब्र व तांत्रिक सहाय्यक बेदरे यांनी अपीलार्थी व जनहिताच्या स्वातंत्र्यावर गदा आणलेला असून पूढे अपीलार्थीच्या प्राणहितावर उदभवणा-या प्रसंगाला सर्वस्वी जबाबदार मुख्याधिकारी नपब्र व तांत्रिक सहाय्यक बेदरे स्वतः जबाबदार राहतील."

अपीलकर्ता यांच्या दिनांक ७.१२.२००६ च्या अर्जातील मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये दिनांक ३१.१.२००७ रोजी जी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे ती माहिती ही चुकीची आहे व दिशाभूल करणारी आहे असेही अपीलकर्ता यांनी सांगितले. अपीलकर्ता यांचे अपील मेमोमधील वर नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना प्रामुख्याने त्यांच्या घराचे रस्त्या संदर्भामध्ये कार्यवाही करुन पाहिजे आहे. व ती कार्यवाही संबंधीत अधिका-यांनी केली नाही त्याकरीता त्यांनी तक्रार केलेली होती. त्याकरीता मोका चौकशी सुध्दा करण्यात आली होती. परंतु श्री खरकाटे यांना नोटीस देण्यात आलेली नाही व चौकशी अहवाल तयार करण्यात आलेला नाही, अशी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे पुन्हा प्रथम अपीलात किंवा आयोगाकडे पुढील कार्यवाही करण्याच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांची विनंती दिसून येते. माहिती चुकीची आहे किंवा दिशाभूल करणारी आहे असे जेव्हा म्हटले जाते त्यावेळेस अपीलकर्ता यांनी त्याबध्दल पुरावा द्यावा लागतो. श्री पितांबर खरकाटे यांना नोटीस दिलेली असल्यामुळे व नोटीस दिलेली नाही असे जर माहिती

अधिकारी म्हणत असेल तर ती खोटी किंवा चुकीची माहिती होते. अहवाल तयार केलेला असेल आणि अहवाल बदलला नाही किंवा चौकशी केलेली आहे व केलेली नाही असे असे जर सांगितले असेल तर ती दिशाभूल करणारी माहिती होते. व त्याकरीता सुध्दा अपीलकर्ता यांना पुरावा देणे आवश्यक आहे. परंतु, अपीलकर्ता यांनी दोनही मुद्यांच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची कागदपत्रे/पुरावा दिलेला नाही. मात्र, नोटीस दिलेली नाही, हे तेही मान्य करतात. व त्यांना चौकशी अहवाल दिला नाही हेही ते मान्य करतात. याचा अर्थ त्यांना संपुर्ण प्रकरणामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या माध्यमातून चौकशी करुन संपुर्ण कार्यवाहीची अपेक्षा दिसून येते. मात्र, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (च) मधील "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे माहिती याचा अर्थ, सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या साहित्याच्या स्वरुपात उदा. अभिलेखे, दस्तऐवज, कागदपत्रे, टिपणी, परिपत्रके इ. स्वरुपात छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे असा माहितीचा अधिकार आहे. कोणत्याही प्रकरणात निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये कार्यवाही करण्याचे आदेश देण्याचे अधिनियमाचा उद्येश पण नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती योग्य आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. मात्र ती विलंबाने उपलब्ध झाली आहे, त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी हे दोषी अढळून येतात. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलीकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शास्ती लादण्यात येत असून त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी, अशी शिफारस करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२२.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७३९/२००७**

**१) श्री शोएब अहमद वली भाई कन्नौजी**
**साप्ताहिक रोशन वतन, इतवारा चौक, वर्धा-४४२००१.**
**मु.पो.ता.जिल्हा वर्धा.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मा.श्री मो.कृ.पुराडउपाध्ये साहेब**
**उपसचिव, नगर विकास विभाग, नवीन प्रशासन भवन,**
**१३ वा मजला, मंत्रालय के सामने, मुंबई-३२.**

**३) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,**
**नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०००३२.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २८.७.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज ठेवण्यात आली. अपीलकर्ता विनाअनुमतीने गैरहजर आहे. उत्तरवादी सुध्दा गैरहजर आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.६.२००८ रोजी राज्य माहिती आयोग, मुंबई यांचेकडे व राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे दोन द्वितीय अपीले दाखल केली आहे. मुंबई येथे दाखल केलेल्या अपीलामध्ये सुनावणी झाली. परंतु, अपीलकर्ता हजर राहू शकले नाही व नागपूर येथील सुनावणीस वकील सुध्दा हजर राहाणार आहे असे दिनांक ५.६.२००८ रोजी दाखल केले होते. तसेच सकाळी १०.०० वाजता अपीलाची सुनावणीबाबत कळविण्यात आले आहे. तरी सुध्दा अपीलकर्ता हे २.०० वाजता उपस्थित राहाणार असे त्यांनी आयोगास कळविलेले आहे. परंतु, दुपारी २.०० च्या पुढे अजून चार अपीले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी सुनावणी ही दूपारी घेता येणार नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांची दुपारी १२.४० पर्यंत वाट पाहिली व हजर नसल्यामुळे कागदपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की,

अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जात म्हटल्याप्रमाणेच दिनांक ५.१२.२००७ रोजी मुख्य माहिती आयुक्त यांनी अपीलकर्ता यांचे अपीलाप्रमाणे माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला असून अपील निकाली काढण्यात आलेले आहे, असे दिसून येते. सदरचा अपील क्रमांक २००७/१२७४/०१ च्या निर्णयाची प्रत दाखल केली आहे. व त्याबाबत दिनांक ९.६.२००८ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप सचिव श्री रा.म. चौधरी यांनी आयोगास अपीलकर्त्यांच्या राज्य माहिती आयोग, मुंबई यांचेकडील दिनांक ३१.५.२००७ रोजी दाखल केलेल्या अपीलामध्ये निर्णय दिलेला असून त्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती सुध्दा उपलब्ध करुन दिलेली असून त्याबाबतची पोच सुध्दा दाखल केलेली आहे, असे आयोगाच्या निदर्शनास आणले. व द्वितीय अपीलाच्या अर्जाच्या अनुषंगाने एकदा सुनावणी झाली असल्यामुळे पुन्हा त्याच संदर्भात कार्यालयात हजर राहावे किंवा कसे याबाबत कळवावे. हजर राहाणे आवश्यक असल्यास कृपया १५ दिवसांच्या नंतर तारीख देण्यात यावी असे आयोगास कळविलेले दिसून येते. आयोगास प्रथम अपीलीय अधिकारी यांनी विचारल्याप्रमाणे सुनावणीच्या तारखेस हजर राहावे किंवा नाही हे कळविण्याची आवश्यकता नाही व तसे कळविलेले नसल्यामुळे कदाचित जन माहिती अधिकारी हे हजर राहीलेले दिसून येत नाही. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.५.२००७ ला राज्य माहिती आयोग, मुंबई यांचेकडे जे अपील दाखल केले आहे तेच अपील पुन्हा दिनांक २६.६.२००७ रोजी नागपूर येथे दाखल केले आहे. यावरुन आयोगास काहीही काम दिसत नाही असा अपीलकर्ता यांचा समज झालेला दिसून येतो. वास्तविक, अपीलकर्ता हे पत्रकार आहे व पत्रकारास कमीत कमी अधिनियमाच्या तरतूदींची माहिती असणे आवश्यक आहे. परंतु त्याबाबतची अपीलकर्ता यांना आवश्यकता वाटत नाही. व सुनावणी होऊन निर्णय दिलेल्या अपीलाच्या संदर्भात सुध्दा पुन्हा सुनावणी घेणे व ती पण त्यांच्या सोईंनी घ्यावी असे त्यांनी कळविलेले आहे. यावरुन अपीलकर्ता हे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या तरतूदींचा गैरवापर करीत आहे, असे दिसते. व आयोगाचा सुध्दा अवमान करीत आहे असे दिसते.

नागरिकांना माहितीचा अधिकार हा मिळवून दिलेला असला तरी अपीलकर्त्यांच्या अशा प्रकारच्या तीच ती अपीले वारंवार दाखल करण्याच्या सवयीमुळे ज्यांना खरोखर माहितीची आवश्यकता आहे त्यांचे अपील हे सुनावणीस येत नाही व ज्यांची सुनावणी
झाली, निर्णय झाला, अशी अपीले पुन्हा पुन्हा सुनावणीस येत असल्यामुळे आयोगापुढील अपीलांची संख्या ही प्रचंड प्रमाणात प्रलंबित दिसते. व वरील सर्व कारणास्तव अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक ३१.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोग, मुंबई येथे दाखल केलेले अपीलामध्ये दिनांक ५.१२.२००७ रोजी निर्णय झालेला असल्यामुळे व पुन्हा दिनांक २६.६.२००७ रोजी त्याच दाखल केलेल्या अपीलाच्या संदर्भामध्ये सुनावणी घेणे व निर्णय देणे हे नैसर्गिक न्यायाच्या विरुध्द असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२८.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८९५/२००७**

**१) कु. वंदना पुंडलिक लहाने,**
**द्वारा के.पी लहाने, केशव नगर, वार्ड नं.१३,**
**हनुमान मंदीराजवळ, मो.पो.ता.जि. बुलढाणा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, बुलढाणा.**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण)**
**जिल्हा परिषद, बुलढाणा.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २८.७.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता यांचे तर्फे त्यांचे पती सुनावणीस हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) हजर आहे व कागदपत्रे दाखल केली आहे. माहिती अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) यांचे वतीने श्री बी.एस. परिहार, बाल विकास प्रकल्प अधिकारी, मोताळा हे हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.९.२००६ रोजी सदस्य सचिव, जिल्हा निवड समिती, तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

**हव्या असलेल्या माहितीचा तपशिल** : " (एक) पर्यवेक्षिका या पदाच्या निवडीबाबत. (दोन) दिनांक ३० जुलै, २००६ रोजी झालेल्या लेखी परीक्षा व १८ ऑगष्ट, २००६ रोजी झालेल्या तोंडी परीक्षा (तीन) (i) खुल्या प्रर्वगातून /निवड करण्यात आलेल्या अर्जदाराच्या संदर्भात पुढी मुद्यांवरील

माहिती व प्रती पुरविण्याबाबत.

| अ.क्रं. | परीक्षार्त्यांचे नांव | लेखी परीक्षेत मिळालेले गुण | तोंडी परीक्षेत मिळालेले गुण | संगणक परीक्षा पास असल्यामुळे मिळालेले गुण | अंशकालीन असल्यामुळे मिळालेले गुण | इतर मुद्यावर गुण दिले असल्यास त्याचा तपशिल | अनुभव असल्यास त्याचा तपशिल |
|---|---|---|---|---|---|---|---|

(ii) वरील निवड केलेल्या परीक्षार्थीच्या लेखी परिक्षेतील उत्तर पत्रिकांच्या छायाप्रती

(iii) पर्यवेक्षिका या पदाच्या भरतीबाबत शासनाच्या मार्गदर्शक सूचनाबाबत सर्वशासन निर्णयाच्या व परिपत्रकाच्या छाया प्रती

(iv) कार्यालयीन टिपणीची छाया प्रत."

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २०.११.२००६ रोजी प्रथम अपीली दाखल केलेले दिसून येते.

सदरच्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ४.१२.२००६ रोजी आपल्या अपील अर्जाची पाहणी केली असता आपण मुळ अर्जाची छायांकित प्रत सहपत्रित केलेली होती. तरी आपला अपील अर्ज परत करण्यात येत आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकरीता अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१२.२००६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अद्याप दिनांक २६.१२.२००६ पर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती देण्यात आली नाही. अपील दाखल करुन सुध्दा एक महिना होऊनही गेला आहे, असे स्मरणपत्र पाठविलेले दिसून येते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकरीता दिनांक ८.१.२००७ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) यांना कु. वंदना लहाने यांना हवी असलेली माहिती देण्याबाबत तात्काळ कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. विलंबास सर्वस्वी जबाबदारी आपल्या कार्यालयावर

राहील, याची गांभिर्याने दखल घेण्यात यावी. तसेच सदर माहिती कां देण्यात आली नाही याचा खुलासा करावा असे दिनांक १३.१२.२००६ चा संदर्भ देवून कळविण्यात आलेले दिसून येते.



त्याप्रमाणे दिनांक १६.४.२००७ रोजी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) यांनी आपण या कार्यालयास सादर केलेला आपला अर्ज या कार्यालयातील कार्यालयीन रेकार्डवर उपलब्ध नसल्याने कृपया आपण या कार्यालयास सादर केलेल्या आपल्या अर्जाची छायांकित प्रत या कार्यालयास शक्य तितक्या लवकर सादर करावी जेणेकरुन आपण मागितलेली माहिती या कार्यालयास देणे शक्य होईल, असे कळविलेले दिसते. त्यानुसार दिनांक २१.४.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी अर्जाची छायांकित प्रत सादर केली व ११ मे, २००७ रोजी अर्जदारास पुर्ण माहिती उपलब्ध करुन दिली. त्यावर अर्जदाराची काहीही तक्रार नाही असे अर्जदाराने लिहून दिले आहे, असे दिसून येते. व तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकउे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२.१.२००७ रोजी अपील दाखल केले आहे. राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील हे प्रथम अपीलाच्या निर्णयाविरुध्द दाखल करावयाचे असते. परंतु, दिनांक ४.१२.२००६ रोजी अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाची छायांकित प्रत प्रथम अपीलासोबत दिलेली नाही , ती द्यावी व त्याकरीता अपील अर्ज परत केला आहे असे कळविले असून सुध्दा अपीलकर्ता यानी ती प्रत दाखल केली नव्हती व उलट दिनांक २७.१२.२००६ रोजी अपील दाखल करुनही माहिती उपलब्ध झाली नाही असा आक्षेप घेणारे अर्ज प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांनी पुन्हा प्रथम अपील दाखल केलेले दिसून येत नाही. मात्र, दिनांक २२.१.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. वास्तविक अपीलकर्ता यांनी माहिती ही व्यक्तीशः घेणार असे नमूद केले असल्यामुळे त्यांनी व्यक्तीशः ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता जन माहिती अधिकारी यांचेकडे स्वतः उपस्थित होऊन माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक असते. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ते लिपिक, अधिक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना भेटले परंतु त्याुना माहिती उपलब्ध झाली नाही. याचा अर्थ अपीलकर्ता हे जन माहिती अधिकारी यांना भेटलेले दिसून येत नाही. व्यक्तीशः

माहिती घेणार असे नमूद केल्यावर व ३० दिवसांत व्यक्तीश: माहिती उपलब्ध करुन न दिल्यास आक्षेप घेणारा तक्रार अर्ज हा जन माहिती अधिकारी यांचेकउे द्यावयास पाहिजे होता तोही



दिलेला नाही. कारण अपीलकर्ता म्हणणार की ते माहिती घेण्यासाठी गेले हाते व जन माहिती अधिकारी म्हणणार की ते माहिती घेण्यासाठी आले नाही. याबाबत आयोग कोणताही निर्णय देऊ शकत नाही व तसा लेखी आक्षेप घेणार तक्रार अर्ज हा दाखल करावयास पाहिजे, तो दाखल केलेला दिसून येत नाही. अपील अर्जासोबत सुध्दा माहितीचा अर्ज हा दिला असता तर माहिती अपीलकर्ता यांना त्याचवेळेस उपलब्ध झाली असती. परंतु, दिनांक ४.१२.२००६ च्या अर्जाप्रमाणे पुन्हा त्यांनी अपील अर्ज दिलेला दिसून येत नाही.

असे असले तरी दिनांक १६.४.२००७ च्या पत्रावरुन जन माहिती अधिकारी किंवा त्या कार्यालयातील श्री बोरडे किंवा इतर अधिकारी/कर्मचारी यांनी अर्ज स्विकारण्याच्या बाबत तसेच सदरचा अर्ज हा जन माहिती अधिकारी यांचेपर्यंत पोहचण्याकरीता गलथानपणा दाखविलेला आहे त्याकरीता संबंधीत अधिकारी व कर्मचारी हे दोषी आढळून येतात. व त्याकरीता अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे शास्तीस पात्र दिसून येतात. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

अपीलकर्ता यांनी त्यांना माहिती विलंबाने उपलब्ध झाली, मानसिक त्रास झाला, मानसिक संतुलन बिघडले अशा प्रकारे आयोगापुढे युक्तिवाद केलेला आहे. परंतु अपीलकर्ता यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतूदींचे काटेकोरपणे पालन केलेले नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा लाभ ( relief )करीता हक्कदार नाही. जन माहिती अधिकारी यांचे अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे म्हणणे ऐकुण घेणे बंधनकारक असते. परंतु आज ते स्वत: संधी देवूनही हजर नाही व त्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकुण घेता येत नसले तरी ते शास्तीस पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ५.९.२००६ च्या अर्जाच्या संदर्भामध्ये ज्या ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी गलथानपणा दाखविलेला

असेल व मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसेल ते सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जबाबदारी निश्चित करुन अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे



त्यांचे विरुध्द रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार फक्त) शास्ती लादण्यात येत आहे. ती वसुल करुन "**००७०-इतर प्रशासकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार(००७०-०१६-१)**" मध्ये जमा करावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

३) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२८.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८१८/२००७**

**१) सौ. मलेका तरन्नुमा रिजवानखान**
**वार्ड क्रं.१६, (नवीन) मक्का मशीदीजवळ,**
**लक्ष्मीनगर जुनेशहर, अकोला- ४४४००२.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवधन,**
**अमरावती विभाग, अमरावती.**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त कार्यालय,**
**अमरावती विभाग, अमरावती.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २९.७.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ती हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहे. जन माहिती अधिकारी यांचे तर्फे श्री एन.एच. गोरवे, सुनावणीस हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.२.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी, प्रादेशिक सहआयुक्त, पशुसंवर्धन, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** : " (१) माझ्या माहिती प्रमाणे २००३ खात्याने चतुर्थश्रेणी कर्मचारी ज्यांनी कमीत कमी ३ वर्षे संलग्न सेवा प्रयोगशाळा मध्ये काम केले त्यांना प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर ऑक्टोंबर, २००३ पदोन्नत्या केल्या, तेव्हा आपल्या कार्यालयास खात्याने पात्र कर्मचा-यांची माहिती मागविली असता आपल्या कार्यालयाने कां निरंक माहिती दिली त्याचा खुलासा करावा. (२) माझे पती श्री रिजवान खान यांना प्रयोगशाळा सहाय्यक पदोन्नती पासून डावलण्यात आले का. (३) ते प्रयोगशाळा सहाय्यक पदोन्नतीस पात्र आहे तेव्हा त्यांना २००३

पासून प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर पदोन्नती पाहिजे. (४) खान यांनी दि. २.६.९२ ते १६.६.२००२ पर्यंत प्रयोगशाळा परिचर म्हणून काम केलेले आहे किंवा कसे."

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे दिनांक २.४.२००७ रोजी प्रथम अपील पुन्हा प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन यांचेकडे दाखल केलेले दिसून येते.

सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक १६.४.२००७ रोजी संदर्भिय अपीलानुसार कोणत्या माहिती अधिका-यांचे विरोधात अपील दाखल केले याचा कोणताही अर्थबोध होत नसल्यामुळे सदर अर्जात केलेले अपील स्विकारण्यात येणार नाही. आपण ज्या जिल्हयाचे रहिवाशी आहे, प्रथम तेथील जिल्हा माहिती अधिकारी , अकोला यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घ्यावी, असे प्रादेशिक सहआयुक्त, पशुसंवर्धन, अमरावती विभाग, अमरावती यांचेकरीता सही करुन अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपीलकर्ता यांचा अर्ज दिनांक २६.२.२००७ हा युपीसी ने पाठविलेला दिसून येतो. सदर अर्ज प्राप्त झाला आहे याबध्दलचा खुलासा जन माहिती अधिकारी यांनी केलेला आहे. परंतु माहिती दिली किंवा नाही याबध्दल खुलासा दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांनी केलेला खुलासा हा दिनांक २६.९.२००६ च्या अर्जाचे संदर्भात आहे. त्याबध्दल जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी आतापर्यंत त्यांच्या पदोन्नतीच्या संदर्भात व जन्मतारखेच्या संदर्भात अनेक अर्ज त्यांच्या पत्नीच्या व आईच्या नांवाने केलेले आहेत व वेळोवेळी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

उत्तरवादी यांनी दाखल केलेला खुलासा खालीलप्रमाणे- "

१. सौ.मलेका तरन्नुम रिजवान खान यांचा अर्ज दि. २६.९.२००६ चा अर्ज दिनांक ३.१०.२००६ रोजी प्राप्त झाला.

२. श्रीमती जहारा बेगम वि मिरजवान खान यांचा दि. २०.९.०६ चा अर्ज दिनांक ७.१०.०६ रोजी खात्याकडून प्राप्त झाला.

३. श्रीमती जहारा बेगम वि मिरजवान खान यांचा दिनांक ११.११.०६ चा अर्ज दिनांक १४.११.०६ रोजी प्राप्त झाला.

४. श्रीमती जहारा बेगम वि मिरजवान खान यांचा दिनांक १.७.०६ चा अर्ज दिनांक ३.७.०६ रोजी प्राप्त झाला.

५. श्रीमती जहारा बेगम वि मिरजवान खान यांचा दिनांक १८.१२.०६ रोजीचा अर्ज दिनांक २१.१२.०६ रोजी प्राप्त झाला.

६. सौ. मलेका तरन्नुम रिजवान खान यांचा दिनांक २६.२.०७ चा अर्ज दिनांक ३.३.०७ रोजी प्राप्त झाला.

७. सौ.मलेका तरन्नुम रिजवान खान यांचा दिनांक २.४.०७ चा अर्ज दिनांक ५.४.०७ रोजी प्राप्त झाला.

१. आयुक्त पशुसंवर्धन(मुख्यालय) आयुक्त पशुसंवर्धन यांचे पत्र क्रमांक एनजीओ ६ (माअ)/(४१४)/१२२४/२००६/पसं-१ दिनांक २९.९.०६ अन्वये मुद्या क्रं. ३,५,७ माहितीकरीता रु. ३०/- चलाने भरणे बाबत अवगत केले.

२. या कार्यालयाचे पत्र क्रमांक ८४७२-७३/०६ दि. १८.११.०६ अन्वये बाजू मांडण्याकरीता पत्र दिले.

३. या कार्यालयाचे पत्र क्रमांक ८४७४-७८/०६ दि. १८.११.०६

४. या कार्यालयाचे पत्र क्रमांक ८७६१-६२/०६ दि. २७.११.०६ अन्वये बाजू मांडण्याकरीता व अपील अर्ज दि. ११.११.०६ नुसार माहिती पाठविण्याकरीता रु. ३०/- भरणा करणेबाबत अवगत केले.

५. या कार्यालयाचे पत्र क्रमांक प्रासआ/आस्था-२/प्रप्र/९०८१-८५/०६ दिनांक १२.१२.०६ नुसार पुन्हा दि. १८.१२.०६ रोजी हजर राहण्यास सुचित केले.

६. या कार्यालयाचे `पत्र क्रमांक प्रासआ/आस्था-२/प्र प्र/५३-५५/०६, दिनांक २.१.०७ अन्वये शेवटची संधी म्हणून दिनांक ८.१.०७ रोजी मुळ प्रमाणपत्रासह हजर राहण्यास सुचित केले.

१. श्री रिजवान खान परीचर आधारभुतग्राम उपकेंद्र कुरणखेड जि. अकोला यांचे मे २००२ पासून वार्षिक वेतनवाढ रोखण्यांत आल्यासंबंधी.

२. श्री खान यांची खात्यामध्ये १५ वर्षे सेवा पुर्ण झाल्यावर ही कालबध्द का झाली नाही.

३. लिपीक-टंकलेखक या पदावर पदोन्नती बाबत माहिती.

४. चतुर्थ श्रेणी जेष्ठता सूची.

५. श्री रिजवान खान एस.एस.सी.पास इंग्लीश, मराठी टायपिंग संगणक उत्तीर्ण आहे. पदोन्नतीबाबत माहिती.

६. श्री रिजवान खान यांची २००२ पासून जन्म तारखेची पडताळणी, सेवापुस्तक पडताळणी का प्रलंबित आहे.

७. प्रयोगशाळा सहाय्यक पदोन्नतीबाबत माहिती.

८. श्री रिजवान खान यांना १९९० मध्ये अनुकंपातत्वावर नोकरीसाठी कागदपत्रे अर्जासह दिले त्याची प्रत.

१. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा अकोला यांनी त्यांचे पत्र क्रमांक १११०-१२/०६ दिनांक ३.११.०६ अन्वये पदोन्नतीबाबत व जन्मतारखेबाबत माहिती दिली आहे.

२. शासकिय माहिती अधिकारी तथा सहआयुक्त पशुसंवर्धन(मुख्यालय) आयुक्त पशुसंवर्धन म.रा.पुणे-०१ यांचे पत्र क्रमांक एनजीओ-६(मा.अ.)(४१४)/१२१५/२००६/पसं-१, दिनांक १४.११.०६ अन्वये मुद्या क्रं.३,५ व ६ ची माहिती लेखी स्वरुपात संबंधीत अर्जदारास लेखी स्वरुपात कळविली आहे.

३. या कार्यालयाचे पत्र क्रमांक प्रासआ/आस्था२/माअ/९५११-१२/०६, दिनांक १८.१२.०६ अन्वये मुद्या क्रं. १,२,४ व ६ माहिती देण्यांत आली आहे.

४. दिनांक २.४.०७ च्या अर्जावर या कार्यालयाचे पत्र क्रमांक:प्रासआ/आस्था-२/(माअ)/७५०८-१०/०७, दिनांक १६.४.०७ अन्वये कळविले आहे. "

वरील खुलाशावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे परंतु त्यांच्या पदोन्नतीच्या किंवा जन्मतारखेच्या करीता त्यांच्या बाजूने निर्णय यावा याकरिता ते सर्व अधिका-यांना व आयोगास वेठीस धरीत आहे असे दिसते. अपीलकर्ता हे प्रथम अपीलाच्या सुनावणीस सुध्दा अनेक वेळा कळवून सुध्दा हजर राहिलेले नसल्याने हा मुळ प्रश्न तसाच

राहीला असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे आहे. यावरुन अपीलकर्ता यांना महिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो.

अपीलकर्ता यांचे दिनांक २७.२.२००७ चे अर्जाचे संदर्भात कार्यालयाने कोणत्याही प्रकारची दखल घेतली नाही. तसेच प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये सुध्दा जे उत्तर देण्यात आलेले आहे ते उत्तर सुध्दा प्रथम अपील मेमोचे अवलोकन न करता देण्यात आलेले आहे. वास्तविक अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक २६.२.२००७ च्या अर्जामध्ये ४ मुद्यां मध्ये जी माहिती मागितलेली आहे ती "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येमध्ये येत नाही. व त्यामुळे ती अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे नाही. असे असले तरी, त्या संदर्भामध्ये कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसांच्या आंत उत्तर देणे आवश्यक होते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) प्रमाणे प्रत्येक अर्ज हा स्वतंत्र अर्ज असतो त्या अर्जात मागितलेल्या माहितीचा इतर अर्जातील माहितीशी संबंध जोडता येत नाही. मात्र तीच ती माहिती वेगवेगळया पध्दतीने अनेक अर्जात मागितली असल्यास त्याप्रमाणे मुदतीत कळवावयाचे असते. पूर्वी माहिती उपलब्ध करुन दिलेली असली तरी त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. २६.२.२००७ च्या अर्जाचे संदर्भात कळवावयास पाहिजे होते. परंतु ते कळविलेले नसल्याने जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. व कलम २० प्रमाणे शास्तीस पात्र आहे. परंतु, आज जन माहिती अधिकारी हे स्वतः हजर नाहीत. वास्तविक त्यांना आयोगाच्या दिनांक ४.६.२००८ च्या नोटीसप्रमाणे उपस्थित राहाण्याबध्दल कळविण्यात आलेले होते म्हणजे त्यांना संधी देण्यात आली होती. अधिनियमाच्या कलम २० प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी ही जन माहिती अधिकारी यांची आहे. तसेच शास्ती लादावयाची असल्यास त्यांचे म्हणणे एकुण घेणे हे आयोगावर बंधनकारक आहे. परंतु संधी देऊनही जन माहिती अधिकारी हजर नाहीत. ते बजेटच्या संदर्भात पुण्याला गेले आहेत असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्ता हे सुध्दा अनेक अर्जाच्या माध्यमातून तीच ती माहिती ही त्यांची पदोन्नती व्हावी या उद्येशाने वेठीस धरण्यासाठी मागत असल्याने ते अधिनियमाचा गैरवापर करीत आहेत असाही निष्कर्ष काढावा लागतो.असे असले

तरी माहिती ३० दिवसांत उपलब्ध करुन दिलेली नसल्याने अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यांस पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक २६.२.२००७ च्या अर्जाप्रमाणे कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांच्या विरुध्द ताकिद देण्याची शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही प्रादेशिक सहआयुक्त्, पशुसंवर्धन, अमरावती विभाग, अमरावती यांनी करावयाची असून त्याबध्दलचा अहवाल आयोगाकडे सादर करण्यात यावा.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-२९.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८२२/२००७**

**१) श्री दिलीप भिकाजी देठे,**
**मु.पो.दे.मही, ता.देऊळगांव राजा**
**जिल्हा बुलढाणा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, बुलढाणा.**

**३) जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, देऊळगांव राजा, जिल्हा बुलढाणा.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक २९.७.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी पोस्टाने दिनांक २७.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलावर अपीलकर्ता यांची सही नाही. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. उत्तरवादी हजर आहे. अपीलकर्ता हजर नाही. परंतु, दिनांक २१.४.२००७ रोजी माहिती प्राप्त झाली असे त्यांनी लेखी दिलेले दिसून येते. तसेच गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देऊळगांवराजा यांनी सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती पुरविण्यात आलेली आहे, सोबत पोचपावती जोडलेली आहे. प्रकरणात भविष्यात अडचण निर्माण होणार नाही व झाल्यास मी जबाबदार राहील, असे लेखी दिलेले असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**दिनांक :-२९.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८२४/२००७**
**अपील क्रमांक १८२७/२००७**

**१) श्री मधुकर श्री सावळे**
**राष्ट्रवादी कर्मचारी संघटना**
**शाखा डॉ.पं.दे.कृ.विद्यापीठ, अकोला. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कुलसचिव,**
**डॉ.पं.दे.कृ.विद्यापीठ, अकोला.**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव (आस्थापना)**
**डॉ.पं.दे.कृ.विद्यापीठ, अकोला. उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ३०.७.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

**अपील क्रमांक १८२४/२००७ :** अपीलकर्ता यांनी विद्यापीठाअंतर्गत कार्यरत असलेल्या शिक्षकेतर व तांत्रिक अधिकारी व कर्मचारी विविध पदांची जेष्ठता यादी दिनांक १२.१२.०६ पर्यंतची निर्गमीत पुरविण्याबाबत विनंती. सुरुवातीपासून ते दि. १२.१२.२००६ पर्यंत विविध पदांची जेष्ठता यादी. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २२.१२.२००६ रोजी विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचा-यांची मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदांची माहितीच्या झेरॉक्स प्रती घेण्याकरीता रुपये ६/- एवढा खर्च अपेक्षित आहे. तरी आपण रुपये ६/- नगदी भरुन या कार्यालयास भरणा केल्याबाबतची पावती सादर करावी जेणेकरुन पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल, असे सहाय्यक कुलसचिव, आस्थापना तथा माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. पुन्हा दिनांक २२.१२.०६ रोजी रुपये १०७/- चा भरणा करावा असे पत्र दिलेले दिसून येते व त्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना

दिनांक २.१.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेला माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २६.२.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे.

प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक १२.३.२००७ रोजी अपीलकर्ता यांना बोलाविलेले दिसून येते परंतु कोणताही निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

अपीलकर्ता यांचे माहितीच्या दिनांक १३.१२.२००७ चे अर्जामध्ये दिनांक १२.१२.२००६ पर्यंतची माहिती मागितलेली होती. परंतु माहिती दिनांक १.१०.२००६ पर्यंतची उपलब्ध करुन दिली असे दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना खोटी, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिली. उपलब्ध करुन दिलेल्या माहिती मध्ये वाहन चालकाची ५८ पदे मंजूर असून ५८ पदे ही भरलेली आहे व एकही पद रिक्त नाही, असे कळविले. परंतु दिनांक ६.२.२००७ रोजी विद्यापीठाने वाहन चालकाच्या १५ पदांकरीता जाहिरात दिलेली आयोगाच्या निदर्शनास आले. त्यावर अपीलकर्ता यांनी असा युक्तिवाद केला की, रिक्त पदे जर नव्हती तर फेब्रुवारी, २००७ मध्ये १५ पदे रिक्त असल्याची जाहिरात कशी दिली. यावरुन त्यांना खोटी व दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिली असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, दिनांक १.१०.२००६ रोजी जी माहिती उपलब्ध होती ती दिली आहे व त्यानंतर पदांचा आढवा घेण्यात आला व आढावा घेतल्यानंतरच भरलेली पदे व रिक्त पदे किती याबध्दलची माहिती तयार करुन ती प्रसिध्द करावी लागते ती प्रसिध्द झाल्यानंतरच अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिली. विद्यापीठातील सर्वच पदांच्या संदर्भामध्ये जेष्ठता यादी वगैरे तयार झालेली नाही व त्यामुळे ज्या ज्या वेळेव तयार होईल त्या त्या वेळेस अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. अपीलकर्ता यांना माहिती विलंबाने उपलब्ध झाली आहे हे निश्चित. तसेच उपलब्ध झालेली माहिती ही दिशाभूल करणारी माहिती आहे असेही त्या माहितीवरुन

दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जामुळे कमीत कमी विद्यापीठात पदे आहे व त्यात सेवाजेष्ठता यादी करावी लागते, रिक्त पदे भरावी लागते यांची जाणिव तरी विद्यापीठाच्या अधिका-यांना झाली हेही नसे थोडके..! जशी जशी माहिती उपलब्ध होईल तशी तशी उपलब्ध करुन देण्यास जन माहिती अधिकारी तयार आहे . त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**अपील क्रमांक १८२७/२००७** : मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२००६ रोजी उप कुलसचिव आस्थापना यांचेकडे विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचारी मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदे याचा तपशिल दिनांक १.१२.२००६ पर्यंतचा. अशी माहिती टपालाद्वारे मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.१.२००७ रोजी या पत्रासोबत आपण मागितलेली माहिती शासनाने नव्याने मंजूर केलेल्या सुधारित आकृती बंधानुसार मंजूर पदे तसेच दिनांक १.१०.२००६ पर्यंतची भरलेली व रिक्त पदांची माहिती ३ प्रतीमध्ये देण्यात येत आहे, असे कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक २०.२.२००७ रोजी दिनांक २३.२.२००७ रोजी चर्चेकरीता कुलसचिव तथा अपीलीय अधिकारी यांचे दालनात उपस्थित राहावे, असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक २३.२.२००७ रोजी सकाळी ११.०० वाजता अपीलकर्ता यांनी अपूर्ण माहिती मिळाली हे निदर्शनास आणले.

१) फाऊन्ड्रीमन

२) फोरमन सुपरवायझर

३) टर्नर

४) ड्रायव्हर

५) चौकीदार

६) प्रयोगशाळा परिचर

या सर्व पदाबाबतची माहिती चर्चे दरम्यान श्री सावळे यांना दस्तऐवजाच्या पुराव्यासह दाखविण्यात आले. तांत्रिक व चौकीदार या पदांची भरलेली माहिती बाबत श्री सावळे यांचे

समाधान झाले. इतर पदांच्या दिनांक १.१२.२००६ पर्यंतची माहिती योग्य त्या खुलाशासह पुरविण्याची श्री सावळे यांनी विनंती केली. तसेच पुरविण्यात आलेल्या माहितीच्या प्रती साक्षांकित करुन देण्यात याव्या अशी विनंती श्री सावळे यांनी केली. त्याप्रमाणे तांत्रिक व चौकीदार या पदांच्या व्यतिरिक्त इतर पदांच्या बाबतची दिनांक १.१२.२००६ पर्यंतची माहिती योग्य त्या खुलाशासह श्री सावळे यंना पुरविण्यात यावी व माहितीचया प्रती साक्षांकित करुन देण्याबाबत सुध्दा कार्यवाही करावी असा कुलसचिव तथा माहिती अधिकारी यांनी निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु उपलब्ध झालेली माहिती ही योग्य व खरी नसल्याचे कारण देवून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांच्या अर्जामध्ये मागितलेल्या माहितीप्रमाणे माहिती उपलब्ध कां नाही असे विचारले असता जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, शासनाने नव्याने मंजूर केलेल्या सुधारित आकृती बंधानुसार सर्व पदांचा आढावा घेण्यात येत असून त्यात काही पदे कमी झालेली आढळून येतात व त्यामुळे संपुर्ण आढावा घेतल्यानंतरच सर्व पदांच्या बाबतीत वस्तुस्थिती स्पष्ट होईल व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहीती उपलब्ध करुन देता येईल असे त्यांचे म्हणणे आहे. त्या करीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १८२४/२००७ मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १३.१२.२००६ च्या अर्जात शिक्षकेतर व तांत्रिक अधिकारी कर्मचारी या विविध पदांची जेष्ठता यादी योग्य व खरी, हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांनी आतापर्यंत माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीत जो खर्चाचा भरणा केला आहे तो खर्चाचा भरणा त्यांना परत करण्यात यावा.

३) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक १८२७/२००७ हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ८.१२.२००६ च्या अर्जाप्रमाणे शिक्षकेतर कर्मचा-यांच्या बाबत मंजूर पदे, भरलेली पदे, व रिक्त पदांची माहिती शासनाने नव्याने मंजूर केलेल्या सुधारित आकृती

बंधानुसार आढावा घेवून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

४) अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या करीता जो झेरॉक्स खर्चाचा भरणा केलेला आहे तो त्यांना परत करण्यात यावा.

५) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-३०.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८२६/२००७**

**१) श्री दिनदयाल हि. वाघवाणी**
**संचालक, कृषि उत्पन्न बाजार समिती, चिखली**
**(मार्केट यार्ड), जिल्हा बुलढाणा.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**जिल्हा उपनिबंधक कार्यालय, सहकारी संस्था , बुलढाणा.**

**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**कृषि उत्पन्न बाजार समिती चिखली, ता.चिखली, जि. बुलढाणा.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ३०.७.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१२.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, चिखली यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

माहितीचा विषय : " १) अमडापूर येथील गोडावून तेंदुपत्ता ठेकेदारास भाडयाने दिले असून त्यांचेकडून रक्कम रुपये ६०००/- घेणे बाकी आहे ते कोणत्या पावती क्रमांक व दिनांक रोजी वसूल झाले आहे त्याचे माहिती मिळावी.

२) एस.के.वायाळ कनिष्ठ लिपिक हे समितीचे कामावर हजर नसतांना दिनांक ५.६.२००५ रोजी रुपये २५,०००/- ॲडव्हान्स रक्कम दिली. सदर कर्मचारी सतत गैरहजर असल्यामुळे ती रक्कम अद्याप पावेतो वसुल झालेली नाही. हयास जबाबदार कोण व सदर रक्कम वसुली साठी काय कार्यवाही केली गेली, याची माहिती मिळावी.

३) सन २००३-०४ हया वर्षातील लेखापरीक्षण अहवालात नमूद केलेले संपूर्ण दोष कायम ठेवून खोटा व दिशाभूल करणारा दोष दुरुसती अहवाल दोषाची पुर्तता न करता शासनास पाठविला आहे. हयास जबाबदार कोण. जबाबदार असणा-या अधिका-यावर काय कार्यवाही केली आहे माहिती मिळावी.

४) सेवा निवृत्त कर्मचा-यांना राज्य शासनाचे कर्मचा-यांना मिळणा-या उपदान प्रमाणे बाजार समितीचे कर्मचा-यांना उपदान देणे आवश्यक होते त्यानुसार श्री जे.एन. येवले माजी सचिव हयांना शासकीय नियमानुसार रुपये १,३७,६५०/- एवढीच उपदान रक्कम द्यावयास पाहिजे होती बाजार समितीची आर्थीक फसवणूक करुन रक्कम रुपये १,९९,३४६/- अदा केले उपदान रक्कमेचे बिल खोटे व दिशाभूल करुन मंजूर करुन बाजार समितीचे आर्थिक हितास बाधा पोहचविली यांस जबाबदार असणा-या अधिका-यावर अद्याप पर्यंत पोलीस केस दाखल का करण्यात आली नाही, माहिती द्यावी.

५) सन २००५-०६ हया वर्षात बाजार समितीचे आवारात परवानाधारक खरेदीदार व्यापारी हयांनी बिलाप्रमाणे कोणता शेतमाल किती रुपयात खरेदी केला हयाची प्रत्येक खरेदीदार वाईस खरेदी किंमती बाबत माहिती प्रत्येक खरेदीदार वाईज मिळावी व त्यांनी प्रत्यक्षात किती बाजार फि चा भरणा केला.

६) समितीचे सेवेत कर्मचारी कायम केलेल परंतू त्यांना शासनाची मंजूरात मिळालेली नाही. अशा कर्मचा-यांना समितीचे सचिवाने त्यांना कोण कोणत्या पतसंस्थेकडून कर्ज घेण्यास हमीपत्रे दिली याबाबत माहिती द्यावी.

७) सन २००३-०४ हया आर्थिक वर्षातील लेखापरीक्षण अहवालात अनेक कर्मचा-याकडून रक्कम वसुल करण्याबाबत आक्षेप घेण्यात आलेला आहेत. त्यांची नावे व वसुली रक्कमेची माहिती द्यावी व त्यांचेकडून रक्कम वसूल केलेली आहे काय, नसल्यास वसूल न करण्याचे करणासह माहिती द्यावी.

८) सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ३ दिनांक २६.१.०५ अन्वये मौजे शेळगांव आटोळ येथे उपबाजार सुरु करणे बाबत ठराव पारित केला. परंतू त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यात

आली नाही. हयामुळे संचालक मंडळाच्या अवमान केला गेला हयांस जबाबदार कोण. जबाबदार अधिका-यांवर काय कार्यवाही केली माहिती मिळावी.

९) सन २००४-०५ हया वर्षात झालेला लेखा परिक्षण अहवाल निघालेले गंभीर आक्षेपांची पुर्तता करण्यात आलेली नसतांना खोटा व दिशाभूल करणारा दोष दुरुस्ती अहवाल दिनांक ३.११.२००६ रोजीच्या सर्वसाधारण सभेत मंजूरातीस ठेवण्यात आला व त्यास मंजूरी घेतली हयांस जबाबदार कोण. माहिती मिळावी. दोष दुरुस्ती अहवालाची सत्यप्रत मिळावी.

१०) टी.एम.सी. प्रकल्प प्रकरणावर सुरुवातीपासून ते ३१.१०.०६ पर्यंत त्यावर किती खर्च झाला तसेच टी.एम.सी.प्रकल्प संबंधात वर्तमान पेपर मधल्या जाहिरात व जाहिरातीवर झालेला खर्चाचे विवरण द्यावे.

११) दिनांक १९.९.०५ सेवक उपसमितीचे कार्यवाही बुक वाचून दाखविण्यात आलेत व श्री डी.आर.जाधव माजी रोखपाल यांनी केलेल्या पैशाचे अपहाराबाबत मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था बुलढाणा यांचे कार्यालयामार्फत चौकशी करण्याचे ठरले. परंतु अद्याप पर्यंत प्रस्ताव का सादर केलेला नाही. याचे मुद्ये निहाय स्पष्टीकरणासह माहिती मिळावी.

१२) दिनांक १.१०.२००५ ते दिनांक ३०.९.२००६ हया कालावधीत मेनगेटवर खरेदीदारांनी कोणत्या शेतमालाचे किती क्विंटल वजनावर किती रुपये किंमतीवर मार्केट फिरक्कम भरणा केली हयाची खरेदीदार वाईज माहिती मिळावी.

१३) सेवक समिती सभा दिनांक २१.९.२००६ चे ठराव क्रमांक २ नुसार श्री डी.आर. जाधव यंनी पैशाच्या अपहार केला असल्याचे नमूद केले आहे. परंतु प्रत्यक्षात किती रक्कमेचा अपहार केला याची माहिती मिळावी तसेच रक्कम रुपये १२०७०.७० हे कोणत्या पावती क्रमांक व दिनांक रोजी भरणा केले याची माहिती मिळावी. श्री डी.आर. जाधव रोखपाल यांचा दिनांक १.१०.२००५ पर्यंत एक महिना निलंबित करण्याचे ठरले परंतु निलंबित केले नाही, मुद्येनिहाय स्वयंस्पष्ट कारणासह माहिती मिळावी.

१४) दिनांक ३०.९.१९९८ चे चिखली व बुलढाणा बाजार समिती विभाजन झाल्यानंतर बुलढाणा बाजार समितीकडून रक्कम रुपये ८८,६,६९५.२३ घेणे बाकी आहे. हया रक्कम

वसुलीस कोण जबाबदार आहे. त्यांचेवर वसुलीसाठी नियमानुसार काय कार्यवाही केली माहिति मिळावी.

१५) श्री के.डी. शेटे सचिव हयांनी रक्कम रुपये १,३४,७००/- कार्यालयीन कामाची सबब दर्शवून सचिवाने ॲडव्हांस उचल केलेला आहे. नियमानुसार घेतलेला ॲडव्हांस एक महिन्याच्या आज जमा होणे आवश्यक आहे. तरी त्यांचेकडून ती नमूद ॲ. रक्कम रुपये १,३४,७००/- कोणत्या तारखेला जमा याची माहिती मिळावी व जमा झालेली नसल्यास त्यांचे वर पोलीस केस का दाखल करण्यात आली नाही याचे मुद्येनिहाय स्वयंस्पष्ट कारण नमूद करावे व माहिति मिळावी.

१६) मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बुलढाणा यांचे कार्यालयीन आदेश पत्र क्रमांक वि.४/कृउबास/चिखली/तक्रार/ची सह/१०५५६/०६, दिनांक ६.८.२००६ चे चिखली कृषि उत्पन्न बाजार समिती, चिखली जि. बुलढाणाचे आर्थीक गैरव्यवहाराची चोकशी घेवून बाजार समितीचे सचिवावर कायदेशिर कार्यवाही करणेबाबत विषयांकित पत्रावर समितीने काय कायदेशिर कार्यवाही केली त्यांची माहिति मिळावी. सदर चौकशी अहवालातील दोषीवर कायदेशिर कार्यवाहीसाइी पोलीस केस का दाखल करण्यात आलेली नाही याबाबत सदर माहिति मिळावी. पोलीस केस दाखल करण्यास कसूर करणा-या अधिका-यांची नांवे द्यावी.

१७) दिनांक १.९.२००६ ते ११.१२.२००६ हया कालावधीत समितीने खर्च केलेला रक्कमाचे बिलासह व्हावचर्सच्या झेरॉक्स कॅापी मिळाव्यात.

१८) मीनी महाराज संस्थान जवळील सर्वे नं. १५०/२ चे व्हॅल्युएशन तसेच चिखली येथील ऑफीस कॅाम्पलेक्स व अमडापूर येथील जागेचे व्हॅल्युएशन करिता रुपये २,००,६१२/- चे आर्किटेक्ट फिवर विना कारण खर्च झाला. हया खर्चाची जबाबदारी कोणाची व विनाकारण झालेला खर्च वसुलीसाठी अद्यापपावेतो कायदेशीर कार्यवाही का करण्यात आली नाही याची माहिति मिळावी.

१९) श्री गु.स. वाघ रा. सावळी यांना सन १९९५-९६ मध्ये माझे अडत दुकान जवळ बांधलेल्या टाकीचे बांधकामाचा ठेका दिला सदर ठेका दिल्याची आदेशाची सत्यप्रत व संबंधित ठेकेदाराला दिलेला रुपये १,७०,०००/- व्हावचर्स झेरॉक्स प्रत तसेच ९५-९६ पासून टाकीचे

बांधकाम अपुर्ण आहे. हया अपुर्ण टाकीचे बांधकामास जबाबदार अधिकारी कोण व समितीने त्यांचेवर काय कार्यवाही केली आहे. कार्यवाही केली नसल्यास त्याची कारणे देण्यात यावी. माहिती मिळावी."

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.१.२००७ रोजी प्रथम अपील हे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा कार्यालयात दाखल केलेले दिसते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १२.६.२००८ रोजी देण्यात आलेला असून सदरची माहिती १५ दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला आहे. परंतु अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकउे द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

" विद्यमान राज्य माहिती आयुक्त साहेब, जन माहिती अधिकारी तथा सचिव कृषि उत्पन्न बाजार समिती चिखली हयांनी माझे दि. १८.१२.२००६ रोजीचे अर्जात विहित मुदतीत मागितलेली माहिती पुरविणे बाबत अर्जदारास केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील नमूद तरतुदीनुसार कोणत्याही प्रकारचा कार्यालयीन पत्रव्यवहार केलेला नाही.

तसेच जन माहिती अधिकारी तथा सचिव कृषि उत्पन्न बाजार समिती चिखली हयांचे जवळ मी मागितलेली सर्व माहिती अद्यावत तयार असतांना सुध्दा जाणिपपूर्वक देण्या टाळाटाळ केली आहे.

अर्जदाराने प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बुलढाणा यांचे कडे दिनांक ३१.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल करुन त्यावर दि. २२.२.२००८ रोजी प्रत्यक्ष सुनावणी असतांना सुध्दा माहिती अधिकारी तथा सचिव कृषि उत्पन्न बाजार समिती चिखली हयांनी माहिती पुरविणे बाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नाही. उलट अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बुलढाणा हयांना दिनांक २२.२.२००७ रोजी मी मागितलेली माहिती मुद्या नं. १ ते १९ मुद्यांची माहिती देण्यात आली आहे. असा खोटा लेखी जवाब सादर केला आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, मी मागितलेली

माहिती ही फक्त प्रश्नांची उत्तर दिल्यासारखी दि. २६.२.२००७ ला दिली असून ती माहिती अपूर्ण, खोटी व दिशाभूल करणारी आहे. हे मी प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बुंलढाणा यांना दि. २३.३.२००७ रोजी सुनावणीच्या वेळी प्रत्यक्ष जबाबद्वारे निदर्शनास आणून देवून जवाबाच्या मूळ प्रतीवर सही घेतली आहे.

दि.२६.२.२००७ रोजी पत्रात माहिती अधिकारी तथा सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती चिखली हयांनी फक्त प्रश्नांची उत्तरे दिली जातात त्याप्रमाणे मला मी मागितलेली माहितीचे कोणतेही दस्तऐवज दिले नाही. फक्त उत्तरा सारखी माहिती दिली ती दिलेली माहिती सुध्दा अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे. त्यामुळे माझे समाधान झालेले नाही.

जन माहिती अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती चिखली हयांनी हेतूपुरस्पर मला माहिती देण्यास कसूर केलेला आहे. तरी नियमानुसार योग्य तो दंड व्हावा व अचूक व सत्य माहिती कागदपत्रासह देण्याची आदेश व्हावे ही विनंती.

त्याचप्रमाणे मी प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बुलढाणा हयांनी सुध्दा दि. २३.३.२००७ रोजी सुनावणी पुर्ण झाल्यानंतर विहित मुदतीत अपीलावर निर्णय दिला नाही म्हणून नियमानुसार उचित कार्यवाही व्हावी ही विनंती."

माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

" माहिती अधिका-याचा खुलासा : अर्जदाराने माहितीच्या अधिकाराअंतर्गत या बाजार समितीकडे दि. २३.१२.०६ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. सदरहु तक्रार अर्जाची दखल घेऊन बाजार समितीने अर्जदारास १९ मुद्यांची माहिती दि. २६.२.२००७ रोजी दिलेली आहे व पोच घेण्यात आलेली आहे. ( प्रत सोबत जोडलेली आहे) यानंतर अर्जदाराने प्रथम अपीलीय अधिकारी तथा जि.उ.नि.स.सं. बुलढाणा यांचेकडे दि. ३१.१.०७ रोजी अपील अर्ज सादर केला. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात दि. २२.२.०७ रोजी प्रथम सुनावणी ठेवली असता सदरहु सुनावणीस माहिती अधिकारी हजर होते. व अपीलीय अधिकारी गैरहजर होते. तसेच तिस-या सुनावणीस दि. २३.३.२००७ रोजी माहिती अधिकारी व अपीलार्थी दोघेही हजर होते. सदरहु अपीलाचा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. १२.६.०८ रोजी पारीत

केलेला आहे. सदरहु अपीलाच्या निर्णयान्वये माहिती अधिकारी यांना १५ दिवसांचे आंत माहिती देण्याबाबत आदेशीत केलेले आहे.

चिखली कृषि उत्पन्न बाजार समिती ही कापसाची मोठी बाजार पेठ असून कापसाच्या हंगामामध्ये प्रचंड प्रमाणावर कापसाची आवक अव्याहतपणे सुरु असते. समितीचा संपूर्ण कर्मचारी वर्ग हा हंगामामध्ये कास्तकारांच्या कापसांच्या गाडयांची व्यवस्था, गुरांची व्यवस्था, तसेच शासकिय शुल्कांची वसुली यासाठी कर्मचारी रात्रंदिवस कर्तव्यावर असल्यामुळे अर्जदारांस सदरहु बाब वेळोवेळी निदर्शनास आणून देण्यात आलेली आहे. आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाण् कायदयाच्या माहितीचा या शब्दाच्या व्याख्येनुसार अर्जदारास माहिती पुरविण्यात आलेली आहे.
या ठिकाणी नम्रपणे नमुद करण्यात येते की, बाजार समितीने अर्जदारास मागणी केलेली १९ मुद्यांची माहिती दि. २६.२.२००८ रोजी पुरविली आहे. करिता माहितीस्तव सादर."

" अपीलीय अधिका-याचा खुलासा : अपीलार्थीने महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ११(३) अन्वये सदरचे अपील दाखल केलेले आहे.

अर्जदाराने माहिती अधिकारी यांचेकडे कृषी उत्पनन बाजार समिती चिखली या बाजार समितीचा मुद्या क्रमांक १ ते १९ मुद्यांमध्ये मागितलेली आहे.

सहरहु माहिती माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीमध्ये अर्जदारास न पुरविल्यामुळे अर्जदाराने सदरचे अपील दाखल केलेले आहे.

माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्रं.२४०/०७ दिनांक २२.२.२००७ अन्वये अर्जदारास मुद्या क्रमांक १ ते १९ ची माहिती देण्यांत आली आहे.

सदरचे अपील या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष सुनावणी या कार्यालयास दिनांक २२.२.२००७ रोजी ठेवण्यांत आली होती. सदरहु सुनावणी माहिती अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती चिखली हे उपस्थित होते आणि अपीलार्थी हे गैरहजर होते.

दुसरी सुनावणी दिनांक २.३.२००७ रोजी ठेवण्यांत आली सदरहु सुनावणीस माहिती अधिकारी हे उपस्थित होते आणि अपीलार्थी हे गैरहजर होते.

तदनंतर तिसरी सुनावणी दिनांक २३.३.२००७ रोजी ठेवण्यात आली असता सुनावणी माहिती अधिकारी तथा सचिव कृषि उत्पन्न बाजार समिती चिखली हे उपस्थित झाले आणि अपीलार्थी हे उपस्थित होते.

तदनंतर या कार्यालयाने दिनांक २३.३.२००७ रोजी सुनावणी मध्ये माहिती अधिकारी यांना अर्जदार यांना मुद्या क्रमांक १ ते १९ पर्यंत माहिती उपलब्ध करण्याचे निर्देश देण्यांत आले आहे. माहिती अधिकारी यांनी हे मान्य केले.

तदनंतर या कार्यालयाने दिनांक १२.६.२००८ चे आदेशान्वये अपीलार्थीने मागणी केलेली माहिती १५ दिवसांचे आंत विनामुल्य अर्जदारास पुरविण्यांत यावे असे माहिती अधिकारी यांना आदेशीत करुन अपील अर्ज निकाली काढण्यांत आले.

तदनंतर या कार्यालयाने आदेश क्रं.आस्था/माहिती अधि/अपील/८०५९/२००८, दिनांक १२.६.२००८ अन्वये माहिती अधिकारी तथा सचिव कृषि उत्पन्न बाजार समिती चिखली यांनी अपीलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार मागणी केलेली माहिती देण्यास विनंती प्रमाणे प्रतिवादीला मुद्या क्रमांक १ ते १९ माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश देवून सदरहु अपील अर्ज निकाली काढण्यांत आलेला आहे.

तसेच नम्रपणे विनंती करण्यात येते की, या कार्यालयाचे असणारा अपूरा कर्मचारी वर्गामुळे अर्जदारास निर्णय देण्यास विलंब झालेला आहे. सदरहु विलंब हा जाणून बुजून झालेला नसून अपूरा कर्मचारी वर्ग असल्यामुळे झालेला आहे. तरी कृपया सदरहु निर्णयास झालेला विलंबाचा कालावधी क्षमापीत करावा ही विनंती.

वरील प्रमाणे वस्तुस्थिती / घटना आपले अवलोकनार्थ सादर करण्यांत येत असून अपीलार्थीने मागणी केल्याप्रमाणे माहिती पुरविण्यात आलेली असल्यामुळे सदरचे अपील कृपया खारीज करण्यात यावे ही विनंती.

करीता उपरोक्त प्रमाणे खुलासा विनंती पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर. "

यावरुन अपीलकर्ता यांना दिनांक २६.२.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली होती असे दिसून येते. व सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीच्या संदर्भात प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये मुद्येनिहाय माहिती ही बरोबर नाही किंवा छायांकित प्रती उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत किंवा

उडवाउडवीची उत्तरे दिली आहे, माहिती दिशाभूल करणारी, चुकीची व खोटी दिलेली आहे, अशा प्रकारचे प्रत्येक मुद्याचे संदर्भात अपीलकर्ता यांनी म्हणणे मांडलेले दिसते.

अपीलाची सुनावणी घेताना अपीलकर्ता यांनी युक्तिवाद केला की, त्यांनी एकुण १९ मुद्यांवर जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये त्यांना अभिलेखे किंवा दस्तऐवज किंवा कागदपत्रे यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे होत्या. परंतु प्रत्येक मुद्येनिहाय माहिती ही तयार करुन दिलेले आहे. माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, सदरची माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपात असल्यामुळे ती अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदीप्रमाणे माहिती ही सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जी कागदपत्रे, अभिलेखे, दस्तऐवज, टिपणी उपलब्ध असते त्याच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे असा माहितीचा अधिकार आहे. कोणत्याही प्रकारे जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय किंवा मत येईल अशा प्रकारच्या प्रश्नांच्या उत्तरातून माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षीत नाही. व त्यावर अर्जदाराने प्रश्न जरी विचारले आणि त्या संदर्भात जर अभिलेखे किंवा कागदपत्रे किंवा दस्तऐवज उपलब्ध असेल तर त्या दस्तऐवजाच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे हे अधिनियमाच्या तरतूदींशी सुसंगत आहे. उपलब्ध असलेल्या कागदपत्रांमधून कोणत्याही परिस्थितीमध्ये माहिती तयार करुन देणे (काढून देणे) हे अपेक्षित नाही. ज्या ज्या वेळेस माहिती ही लिहून दिली जाते, त्या त्या वेळेस अपीलकर्ता यांना सदरची माहिती छानून पाहाण्याकरीता कोणत्याही प्रकारची कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे ती माहिती खोटी, चुकीची व दिशाभूल करणारी आहे अशा प्रकारचा आक्षेप घेतला जातो. छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन दिल्यास तशा प्रकारचा आक्षेप येण्याचे कारण नाही व अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे हेच अभिप्रत आहे. उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे अपीलकर्ता यांनी स्वत: छाननी करुन त्याबध्दलची तक्रार स्वतंत्रपणे योग्य त्या सक्षम अधिका-यांकडे करणे अशी ही संकल्पना आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या अर्जातील प्रत्येक मुद्यांचे वाचन करुन कागदपत्रे उपलब्ध असल्यास मुद्येनिहाय छायांकित प्रती

उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. अपीलकर्ता यांना सदरची माहिती ही विलंबाने उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व त्यानंतरही विलंबाने उपलब्ध होत असल्यामुळे ती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १८.१२.२००६ च्या अर्जामधील १९ मुद्यांच्या संदर्भात उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-३०.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८३०/२००७**

**१) सौ.सुरजीबाई गुरुप्रसाद उपाध्ये**
**संतोषी माता मंदीर हनुमान बस्ती,**
**अकोला.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक**
**अधीक्षक , भूमी अभिलेख कार्यालय, अकोला.**

**३) जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,**
**तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, अकोला.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ३१.७.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ती यांचे पती हजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.८.२००६ रोजी खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : "अकोला महानगर पालीका गट नं. २५ मधील नझुल शीट नं. ३८ सी प्लॉट नं. २ क्षेत्रफळ १२७६ चौ.फुट चे बाबत आपणांस दि. १.१.९९ पासून नमूना ड मागणीसाठी प्राप्त झालेल्या सर्व अर्जांच्या प्रतिलीपी त्याप्रमाणे दिलेल्या ड नमूना ड चे प्रतिलिपीसह.

(२) दि. १.११.२००० नंतर आपण घेतलेल्या फेर फार साठी प्राप्त झालेले अर्ज व त्याप्रमाणे घेतलेल्या फेर फारसाठी प्राप्त झालेले सर्व दस्तऐवजाच्या प्रतिलीपी

(३) याशिवाय काही लोकांनी दि. १.१.२००० नंतर फेर फार नोंदविण्यास घेतलेले आक्षेपपत्रांच्या प्रतिलीपी. सदर आक्षेप व जिल्हा न्यायालयाचे मनाई हुकूम असतांना आपण सदरहू नोंदी कोणत्या नियमाप्रमाणे घेतल्या याबाबतचा आपला अभिप्राय सविस्तर खुलाशासह देण्यात यावा."

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, अकोला यांनी दिनांक २९.८.२००६ रोजी अपीलकर्ता यांना "आपण जिल्हाधिकारी कार्यालयाचे परिसतील सेतू कार्यालयामध्ये नियमानुसार नक्कल फी भरणा करुन प्रतिलीपी प्राप्त करुन घेता येतील. फेर फार क्रमांक २३०९, २३१०, दिनांक १.१.२००० नंतर या कार्यालयास दिनांक २८.५.२००३ ला नोंदी करीता प्लॅाट नंबर २, शिट नंबर ३८ सी मधील जागेवर नोंदी घेणेबाबत अर्ज प्राप्त झाला होता. ती नोंद घेण्याबध्दल कोणाचाही आक्षेप मुदतीत किंवा नंतर प्राप्त झाला नाही. तसेच जिल्हा न्यायालयाकडून कोणताही मनाई हुकूम या कार्यालयास प्राप्त झाला नाही. व नोंदी महाराष्ट्र जमीन महसुल १९६६ चे कलम १५० नुसार घेतलेल्या आहेत. " असे कळविलेले दिसून येते. सदरच्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २९.९.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व अधीक्षक, भूमी अभिलेख, अकोला यांनी राज्य माहिती आयोगाकडे खुलासा दाखल करताना दिनांक ८.११.२००६ ला अपीलार्थी हे सुनावणीस हजर झाले नाही, हजर न झाल्यामुळे अपील प्रकरणात निर्णय देण्यात आलेला नाही, असे नमूद केले आहे. परंतु दिनांक २७.१०.२००६ रोजी जे अधीक्षक, भूमी अभिलेख यांना पाठविलेल्या नोटीशीवर दिनांक ८.११.२००६ रोजी अपीलकर्ता हजर आहे व पुढील तारीख १३.१२.२००६ रोजी दिलेली आहे अशी नोंद दिसून येते. व त्यानंतर प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीकरीता कगदपत्रे दाखल करण्याकरीता दिनांक २०.६.२००८ ही तारीख देण्यात आली होती. त्याप्रमाणे अधीक्षक, भूमी अभिलेख यांनी १ ते ७ अशी सहपत्रे दाखल केली आहेत. परंतु सहपत्रामध्ये मागितलेल्या माहितीच्या कागदपत्राच्या प्रती २ प्रतीत सादर केलेल्या आहेत, असे नमूद केले आहे. तसेच अपीलकर्ता यांनी खुलासा

दाखल केला आहे व खुलाशामध्ये मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही, असे त्यांनी नमूद केले आहे.

अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ११.८.२००६ च्या अर्जाप्रमाणे दिनांक २९.८.२००६ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्याचे अवलोकन केले असता माहिती ही उपलब्ध करुन देण्याऐवजी टाळाटाळ केलेली दिसून येते. व सेतू कार्यालयामध्ये माहिती उपलब्ध होईल असे कळविलेले दिसून येते. वास्तविक, अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.९९ पासून नमूना ड मागणीसाठी प्राप्त झालेल्या अर्जाच्या प्रतिलीपी व नमूना ड दिनांक १.१.२००० नंतर घेतलेल्या फेर फार अर्जावरील दस्तऐवजाच्या प्रतीलीपी व त्याबाबत घेतलेल्या आक्षेपाची प्रतिलीपी इ. माहिती मागितलेली आहे. परंतु छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु कोणत्याही प्रकारची कागदपत्रे किंवा फेर फार नोंदीकरीता आलेल्या अर्जाच्या प्रतीलिपी त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या नाही व प्रथम अपीलाची सुध्दा सुनावणी न घेता अपीलकर्ता हजर असताना त्यांना पुढील तारीख दिलेली असताना ते गैरहजर होते असा दिशाभूल करणारा खुलासा आयोगाकडे सादर केला आहे व त्यावरुन सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे, अशी आयोगाची खात्री झालेली आहे. आयोगाच्या कार्यालयात मागितलेल्या माहितीच्या कागदपत्रांच्या प्रती दाखल करुन नये असे नोटीशीत स्पष्टपणे दिलेले असले तरी जन माहिती अधिकारी यांनी फेर फार पंजीची नक्कल दाखल केलेली दिसून येते. आयोगाने माहिती मागितलेली नसते व आयोग हा पोस्टमनचे काम करीत नाही व त्यामुळे आयोगाचे कार्यालयात माहिती उपलब्ध करुन देवून जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन दिली असे जर वाटत असेल तर त्यांना अधिनियमाच्या तरतूदीचे कोणतेही प्राथमिक ज्ञानसुध्दा नाही असे दिसून येते. व आजही द्वितीय अपीलाच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी हजर झाले नाही व कोणत्याही प्रकारचा अर्ज सुध्दा त्यांनी आयोगाकडे गैरहजर राहाण्याकरीता केलेला नाही. यावरुन सुध्दा जन माहिती अधिकारी हे माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात जाणून बुजून टाळाटाळ करीत

आहे हा निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळे राज्य जन माहिती अधिकारी हे अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे दोषी आढळून येतात शास्तीस पात्र आहे. जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द



शास्ती लादताना त्यांचे म्हणणे एकुण घेणे हे अधिनियमाच्या कलम २० (१) च्या परंतुकाप्रमाणे बंधनकारक आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांना सदरच्या अपीलाच्या सुनावणीस कागदपत्रे दाखल करण्याकरीता व नोटीस काढून सुनावणीस हजर राहाण्याकरीता संधी देण्यात आली होती. त्यामुळे पुन्हा त्यांचे म्हणणे ऐकुण घेण्याची संधी देण्याची आवश्यकता दिसून येत नाही. व त्यामुळे त्यांच्या विरुध्द रुपये २५,०००/- (रुपये पंचवीस हजार) ची शास्ती लादण्याची संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, अकोला यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास जाणून बुजून टाळाटाळ केलेले असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) ची शास्ती ही लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली ही उप संचालक, भूमी अभिलेख, अमरावती यांनी त्यांच्या दर महिन्याचे वेतनातून वसुल करुन ती "**००७०-इतर प्रशासाकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार(००७०-०१६-१)**" मध्ये जमा करावी.

२) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ११.८.२००६ च्या अर्जातील मागितलेल्या माहितीप्रमाणे (फेर फार वगळून) छायांकित प्रतीच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन द्यावी.

३) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-३१.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८३३/२००७**

**१) सौ. एम.डी. पावडे (आरोग्य सेविका)**
**प्राथमिक आरोग्य केंद्र, वरवंड, ता.जि.बुलढाणा. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, बुलढाणा.**

**३) जन माहिती अधिकारी तथा वैद्यकिय अधिकारी,**
**प्राथमिक आरोग्य केंद्र, वरवंड, ता.जि. बुलढाणा. उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ३१.७.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.५.२००७ (१९.५.२००७) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी (जिल्हा आरोग्य अधिकारी ) हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक २.३.२००७ रोजी वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, वरंवड यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे. तसेच व्यक्तीशः घेणार असेही नमूद केले आहे.

सदरची माहिती अपीलकर्ता यांनी ३० दिवसांचे आंत उपलब्ध होण्याच्या पुर्वीच दिनांक १७.३.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.४.२००७ रोजी दिलेला असून त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक ३०.४.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले

आहे. सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा दाखल केलेला आहे. तसेच माहिती अधिकारी यांनी सुध्दा खुलासा दाखल केला आहे. खुलाशा सोबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केली आहे. सदरच्या कागदपत्रामध्ये दिनांक ७.८.२००७ रोजी श्री पी.बी. बाहेकर, वैद्यकिय अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेल्या कार्यवाहीचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचे कार्यालयास सादर केलेला नसल्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस दिलेली दिसून येते. तसेच त्या पत्राची प्रतिलीपी मध्ये राज्य माहिती आयोगाकडे त्यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर करुन केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतूदीनुसार शासकिय माहिती अधिकारी तथा वैद्यकिय अधिकारी, तसेच संबंधीत लिपिक श्री राजूरकर, प्राथमिक आरोग्य केंद्र, वरंवड, जिल्हा बुलढाणा यांचेवर दंडात्मक कार्यवाही करण्याबध्दल शिफारस करण्यात येत आहे, असे दिलेले आहे. उपलब्ध झालेल्या माहितीचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरची माहिती ही सत्य नसून अपूर्ण आहे. अपीलकर्ता यांनी जिल्हा परिषद, बुलढाणा यांना सादर केलेला खुलासा हा खालीलप्रमाणे आहे.

" महोदय, वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र वरवंड यांना अनेक वेळा विनंती करुनही त्यांनी आवश्यक ती माहिती मला पुरविली नसल्याने आपणाकडे मी वरील कायद्याचे कलम १० (१) प्रमाणे अपील दाखल केलेले आहे. संबंधित वैद्यकिय अधिकारी व लिपिक यांनी लेखी स्वरुपात माहिती न पुरविणे व अपीलाचे सुनावणीचे दरम्यान समाधानकारक उत्तरे न देणे (चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देणे) ही  बाब अपील अधिकारी यांनी दि. २७.४.०७ चे अंतरीम आदेशात नमूद केली आहे. असे अपील अद्याप निकाली निघाले.

वरील कायद्याचे तरतुदीनुसार कसूरदारास योग्य तो दंड होणे जरुरी आहे. आपण आदेशात नमूद केलेल्या विहीत मुदतीत वैद्यकीय अधिकारी यांनी मला माहिती पुरविलेली नाही तसेच मुद तीनंतर जी काही माहिती दिली ती माहिती दिशाभूल करणारी व चूकीची आहे. संबंधित अधिकारी कायदा व वरिष्ठाचे आदेशाला जुमानत नाही व स्वतःच सर्वेसर्वा आहेत व त्यांचे विरुध्द कोणीही काहीच करु शकत नाही. कितीही गैरवर्तन केले तरी कोणतीलच होवू शकत नाही या भ्रमात ते वावरतात. मी एक महिला कर्मचारी असून मला वेगवेगळया प्रकारे

त्रास दिल्या जातो. तसेच मानसिक छळ केल्या जातो. तक्रार केली असता काही दखल घेतल्या जात नाही. तसेच मी कर्तव्य कामकाज बजावत असतांना निरनिराळया प्रकारे अडथळे व उपद्रव वरवंड प्रा.आ.केंद्र व उपकेंद्राच्या ठिकाणी निर्माण केले जातात. मी शासकिय आरोग्य सेवेत कामावर असतांना गैरहजर दाखविल्या जाते व हजेरी पटावर मी सही केल्यावर ती अनधिकृतपणे खोडल्या जाते व त्यावर A लिल्यिा जातो. तर कधी सहीच्या जागेवर अगोदरच A लिहीलेला असतो. तर कधी काही वेळा वै.अ./क्लार्क हजेरीपत्रक घेवून जातांना दिसतात. त्यामुळे हजेरीपत्रक उपलब्ध नसते.

मी काम केले तरी वेतन दिल्या जात नाही. मी प्रत्येक कामाकाजाच्या नोंदी ठेवल्या आहेत. मागिल जून, २००६ महिन्यापासूनचे वेतन दिल्या गेलेले नाही. अशा अनेक वर्ष महिनोगंतीचे वेतन थकीत अपूर्ण वेतन आहे. अशा प्रकारे आर्थिक देखील छळ केल्या जातो. त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचा अधिकार राखून ठेवून या पत्रा,ारे आपल्या निदर्शानास एवढी बाब आणू इच्छीत की, आपल्या दि. २७.४.०७ चे आदेशाची पूर्तता व पालन करण्यात आलेले नाही व मला चूकीची माहिती पुरविण्यात आली आहे. "

त्यावरुनच अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती अपूर्ण व असत्य आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. जी माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामध्ये त्यांचे आतापर्यंत वेतन कां काढण्यात आलेले नाही याबध्दलची कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. सदरच्या प्रकरणामध्ये माहिती उपलब्ध करुन देणे पर्यायाने अपीलकर्ता यांना वेतन उपलब्ध करुन देणे असाच होतो. परंतु उपलब्ध करुन दिलेल्या माहिती मध्ये चुकीची व असत्य माहिती आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे असल्यामुळे अपीलाच्या संदर्भामध्ये न्याय चौकशी होणे आवश्यक आहे. तसेच त्यांचे पूर्वीचे २५ महिन्यांचे वेतन काढलेले नसल्यास तेही काढणे आवश्यक आहे. चुकीच्या माहितीच्या संदर्भामध्ये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वतंत्रपणे एक सदस्यीय चौकशी (आरोग्य विभाग वगळून) नियुक्त करुन स्वतंत्रपणे चौकशी

होईल असे पहाणे हे संयुक्तिक राहील. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना सत्य व खरी माहिती उपलब्ध होण्याचे दृष्टीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी (आरोग्य विभाग वगळून) एक सदस्यीय समिती नियुक्त करावी. त्याप्रमाणे अपीलकर्त्यांचे २५ महिन्यांचे वेतन कां काढण्यात आले नाही याबध्दलची झालेली कार्यवाही त्यांना कळविण्यात यावी. सदरची चौकशी हा निर्णय मिळाल्यापासून एक महिन्यांचे आत पुर्ण करुन आयोगाकडे अहवाल सादर करावा.

२) दिनांक ७.८.२००७ च्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री पी.बी. बाहेकर, वैद्यकिय अधिकारी यांना दिलेल्या कारणे दाखवा नोटीसची प्रतिलीपी राज्य माहिती आयोग यांना अग्रेषित केलेली असून त्यामध्ये शिफारस केल्याप्रमाणे शासकिय माहिती अधिकारी तथा वैद्यकिय अधिकारी तसेच लिपिक श्री राजूरकर यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांना लागू असलेल्या सेवा नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करुन त्याचा अहवाल आयोगाकडे सादर करावा.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

४) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-३१.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**